CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

G-1
69/17

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अलमारी संख्या ________

१६

खाना संख्या ________

विभाग

बंडल संख्या ________

फाइल की संख्या

क्रम-संख्या

फाइल का शीर्षक

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

G-f 69/17

SHAHU AND BAJIRAO : ADMINISTRATIVE.

This section of about 185 letters gives a realistic idea of the daily routine at the court of King Shahu and discloses how the two prominent figures—the king and his Peshwa—acted and reacted upon each other and how in general the administrative activities of the growing Maratha State were carried on.

Maintenance of justice is one of the essential functions of the State. That the Maratha kings and statesmen ever kept this before their eyes and tried to realize it in their administration is proved by many letters in this selection, in one of which (No. 13) Shahu admonishes some sardar who has deserted the Maratha cause, on the consequences of his wrong action and uses the following memorable words : " I appeal to you to leave aside all personal considerations, to remember your high and noble ancestry, and to serve the state. . . . You must conquer enemies' kingdoms and establish Maratha rule. . . . Fight all that is evil and wicked but on no account must the ryots be molested." Even the Peshwa is not spared when the King learns of his corruption and interference in the course of justice. " Beware of bargaining with justice lest it might soil your fame. Not all your victories could efface the dishonour."

The relations between Shahu and his Peshwa Bajirao have long been a matter of controversy. In one letter Shahu calls upon all sardars to obey Bajirao implicitly. Later on Bajirao is heartily congratulated on his victories but is occasionally reprimanded for measures which do not satisfy the king. Bajirao is often dilatory, does not promptly execute the king's orders and fails to communicate to the court what he has been engaged in. At the same time in any critical emergency Bajirao is the person to whom Shahu looks to steer the vessel of the state safely out of troubled waters.

The mutual jealousies and bickerings of various sardars are reflected in several papers and Shahu is often at pains to co-ordinate the efforts of various agents in order to achieve a particular result. One or two letters mention Shahu's eagerness to cast large guns in his factory and make them an effective arm of warfare. A few papers refer to the famous controversy recorded by Duff—why the northern enterprise should not be undertaken before their own house in the south had been put in order by the Marathas. It seems, however, that in his dealings with his Sardars, Shahu trusted more to expostulation and personal discussion than to any strict disciplinary code. His oral instructions often failed to have the intended results as they could be conveniently forgotten by the average official.

Reports from provincial governors, the difficulties of officials in the matter of collecting land revenue or customs duties, their complaints about recalcitrant secretaries, troubles arising out of the clash of complex interests in a pargana, judicial inquiries, petitions and recommendations

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

of candidates for service, the mobilization of armies and similar details of administration are brought together in these papers for convenience of study. That Chimaji Apa was the recipient of many such letters testifies to his high organising capacity and administrative genius. Being thus relieved of the onerous task of looking into administrative details and financial problems, Bajirao found ample time to plan and carry out successfully his ambitious schemes of conquest.

Many of the letters are unfortunately without any clue to their dates and have therefore been lumped together at the end. This defect lessens their importance but little.

954.03

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 1



[*Continued*]

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh



Facsimile of a letter from Malharji Holker.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh



Facsimile of the handwriting of Yemaji Shivdeo.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh



Facsimile of a letter of Pilaji Jadhao.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 1] [1721 ?

श्रीशंकर

पतप्रधान

राजश्री अंबाजीपंत स्वामी
गोसावी यास सेवेसी

०॥ऽ अखंडितलक्षुमीविराजित सदा येशवंत राजमुद्राविराजित राजमान्हे सेवक आज्ञाधारक मंल्हारजी होलकर दंडवत विनती उपरी. येथील शंतोस जाणून श्वकीये शामराजवैभव लिहितां आज्ञा करणे विशेश. बहुत दिवस आम्ही बंडियाकडे[१] होतो. हाली याचा आमचा विवाड पडला. त्यास्तव आम्ही मोहनसिंगा[२] राणे त्याजकडे राजेश्री बांपूजी[३] प्रभूचें मारुफातीने तजवीज करीत होतो. मग यानी + सायेबाकडे तजवीज करून कागद पाठविले आहे, तरी आम्ही मनापासून मनसिबियाचे वाटेने जे तजवीज केली आहे. तुमच्या चितास उतम दिसोन येईल तरी उभयेता येकत्र होऊन उतरे कागदाची मनापासून पाठवणे. कितेक वर्तमान तपसीलवार रो बापूजी प्रभू यानी लिहिली आहेत. कुली मनास आणून उतरे पाठवतों. उतरे आलियावरी राजेश्री[४] तुमचे सेवेसी येतील. आपण इमान कुली मनापासून राजेश्रीसी[४] केला आहे. जेथे यानी आम्हास ठेवावे तेथे बिलाकुसूर राहावे. जो धनी चाकर ठेवील त्यानी इजितीन ठेवावे. चाकरीस उजूर नाही. बहुत काये लिहिणे? कृपा लोब आसो दीजे हे विनती.

¶Malharrao Holkar gives in this letter a written pledge to the Peshwa to serve him loyally and faithfully, if the latter would accept his services. Incidentally he gives his own previous history and mentions that he first served Bande and after his disagreement with him, was negotiating through Bapuji Prabhu to accept service with Mohansing, the Rana of Badwani : but Bapuji Prabhu recommended him to the Peshwa. The letter appears to be of the early days of Bajirao.

---

१ बंडे २ वढवाणीचा (खानदेशच्या उत्तरेस नर्मदा दक्षिणकांठीं).

3 Bapuji Prabhu appears to be Bapuji Sonaji Dighe, who worked from Rajaram's days to about 1730. See his life in Itihas-sangraha ऐ. जु. गो. Pt. 2, p. 16.

+ The space left here is for the word Pant Pradhan written at the top : this is a mark of respect.

४ बापूजी दिघे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 1A] [*1721 ?*

श्रीआईआदिपुरुष

पुरवणी महाराज क्षत्रियेकुलावतंस राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसी

सेवेसी विज्ञापना ऐसीजे. स्वामीसमागमे जमाव होता तो अवघा उठउठोन आला. खासे खासे मात्र राहिलें आहेत. जमाव निपट पातल जाला आहे. खायाखर्चाचीहि वखवख बहुतच जाली आहे म्हणून आइकोन परम क्लेश सेवकास होतात. करावे काय? येंदाचा प्रसंग बहुतच कठीण येऊन पडला. स्वामीची स्वारी तिकडे जाली तिकडील खर्च, आमची स्वारी जाउलीकडे जाली तेथील प्रत्येही दोनीसे रुपयाचा खर्च. येथे सातारियास आलियाउपर लस्करचा जमाव हशम मिलोन तीन च्यारशे (रुपये) रोज पाहिजेत. मुलकाचा अर्थ तो सचंतर आलाहिदा लिहिला आहे. प्रत्येक काय ल्याहावा? रुका कोठून प्राप्त नाही. कर्जहि मिळेना. पहिले कर्ज घेऊन पनास मोहरा सेवेसी पाठविल्या होत्या. सांप्रत सातारियास आलियाउपरी कर्जाचा तलास करून रुपये पाठविले आहेत.

४९० मोहरा ३६ दर १२॥
५१० ऐन रुपये

१०००

येकून एक हजार रुपये सेवेस पाठविले आहेत. पावलियाचे उतर प्रविस्ट करावयास स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लेहू हे विज्ञापना.

¶*Letter to Shahu by the Pratinidhi, probably Shripatrao. He pathetically describes his financial embarrassment and with greatest difficulty sends Rs. 1,000 to Shahu. The paper unfortunately bears no date ; it may be about 1721.*

No. 2] [*23-6-1724 ?*

श्री

छ १२ सवाल

पुरवणी राजश्री राऊ स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी. काली शुक्रवारी राजश्री नारबावा[१] यांनी आम्हास बोलाऊन सांगितलें कीं, राजश्री पंतप्रधान नवाब निजामनमुलुक याची आज्ञा घेऊन

१ नारबावा = नारो राम मंत्री.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ते परभारे पुणियात जाऊन राहिले. तरी ऐसी गोष्टी कार्याची नाहीं. राजश्री स्वामीचे दर्शन घेऊन मग पुणियास जावें, ऐसा विचार उत्तम होता. परंतु घडोन आला नाहीं. तरी याउपरी राजश्री पंतप्रधान याणीं * * * स्वामीच्या दर्शनास यावें. येविसीं दिवसगत लाऊं नये. यैसें पत्र लिहिणे म्हणून आम्हास आज्ञा केली. आम्ही राजश्री बावास पत्र मागितलें कीं, याच-प्रमाणे लेहून देणे. त्यानी उत्तर दिले कीं आम्ही पत्र देत नाहीं. आम्ही सांगितले म्हणून तुम्ही आपल्या नावें पत्र लेहून पाठवणे. त्यावरून स्वामीस पत्र पाठविलें आसे. याचे उत्तर राजश्री बावास लेहून पाठविलें पाहिजे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Letter written by Purandare to Bajirao from Satara at the instance of Naro Ram Mantri. It discloses a distrust of Shahu for Bajirao as the latter did not keep his master fully informed as to his dealings.*

No. 3] नकल [*4-12-1724 ?*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री
अपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. शुक्रवारी प्रहर रात्र जाली ते समई राजश्री स्वामीनी आज्ञा केली की, राजश्री पिलाजी जाधवराऊ याची कुली वस्तभाव दाणादुणा कापड गुरेढोरें खिलारे घोडी सिंगरे सेल्या मेंढ्या वरकड सिकारखाना बटकी चाकर याचा बंदोबस्त बहुत चौकसीने करणे, तर्फरका[१] होऊ न देणे म्हणून आज्ञा केली ते लिहिले असे. याउपरी वाडीचा वाडा व नांदेडचा वाडा व वाघोलीचा वाडा पाडून टाकणे येविसी शफत घातली की, आपले मानेस सुरी लावाल तरी अनमान कराल म्हणून शफत घातली. त्याप्रमाणे स्वामीस लिहिले असे. तरी पत्राचे उतर पाठविले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The last line of* ऐ. टि. ३·३ *mentions that Pilaji Jadhav fell into disfavour on Friday 4-12-1724* (मार्गशीर्ष व. ३० शके १६४६). *If this date be correct, this letter may be of the same date. It explains that Pilaji owed his disfavour to Shahu and not to the Peshwa, and confirms the substance of a letter quoted by Rajwade on p. 66 of his Vol. II. The letter seems to be written by Mahadoba Purandare and contains Shahu's orders to confiscate all property of Pilaji Jadhav.*

---

१ दाणादाण, परागन्दा.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 4] [1724 ?

श्री

पुरवणी राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

सेवेसी विनंती. राजश्री पिलाजी जाधव व त्यांचे कबिले कोटांत ठेविले, त्याजपाशीं अगत्याअगत्ये चाकरीचीं माणसें मुदबखी व चाकर व कुणबिणी यैसी नेमस्तच ठेवावयाची ते ठेवली आहेत. वरकड चाकरीचीं माणसें होती ते अवघीं कोटाबाहेर ठेवलीं आहेत. जेव्हां ज्याचें प्रयोजन लागतें तेव्हां त्यास परवानगी देतों. परवानगीखेरीज कोण्ही जात येत नाहीं. स्वामीची आज्ञा होती कीं, यांच्या पोटास लागेल तें राजश्री राणोजी शिंदे यास लेहोन तेथून आणवणें. त्यावरून त्यास पत्र पाठऊन जिनस आणविला आहे. तो वाणियापासी ठेऊन रोजबरोज लागेल तें देत जाऊं. जिनस आणविला त्याची यादी अलाहिदा पाठविली आहे त्यावरून विदित होईल. याखेरीज हिंग जिरें मिरे पानसुपारी तमाखू वगैरे किरकोळ जिन्नस लागल तो आपणांपासून द्यावा लागतो. पावला (?) मधें यास ठेविलें होतें, तेथें दररोज येक बकरें यास देविलें होतें, त्याप्रमाणें येथेंहि पाहिजे. याकरितां येविषयींहि राणोजी शिंदे यास लेहोन अणविलीं आहेत. त्याचें उपसाहित्यें देखील द्यावें लागतें. शेवेसी श्रुत जालें पाहिजे हें विनंती.

¶ *The letter mentions how Pilaji Jadhav and his family were kept in confinement.*

[7-2-1727 ?

No. 5]

श्रीभवानीप्रसन्न

पो छ २८ जाखर

सेवेसी विनंती. सेवक येमाजी सिवदेऊ कृतानेक विज्ञापना. ता २६ जमादिलाखर भोमवासर मुकाम मसूर साहेबाचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. साहेबी आज्ञापत्र पाठविले ते प्रविष्ट जाले. येविसीची विनंती सेवेसी स्वमुखे करणे लागती. जे समई साहेबाचे पाय दृष्टीस पडतील ते समई सेवेसी विज्ञापना करीन. सेवेसी श्रुत होये. पाच रुा हुजरियास आज्ञेप्रमाणे प्रविष्ट केले. हे विज्ञापना.

¶ *Yamaji Shivdeo, the Pratinidhi's Mutalik, shows his readiness to serve Shahu.*

1532

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 6] [9-4-1727

श्री

यादीदास्त दारू रवानगी सातारा सन्निध माहाराज राजश्री छत्रपति स्वामी मो सातारा. दारू जंजिरे सुवर्णदुर्ग पो सुहूर सन सबा असरीन मयां व अलफ रवांनगी बाा राा संकराजी कृष्ण व भिकनखान दारूभरीत खलिते खंडकी काली चामढियाचे, खलितेयांत सुमार ११९, येकूण दारूभरीत वजन खरे. छ २७ माहे साबान.

बारीक दारू दर	दारू वजन खरे खंडी	खलिते सुमार
खलितेयांत ८१॥।	४॥।३	९६
मोठी दारू दर खलिता वजन खरे	३॥१॥।.	४१
वजन ८१॥। प्राा वजन खंडी रंजकी बारीक खलिते १८ येाा १।३ प्राा १६ दर ८१॥। प्राा ८२।. प्राा २ दर ८१८९ प्राा	१॥।.	१८
१॥.।.	१०८.	११९

येकूण वजन खरे दाहा खंडी येकूण खलिते सुमार येकसेपंधरा रवाना केले असेत.

लेखन सीमा.

¶*Shahu used to obtain his stock of ammunition for Satara from the Angria at Suvarnadurg.*

No. 7] [25-9-1727

रोा रोजकीर्दी.

माहे सफर सुाा समान

तेरीख २० रोज आस्विन बहुल शष्टीसहसतमी इंदुवासर.

राा माधवराऊ प्रयाग प्रभु हुजूर उमेदवार होते. स्वामीकार्याचे मर्दाने देखोन स्वामी याजवर कृपाळू. राा जानोजी निंबाळकर दिमती चिरंजीव

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राजश्री फतेसींग भोसले याची जमेनिसी सांगोन याचे मुतालीक नरसो गणेश प्रभु जमेनिसीचे प्रयोजनास पाठविले. यासी वेतन सालीना दो चाकर होन पाा २०००.

यासी जमा गोपाल शंकर सभासद किले सातारा.

¶*Madhavrao Prayag Prabhu is given the Jamenisi of Janoji Nimlalkar attached to Fattesing Bhonsle.*

No. 8] [*1727?*

श्री

पैा छ ७(?) जमादिलोवल.

विनंती उपर. बांडे गाईकवाडियांचे वकील राजकारणे लागली आहेत. तैसेच उमाबाईकडील पत्रावर पत्रे येतात. राजश्री कान्होजी भोसले यांचाहि वकील आहे, त्याचे राजकारण दाट नाही, परंतु आहे; केवल नाहीसे नाही. सिदोजी निंबालकर याचाहि वकील आहे. राजकारण लाविले आहे. परतु त्याचे त्रस्णेच्या अर्थप्रमाणे हे देतीलसा अर्थ दिसत नाहीं. पुसद पंचगव्हान वगैर च्यार माहाल जुजबी देऊं म्हणतात. त्यावर त्याची त्रस्णा पुर्ती होणे दिसत नाही. राजश्री प्रतिनिधीकडीलहि अर्जिया वरचेवरी येतात. काये लिहितात हे न कले. येकून यैसी सकळांची सुसंधाने प्रथकाकार. वैमनस तुम्हासी. याकरिताच तांत्र चंचल. त्या फुटीमुले वरकडी आपलेच विचारे पराक्रमे काही या कर्मास प्रवर्तावेसे नाही. सारांश आपली निस्टा राजश्री स्वामीचे पायांसी द्रढतर आहे. श्रीकृपेने द्वेश करणार फजीत पावतीलच. परंतु लोकांचा काही ताल आहेसे नाहीं. आम्हास त्या गोस्टी लिहिणे आपले स्वरूपास योग्य नव्हे. बांडे गाईकवाडी वगैरे यांचे मधेस्तीत ध्रतरास्ट माहा दुरबुध. याचा आपण भरवसा विस्वास चितात आणितील तरीं आणिला न पाहिजे. आपणास पत्रे गोड माईक लिहीत आसेल, त्यावर न जावे. बुधि बरी नाही. हरकैसे मुख्याची खुशामत करून औरंगाबादेची सुबेदारी प्राप्त व्हावी, हे मानस होते. त्यास ते गोस्टी न जाली. जागिरांतचे काम त्याजकडे आहे. त्यावर त्रस्णा पुर्ती नाहीं. परंतु कपटबुधीचा सागर. यैवजखाजीच्या पुत्राच्या मिथ्या चुगल्या सांगून सर्वस्व हरण केले. आटोलियाकडील गढिया खेडिले प्रांती होत्या त्यास उपद्वाप करून पाडून टाकिल्या. सारांश उपद्वापाच्या कर्मास तत्पर व माहादुर्बुधि आहे. आपण विस्वास न धरावा. मुख्याची गोस्टी कपट-वेश करून पड घेतली आहे. आंतरी सर्व उद्योग तुमचा. आपले मानास चुकत नाही. पठाणास पत्रे वरचेवरी गेली. प्रतीक्षा त्याची करितो. येकून

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

मानसी विचार हा कीं, सर्व सिधी जालियां उद्योग तुमचा करावा. याकरिता याचे पडिवार व मायावी कर्मावर आसावध राहविसे नाही. गडी कोट किले सरंजाम आपले विचारात आसावे. लोकाचे कबिले वरकडी आपला विचार सावधतेचा करावयासी चुकाविसे नाही. तुम्ही+ दीर्घद्रिस्टे आहे. आम्ही लिहिणे काय? श्रीकृपेने सर्व फजीत पडतील. तुमचा बोल उपर होईल. बहुत कार्ये लिहिणे? लोभ आसो दीजे, हे विनंती.

¶*Appears to be a news-letter from the Nizam's camp. The writer gives a caution to Bajirao regarding the intrigues of various men against the Peshwa at the court of the Nizam. The state of things described in the letter points to the early career of Bajirao.*

No. 9] [*1727 ?*

राजेश्री बाजीराऊ बलाळ प्रधान गोसावियासी

॥ श्रीमत्सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये स्नो सवाई रामचेंद्र राजे सोंधे शरणशरणार्थी. उपरी, येथील कुषल जाणोन स्वानंदवैभव क्षणेक्षणे लेखन करवाऊन चित्त सानांदित करीत गेले पाहिजे. यानंतर गोसावियानी परपूर्ण दया करून प्रेषिले पत्र प्रविष्ट होऊन परम हर्षायमान जाहलो. पत्रार्थ जे, आमचे सर्वाभिमान आपणास पावले आहे म्हणोन, तरी गोसावियासी आर्त बधुत्वादि परम सोजन्येव्रत व गोसावियास सहजस्वाभाविकच. आता ते गुण-प्रकाश होवे याकरिता आम्ही केवल आर्तत्वे अनाथ होऊन अत्यंत श्रम पावत असता, आमचे वडिलांची पुण्योदयच गोसाव्याचे चित्तारूढ होऊन, गोसाव्याचे कृपावलोकनप्रभा आम्हावरी विराजमान होऊन, रा। यादवराऊ कोनेरी हेजीब यास पाठऊन आमचे सुखदु:खाची परामर्ष करवाऊन, आमचे अत्यंत श्रम दूर करून साभिमानून पुढे आमचे स्थापना करावियाची, तैसेच आचंद्रार्क उधार करावे याची ममत्वाभिप्राऊ पत्री व हेजीब मशारनिल्हेचे मुखवचनच आपुले वाक्ये ऐसे म्हणून प्रेषिले. यास हे समंधे आम्ही सर्वस्वी रिक्त होऊन गोसावियास शैशवरूपी गोसावियाचे वोटीत पडलो आहो. यावरी प्रतिपालना करावयास गोसावी समर्थ अहा. अता आम्ही रा। हेजीब मशारानिलेचे वाक्यें आमचे ऐसे गोसावियानी चित्तास आणावे. याकरिता रा। हेजीब मशारनिले बराबरी जासुदजोडाहि देऊन आम्हास विदेसप्राप्ति जाहलेचे सकल वृत्तांत आणि आम्ही विराटनगरास

\+ यापुढील मजकूर निराळ्या वळणाचा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येतांच सियादतपन्हा अहमदशहा कादरी पीरजादे याणी केवल साभिमान धरून एकबालपन्हा नवाब अवदुल सतारखान याचे भेटी करवाऊन साभिमानिले. त्यावरी आयेकबालपन्हा नवाब अबदुल महजीदखान याची अनुसंधान घेऊन हे स्थळ राहून पुढे आम्हास गोसावियाचे पदरी घ * * * आमचे मनोरथ सिद्धीस पावावे म्हणोन योजिलेचे आणि आम्ही आता सर्वस्वी श्रम पावावे याचे सविस्तर हेजीब मशारनिल्हेस सांगितले आहेत. द्रष्टीनेहि पाहिले आहे ते प्रगटिलेवरून स्वांतरस आणोन अचेंद्रार्क माहत्कीर्ती संपादना करावी. आम्ही सर्वस्वी गोसावियाचे पाठीस पडलो आहो. गोसावी आमचे साभिमान आंगिकार केले. यांस " न भवाति पुनरुक्ति भाषितं सज्जनानां " ऐसे नीति रीति स्वावाक्ये सिधांत करावयास गोसावी सत्यसंकल्प अहा. याविषयीं आम्ही सर्वथा अंतर पडणार नाही. ऐसे असतां गोसावियास सकलसूक्ष्मज्ञाप्रति विशेष लिहिणे काये असे ?

(शिक्का)

¶*Sawai Ramchandra, Raja of Sondha, writes to Bajirao imploring his protection and reinstatement to his position.*

No. 10] [*21-5-1728 ?*

श्री

छ २२ सवाल

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. स्वामीनी पुणाहून हिशेब पाठविला होता त्या मध्ये छ २३ रबिलोवल पोतापैकी उसणे निा राजश्री क्रस्णराऊ माहादेव ता गोविंद क्रस्ण रुपये ३००० तीन हजार खर्च पडिला होता. त्यावरून श्रीमंत राजश्री नानानी दोनच्यार वेला उभयेतास पत्रे पाठविलीं, परंतु त्याणी उत्तर पाठविले नाही, वैशाख मास निवेता राजश्री क्रस्णराऊ याणी पत्र पाठविले की, रुपये उसणे घेतले आहेत परंतु त्याचा हिसेब गोविंद क्रस्ण यास ठावका आहे, त्यास लेहून पाठविले आहे. त्याचे उतर आलियावर लेहून पाठऊन म्हणून पत्र पाठविले. त्यास सांप्रत मातुश्री सिऊबाई

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यांणी सदरहु तीन हजार रुपयांच्या हुंड्या पाठविल्या त्या छ १७ सवाली प्रविष्ट जाल्या. साहुकारी निसा करून दिल्हा तो ऐवज मुदती छ २४ सवाल जमा पोता रुपये :

११९०	गुा आंताबा नाईक भिडे
११९०	गुा त्रिक्रमसेट गुजर
७००	गुा नाराबा नाईक आनगल
३०००	

येकूण तीन हजार रुपये पावले. स्वामींस वर्तमान कलावे याकरिता लिहिले आसे. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Purandare to Chimaji, accounting for a loan to be received from Krishnarao Mahadeo Chaskar and reporting that the latter's mother Shiubai had paid back the amount.*

No. 11] [*13-11-1728*

श्री

गणपती दिा धायेगुडे छ २१ राखर सुा
तिसा आसरीन मया अलफ.

	आज घोडी	थोर	लाहाण
हिरोजी कऱ्हाडे	५	३	२
कडजोजी धायेगुडे	८	५	३
मानाजी धायेगुडे	२	२	०
मल्हारजी धायेगुडे	८	६	२
दामाजी धायेगुडे	८	५	३
राणोजी धायेगुडे	१	१	०
शामराऊ सिलेदार	७	६	१
पागा शामराऊ	२५	१७	८
महिपतराऊ	३५	२७	८
संताजी माडकर	३	२	१
बहीरजी उलकुदे	३	२	१
आपाजी मितखार	३	२	१
खानाजी धायेगुडे	३	२	१
राघोजी आवचट	३	२	१
बहिरोपंत धायेगुडे	३५	२५	१०
कारकून बाबूराऊ	२	२	०
	१५१	१०९	४२

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

गणती दिा सकोजी निकम.

खासा सकोजी निकम	१२	८	४
मानाजी पवार व संताजी पवार	१०	७	३
रामजी आरेकर	५	५	०
हणमंतराऊ	८	६	२
कारकून	१	१	०
	३६	२७	९

¶*Muster of cavalry-men (and their horses) in the service of Dhayagude.*

No. 12] [*1728 ?*

श्री

यांसी आज्ञा येसीजे. आलीकडेस तुमचा मुकाम कोठे आहे, काय मनसबा योजिला आहे, हे कलत नाहीं. राजश्री धर्माजी राम व सिवाजी खांडकर तुम्हाकडेस पत्रे देऊन पाठविले ते पावलेच असतील. तुम्ही साहेबाचे येकनिष्ठ कार्याचे हिंदु सेवक, याजस्तव साहेब तुम्हावरी बहुत सदयेचिते कृपा करीत असता हालीं तुम्हीं काहीं विपर्यास[१] चितात आणून दुसरियाचा आश्रा करून साहेबांच्या राज्यास अपाये करावा, आपले येकनिष्टतेस बोल लावून घ्यावा, यात फायेदा आहेसे नाही. हे तुम्हा लोकास उतम नव्हे. विश्वासघातकी स्वामीद्रोही जे जाले त्याचा परिणाम कलतच आहे. आपल्या वौषजपणांस अंतर न घडतां अवघ्या गोष्टी येकीकडे ठेऊन दुसरियाचा पक्ष न धरितां साहेबांचे राज्यांचें कल्याण आणि तुमचे स्वहित, जन बरे म्हणे येसा विचार मनसबा करणे. येणेकरून साहेबास समाधान आहे. दिवसेदिवस तुमचे उर्जित होऊन साहेब संतोश्री होत तो विचार करणे. परराज्य साधे साहेबांचा चौका[२] बसे ठाणी व जागे[३] साध्य होत, काटक[४] हाता खाले घेऊन दुष्टास नतीजा[५] पावे येसा येत्नउपाय करणे. तुम्ही साहेबांचे विश्वासू सेवक इतबारी आहा. आपल्या थोरपणाप्रमाणे स्वामिकार्य करून साहेबास संतोष पाववाल हा साहेबास भरवसाच आहे. आमच्या

---

१ विपर्यास=भलती गोष्ट, वांकडेपणा. २ चौका=दबाव. ३ जागे=मू. श. जागा (पु.)=स्थळें.
४ काटक=एक लढाऊ व लुटारू जात. ५ नतीजा=शासन.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

स्वराज्यात रयतेस उपद्रव लागो न देणे. कोणी दुष्ट शत्रू लबाडी करितील त्यास शासन करणे. तुहीं येख्तयारी[1] सेवक म्हणवीत आहा यैसे जाणून हे पत्र तुम्हास पाठविले आहे.

¶*This letter, unfortunately without date and without the names of either the writer or the addressee, is nevertheless very important historically as it contains the aims and the ideals of Shahu as a king, addressed almost in his own words to some important sardar deserting to the enemy, may be Chandrasen Jadhao, Kanhoji Bhonsle or Trimbakrao Dabhade.. Says Shahu, "You have been a loyal Hindu servant of the state and as such we have all along dealt with you very kindly. You have nevertheless deserted to the enemy taking offence at something we do not know, and are endeavouring to ruin the Maratha state. What do you gain by spoiling your loyalty? Such conduct is not right for persons like you. You know what fate traitors meet with. Therefore I beseech you to leave aside all wrongs, to remember your ancestry and to do good to the state without going over to the enemy, so that your conduct might command respect from your brethren. You must think rather of executing your commands and increasing favours from us. That alone will satisfy us. You must conquer enemies' kingdoms and establish Maratha posts at different places. You must create a strong army and punish the wicked enemies. We address this warning to you with full confidence that you have been a loyal servant of the state and as such would readily execute your master's commands. On no account should you molest the ryots in our Swarajya but chastise the wicked enemies away. We trust you will take this warning in its proper spirit."*

No. 13] [*1728 ?*

श्री

पुरवणी राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामीनी पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले. लिहिले वर्तमान कलों आले. याउपरीं राजश्री स्वामीची मर्जी आपण स्वता बोलता पाहिली की, तीर्थरूप राजश्री राऊ स्वामीची मर्जी अवघ्यानी पालावी, त्यांच्या चितास क्षोभ करू नये. यैसा प्रसंग येथील द्रिस्टीस पडिला तो लिहिला असे. पुढे आढलेंल वर्तमान ते लेहून पाठऊन. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer, probably Purandare, informs Chimaji Appa of the instructions of Shahu that all should obey Bajirao implicitly and no one should offend him.*

---

१ येख्तयारी=येख्त्यारी=जबाबदार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 14] [*1728 ?*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी. पांढऱ्याकडील राजश्री रामराव यास राजश्री पंतप्रतिनिधीनी निरोप देविला, तेव्हां पांढऱ्यास डबीरी कागद सहीचा मागितला. त्यास पारसनिसांचा व राजश्री सुमंताचा निशाणामुलें (क) टाक्ष पडिला आहे, म्हणून प्रस्तुत डबीरी कागद तटले आहेत. त्यास पांढऱ्याच्या कागदावर सही करून द्यावयास राजश्री पंतप्रतिनिधि * राजश्री कृष्णराव यांस उठऊं लागले. तेव्हां न उठले. व त्याजकडील नारोपंतहि न उठले. बहुतसा आग्रह केला. परंतु दस्कत द्यावयासी उठले नाहीं. मग राजश्री पंतप्रतिनिधि खासाच उठले. बोलिलें कीं सुमंत आमचे भाऊ आहेत. या कागदासाठीं रुसले तरी आम्ही समजाऊं यैसें बोलिले. परंतु राजश्रीनी पहिल्यानें अनमान केला. बोलिलें कीं त्यांजबगर तुमचे हातीं कसा कागद द्यावा यैसें बोलिले. त्यावरी प्रतिनिधिपंताही बहुतसा अत्याग्रह केला. म्हणून दस्कत करून कागद दिल्हा. स्वामीस कलावें म्हणून लिहिले आहे. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶Malhar Tukdeo Purandare reports to Bajirao and his brother how the Pratinidhi and the Sumant, two Ministers of Shahu, were at loggerheads in his court. The whole letter is in Purandare's hand.

No. 15] [*1728 ?*

छ ९ रावल

श्री

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री चिमाजी आपा यांसी बाजीराऊ बलाळ आशीर्वाद. उपरी, येथील कुशल ताा छ २९ सफर जाणून स्वकीये लिहिणे विशेष. मानाजी संकपाळ व प्यादे व लोहोगडकरी याजबाा राजश्री स्वामीकडील रुाो १२६५६ बारा हजार सासे छपन रुाो

६३२८ राजश्री फतेसिंग बावाकडील
६३२८ आम्हाकडील.

१२६५६
1540

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बारा हजार सासे छपन रुपये पाठविले ते पावले. कळले पाहिजे. थैल्या व रुमाल मानाजी संकपाळ याचे हवाले केले. सदरहू रुोचा जा(ब) राजश्री स्वामीचे नावे पाठविला आहे, हा राजश्री अंबाजीपंताकडे पाठवणे. लोभ+ असो दीजे हा आशीर्वाद.

¶*Bajirao Ballal to Chimaji, acknowledges receipt of money to be forwarded to Shahu.*

No. 16] [*1730?*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यासी,

॥ श्रीमत्सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २१ जाालाखरपावेतो येथास्थित असे विशेष. किले कोहजगड[1] येथे ब्राह्मण मारिला म्हणून तेथील हवालदार दूर करून दुसरा हवालदार आपण पाठविला. तरी ब्राह्मण मारिला तेसमईं राा शंकराजी केशव वगैरे सरदार गडचे होते. यैसियासी येकल्या हवालदारावरीच निमित्य आणून त्याचा रोजगार दूर केला. तरी राजश्री कान्होजी अंगरे सरखेल याणी हिरोजी पासलकर आपले हातीं दिल्हे आहेत. त्याचे चालवणे आपणास अगत्य आहे. सांप्रत हिरोजी पासलकर आपणापासी आले आहेत. तरी किलाचे सरनोबत व शंकराजी केशव वगैरे सरदार पांचजण आणून याचा बरहक[2] इनसाफ मनास आणून याकडे अन्याय खराच जाला तरी रोजगारापासून दूर जालेच आहेत. पुढे पोट भरायासी जागा नाहीं. आणि इनसाफ अन्याये याकडे नसेल तरी हिरोजी पासलकराने बहुत दिवस या राज्यात चाकरी केली आहे, त्याचे चालवणार आपण खावंद आहेत. विशेष काये लिहिणे? कृपा केली पाहिजे, हे विनंती.

[शिक्का]

मोर्तब सुद.

¶*Pilaji Jadhao recommends to the Peshwa a reconsideration of the offence of murder brought against Hiroji Pasalkar and his dismissal from service in consequence.*

+ Writer's hand. १ नि. ठाणें, ता. वाडें २ न्यायानें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 17] *[1737?*

पो छ ३ सवाल

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री बाबूराऊ फडणीस यासी चिमणाजी बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें लिहीत जाणें विशेष. रा मोरसेट करंजे याजपासी रुपये ५००० पाच हजार मागितले. त्याणीं रा बापूभट मोघे यांजपासून ऐवज देविला. त्याणी ऐवज तलेगावास मोरसेट करंजे याचें घरीं पाठविला असला तर मोरसेट करंजे यांचे पत्र तलेगावी आपाजी करंजे आहेत त्यांस पत्र लेहूंन पाठविले आहे ते ऐवज तुम्हाकडे पाठऊंन देतील. बापूजीभट मोघे याणी ऐवज मशारनिलेचे घरीं तलेगावीं पाठविला नसला तर बापूभट मोघे यास मोरसेट करंजे यांणी पत्र लेहून दिल्हें आहे ते तुम्हाकडे पाठवितील, तुम्हीं ऐवज त्यांजपासून मागोन घेणें. त्याणी हजार दोंन हजार रुपये कमी केले अथवा साराच ऐवज दिल्हा नाहीं तरी तुम्हीं आपाजी करंजे यास तलेगांवास लेहून पाठऊन पांच हजार रुपये आणवणें, आणि बराबर माणसे बोझ्यास देऊन रा शंकराजी केशव यांजकडे वसईस रवाना करणें. रा छ १६ रमजान. ऐवज रवाना करून जाब आणून पाठऊन देणें; व पुण्याहून ऐवज रवाना केलियावर जासूद पाठविला आहे याजबराबर पत्र लेहून पाठवणें. हे आसीर्वाद.

¶*Chimaji Appa writes to Baburao Ram Phadnis asking him to send Rs. 5,000 to Shankaraji Kesheo at Bassein.*

No. 18] *[12-4-1729*

पो छ १४ सवाल मुा पावल

श्री

* * श्री राज्याभिषेक शके ५५ सौम्यनाम संवत्सर चैत्र बहुल दशमी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस राजा शाहु छत्रपति स्वामी याणी समस्तराजकार्यधुरंधरविश्वासनिधि राजमान्य राजश्री चिमणाजी बल्लाल यासी आज्ञा केली ऐसीजे. प्रस्तुत छावणीचे दिवस समीप आले व पुढे चातुर्मासांत कितेक मनसुब्याचा विचार करावा लागतो, याकरिता राजश्री बाजीराव पंडित प्रधान यास संनिध यावयाची आज्ञा केली असे. तुम्हीहि त्या प्रांते गुंतोन राहावें यैसें नाही. लष्करचाहि प्रसंग कलतच आहे. याकरितां कुल फौजेनसी स्वामीच्या दर्शनास येणें. राजश्री उदाजी पवार यासहि घेऊन येणे. मार्गी येता बहुत

1542

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सावधपणे एणें या * * * हरजी मोरा व संताजी कालकुटा व लिंगोजी * * * दिमती लेंबे[1] पाठविले असेत यासी दर रुपये ४० चालीस, एकूण रुपये एकसेवीस १२० रास देविले, देणे.

देखंत[+] पत्र येन देसास छावनीस. बहुत काय लिहीन. सुदन असा.

बार.

No. 19] [7-5-1729

छ २२ सवाल.

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. दरबारीचें वर्तमान तर राजश्री कुसाजी भोसले व राजश्री नारो राम मंत्री व त्र्यंबकराव दाभाडे सेनाखासखेल व सिदोजीराऊ निंबालकर दक्षणप्रांते मसलतेस गेले होते. मसलत करून माघारे आले. छ १९ सवाली बुधवारी दोप्रहरा राजश्री स्वामीचे दर्शन घेतले. स्वामीस वर्तमान कळावे याकरिता लिहिले असें. याउपरी सरदारास निरोप जालियावर सविस्तर वर्तमान लेहून पाठऊन. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Purandare to Chimaji Appa : communicates the return of Naro Ram, Kusaji Bhonsle and Trimbakrao Dabhade from an expedition into the Karnatak.*

No. 20] [1-7-1729

श्री

श्री ०
शंकर चरणी तत्पर
मोरो गोपाळ नीरतर :

कौलनामा अजसुभा राजेश्री मोरो गोपाल नामजाद व कारकून सात माहाल प्रा जुंनर ता मोकदम मौजे तिफनवाडी ता वाडे सु सन सलासीन मया

---

१ निरोप नेणारे जासूद. + Shahu's hand. He orders Bajirao to come to Satara at once with Udaji Pawar.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अलफ. दादे कौलनामा थैसीजे. तुम्हास हुजूर अणून रजा फर्माविली कीं, साल मजकूरची खंडणी करणे. त्यावरून तुम्ही व देशमूख व देशपांडिये यांनी अर्ज केला बराये अर्ज खातरेस अणून रयेतीवर नजर देऊन तुमचे मुदेमाफिक खडणी केली असे बिलकूल काबिला दस्तुरी मुकरा बेरीज.

रुपये
४९ श्वराज्य
१४॥ यैन
१४॥ बाबती
७॥ सरदेशमूख
१॥। साहोत्रा
२ भेटी
१ तुपकानू
३॥। माहाल मार
४९
———
२९ मोगलाई
———
७४

यकून चवऱ्यातर रुपये याची उगवणी करून कीर्द आबादानी करून सुखरूप राहाणे; दरिबाब कौल आसे. रा छ १९ माहे जिल्हेज मोर्तबसुद

मोर्तब सुद.

¶*This paper mentions the Government dues which used to be collected from the rayats.*

No. 21] [*16-8-1729 ?*

श्री

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री
पंतप्रधान ता राजश्री चिमाजी आपा यांसीं

प्रति सिऊबाई कृतानेक आशिरवाद. येथील कुशल ता भाद्रपद शुध त्रितीया मंदवासर मु। कल्याण जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष.

+ वरील कागद जमाव दप्तर पुणें यांपैकीं असून त्यांत वसुलाची स्पष्टता आहे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

चिरंजीव राजश्री कृष्णराव सातारियास गेले म्हणून आपण लिहिलें. त्यास आम्हाजवळी तो जातेसमई बोलिले कीं, आपण श्री जेजुरीस जातों आणि सवेच परतोन येतों. ऐसे असोन सातारियास गेले तरी ये गोष्टीचा आपण विचार काय काढिला आहे? आमचे विचारे ते सातारियास गेले आहेत तेथें मनास येईसा कोणाचे बोले खर्च करितील, लोकाचे कर्जवाम करून भलत्यास भलतेच देऊ करितील. त्याचा आटोप करणे लागतो व युक्तीचे वाटेने त्याला हाताखाली घालावे हे उत्तम आहे. त्यास येविसी राजश्री अंबाजीपंत यास आपण पत्र लेहून पाठवावें कीं, कृष्णराव तेथे आहेत त्याची बोलीचाली मनास आणून याचे मुदे जे असतील ते कबूल करून त्यास इकडे पाठऊन देणे. ऐसे राजश्री अंबाजीपंत यास पत्र ल्याहावें व चिरंजीव राजश्री कृष्णराव यास एक समाधानपत्र लेहून पाठवावें कीं, तुम्ही सातारियास काय निमित्य गेलेस? जे तुमची बोली व मुदे असतील ते लेहून पाठवणे व तुम्ही आम्हाजवळीं येणें. जे मुदे असतील ते मान्य करून चालऊं. ऐसे समाधानपत्र लेहून ते आपणाजवळी ये ते करावें. लक्ष प्रकारें त्याला येत्न येत्ने करून आपणाजवळी आणावें. तुमचे विचारे सातारियाचे सावकारास ल्याहावें ऐसे असिलें तरी लेहून पाठवणे कीं, कृष्णराव रुसोन गेले आहेत, ते कांही कर्जवाम मागतील तरी न देणे. ऐसे पत्र आपले विचारे ल्याहावेंसे असिले तरी लिहिले पाहिजे. आपले विच्यारे न ल्याहावेसे असिले तरी न ल्याहावें. राजश्री स्वामीस आपले नावें पत्र ल्याहावें कीं, राजश्री कृष्णराव आम्हाजवळून रुसोन आले आहेत. त्याची समजावीस करून आम्हाकडे पाठवावे. आपले विचारे आपले नावें पत्र न ल्याहावें ऐसे असिले तरी आमचे नावे राजश्रीस येक पत्र ल्याहावें की, कृष्णराव रुसोन आले आहेत, त्याचें समाधान करून राजश्री पंतप्रधान यांजकडे पाठऊन देणे. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हा आसीर्वाद.

¶*Shiubai Joshi Chaskar, Bajirao's mother-in-law, writes to him to prevent her son Krishnarao contracting debts, etc., at Satara.*

No. 22] *[27-12-1729 ?*

छ २० जमादिलाखर मुकाम वडोदरे.

श्री

श्रीमंतर राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. आज्ञाधारक बयाजी साखरे मुकाम किल्ले पावागड सेवेसी विज्ञाति ती जें. छ १७ जमादिलाखरीं मंदवारीं स्वामीचें आज्ञापत्र आलें तें शिरीं वंदून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अभिप्राय मनास आणिला. बहुत खुशाली केली तें पत्री लिहितां पुरवत नाहीं. तीर्थरूप राजश्री कृष्णाजी कदम बाबा त्याचा प्रसंग ऐसा जाला. ते स्वामीच्या पदरीं पडिले होते त्याजमुळें ऐसें जालें. त्याजमागें आपण आहो. त्याचे स्वामी चालवितेच. आतां आपण पदरीं पडतों. त्यांनीं स्वामीजवळ राजश्री हरि बल्लाळ पाठविला होता. त्यास हल्लीं राजश्री हरि बल्लाळ किलियावरी आपलें संनिध आहेत. स्वामी बडोदियास आलियावरी राजश्री हरि बल्लाळ सेवसी पाठऊन सेवेसी विनंती करितील त्याजप्रमाणें माने[1] करून आम्हास शपथपूर्वक अभयपत्र पाठवणें म्हणजे आपण सर्वस्वें पदरीं पडतों. राजश्री कंठाजी बांडे किलियाखाले चांपानेरच्या कोटांत आहेत. आपण मार देतों. स्वामीच्या प्रतापें कोण्हे गोष्टीची फिकीर नाहीं. व स्वामीस कार्यामुळें विलंब लागला तर पांच सात हजार स्वार दुसरे रवाना करणें म्हणजे आपण दुष्मानांस मारून लुटून घेऊन, म्हणजे सेवकाचें साहे होईल. विशेष काय लिहिणें हे विज्ञाप्ति.

¶*Bayaji Sakre to Bajirao, requesting the addressee to promote the writer's interests particularly after the fall of his patron Krishnaji Bande. Kanthaji Bande, the writer adds, is in the fort of Champaner.*

No. 23] [पैाा *12-9-1729*?

छ २९ सफर

श्री

श्रीमंत महाराज राजश्री साहेब स्वामीचे शेवेसी

विज्ञापना ऐसीजे. आम्ही फौज सुधां अहमदाबादेहून निघालो ते दरजमल खंबाइतास आलो. मोगलानें सारे शहर लुटलें आणि अमलहि सुधा कराराप्रमाणें न चाले, यास्तव येथे आलों. मोगलाने रदबदल लाविली आहे. सुधामतप्रमाणें चालल्यास येथील गुंता उरकून सत्वरच निघोन जाऊं. आज दोन वर्षें दुवीमुळें खंबाइत परगणा सारा खराब. येक गांव वस्ता न मिळे. सालमजकुरी चौभाग चाळीस हजार जमा होणे कठीण. मोगलाची बदनजर, यामुळें शहर वोस होऊन गेलें असा विचार आहे. हे दिवस गुंतावयाचे नव्हेत. याजकरिता निकाल मात्र काढून जातों. परंतु याचें पारपत्य केलेच पाहिजे. पुढें स्वामीच्या पुण्येप्रतापे होईल तें पाहतच आहो. दुसरे वर्तमान सोरट काठेवाड व झामवाड व पटण या प्रांतीं पाऊस अगदीं नाहीं. मुल्क अगदी उद्वस जाहला. का व चवाले असे चारपांच हजार जमा होऊन वस्ती असेल ते लुटून नेहतात

---

१ मान्य.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अहमदाबादे पावेतों स्वाऱ्या करितात. बहादरखान जुन्यागडवाला यासीं अजार होऊन भाद्रपद श्रुा दशमीस मृत्य पावला. या करितां तिकडे फार दंगा आहे. आम्ही येथील गुंता उरकून दरमजल तिकडे जात आहों. राजश्री दमाजी बाबाचा माार पेशजी विनंतीपत्री लिहिलाच आहे. परंतु धण्याचे मर्जीस येत असेल की, हे त्यांची रदबदल करितात. तरी असा प्रकार आमचा नाहीं. परंतु प्रांतात चहुकडे बखेडा. हे फौजसुधां तूर्त समागमी चालतात. यासी निष्ठुर बोलावे तरी प्रसंगहि जिनस जिनस समाधानें सांगोन पाहिलें, तथापि त्याचे मानस नाहीं. मग आम्ही विरुद्ध मात्र करावें तेव्हा पुढे खावंदहि शब्द लावितील. आम्ही कर्जामुळें खराब. फौज सिबंदी ठेऊन देशांतर पाहावें म्हणोन योजितों त्यास हे समागमीं. स्वामीची मर्जी त्याप्रकारें जाहाली. आम्ही मात्र संकटांत. आपला प्रकार असा. दुसरे निमित्य त्याचें धणी ठेवणार. यास्तव हे विनंतीपत्र सेवेसीं पाठविले असे. पत्रांतील भाव पाहोन आज्ञा करणे ते करणार स्वामी समर्थ आहेत. चार महिने हे येत नाहींत हे प्रमाण. परंतु आम्हास सरकारची आज्ञा असल्यास निखालस चाकरी तरी घेतली जाती. आम्हास सत्तेने बोलावयास जागा नाहीं. ते तों जात नाहींत. यासी विनंती-प्रमाणें कृपा होईल तर उत्तम आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*This letter appears to be addressed to Shahu by Bajirao or his brother Chimaji. It explains how the Peshwas used to be hampered in their action, owing to Shahu not going out personally into a campaign.*

No. 24] [*1729?*

श्री

अपत्यें चिमाजीने साष्टांग नमस्कार विनंती. स्वामीनी आसीर्वादपत्र पाठविले ते पावले. जइथली पो मातार वगैरे येथील पारपत्य करणें, भगवंतसिंगापासून घोड्या आणवणे म्हणून आज्ञा केली. ऐसियांस, जईथलीचा मुदा शाबूंत करून पारपत्य करणे ते करून. भगवंतसिंग येथे आला नाहीं; राजश्री बाजी भिवराऊ याजपासीं आहे. त्यास येथे बोलाविला आहे. तो आला म्हणजे घोड्या आणऊन. कललें पाहिजे. ढवलक्याचा जोसी लक्ष्मीदास स्वामीपासीं आला आहे. त्यास निरोप न द्यावा. बराबर घेऊन यावें. तो प्रमाणिक उतम आहे. पेटलादकर आंमथा जोसी येथे आला आहे. हांहि प्रमाणिक आहे. हे विनंती.+ चोपॅड[१] व बुदवले खंबाइताहून आपण आणविली होती तीं आली

+ 'हे विनंती' शब्द चिमाजीच्या हातचे.

१ चौपट—सोंगट्या.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहेत. त्यास चोपडास पट पाहिजे. तरी स्वामीनीं तेथून नारंजी सकलादीचां पट करून आणविला पाहिजे. आमचा निमचा[1] येथे आहे, त्यास परज[2] पाहिजे. तर परजाचे सामान गोसावी करजगर यास सांगून घाटी वगैरे जे पाहिजे ते आणविले पाहिजे. हे विनंती.+

¶*Chimaji to Bajirao: explains his doings in Gujarat. Incidentally the paper mentions how Bajirao and his brother were always careful in acquiring useful articles of local craft, such as chess, songtis, etc., also horses and some men of learning and note.*

No. 25] [*1729 ?*

* * मोहरम

पुरवणी तिर्थरूप राजश्री राऊ व

तथा आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. उतरेकडील मनसबियाविसी पहिले राजश्री फतेसिंगबावानी स्वामीस लिहिले होते, त्याचे उतर स्वामीनी पाठविले, त्यात तपसीलवार ममतापूर्वक लिहिले नाही यामुले अपूर्व मानीत होते. प्रस्तुत आम्हास बोलाऊन सांगितले की, पहिले आम्ही व राजश्री पंतप्रधान समक्ष बोलिलों आहो, तदनरूप उतरेकडील मनसबा त्याणी आम्ही करावा, येविसी अंतर न करावे, यैसे लेहून उत्तर आणवणे. त्यावरून हे पत्र स्वामीस लिहिले असे. तरी त्यास समाधान वाटे यैसे पत्र आमच्या नावे लेहून पाठवावे म्हणजे आम्ही तेच पत्र त्यास दाखऊं विदित जाहले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadoba Purandare writes to Bajirao and Chimaji that Fatesingh Bhonsle was anxious to join in the Northern Campaign, which he desired should not be determined on without reference to Fatesingh.*

No. 26] [*1729 ?*

छ ६ मोहरम

तीर्थरूप राजश्री राऊ स्वामी वडिलांचे सेवेसी अपत्ये माहादाजी अंबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. आम्ही स्वामीच्या असीर्वादेकरून ता॥ छ १ जिल्हेजपरियेंत सुखरूप असो विशेष. स्वामीनी स्मरणपुरस्कर पत्र पाठविले ते उत्तम समई पावोन सनाथ जाहलो. इकडील सविस्तर वर्तमान राजश्री अपानी लिहिले अहे त्यावरून विदित होईल. सदैव असीर्वादपत्र पाठवावयासी अज्ञापित पाहिजे. सेवेसी * * * * हे विज्ञापना.[3]

¶*Mahadaji Purandare to Bajirao from some distant expedition.*

---

१ एक हत्यार   २ मूठ   + 'हे विनंती' शब्द चिमाजीच्या हातचे.

३ पत्र बाजीरावास बहुधा स्वारींतून. चिमाजीआपा व पुरंदरे ३१ दिवसांचे टप्यावर दूर आहेत

CC-0. Agamnigam Digital Preseyation Foundation, Chandigarh

No. 27] *[6-1-1730 ?*

श्री

श्रीमंत महाराज राजेश्री
राऊ साहेबाचें शेवेसी

आज्ञाधारक कुवरसिंग जमातदार रामराम विनंती उपरी. येथील क्षेम ता। पौष वद्य चतुर्दसींपावेतो साहेबांचें आसीर्वादेंकरून राजकोटीं येस्थास्थित असे विशेष. सालमजकुरीं राजश्री आपासाहेबास अगोधर च्यार घोडीं श्रावण मासीं घेतली होतीं तीं नेऊन दाखविलियाउपरी आपासाहेबीं घोडी पाहिली. मग आपण अर्ज केला जें, आपलें भाऊबंद भले माणूस आले आहेत. यैसियास साहेबीं आज्ञा केली तरी घोडीं घेऊ. त्याउपरी आपासाहेबीं आज्ञा केली जें, घोडीं घेणें; मग आपण घोडीं घेऊन भाऊबंदास दिल्हीं. परंतु चाकरीचें ठीक होत नाहीं. तेणेंकरून आपली सालमजकुरीं इजत राहात नाहीं. सालगुदस्तां कबिला आणिला तेथें लोकाचें देणे रुा हजारपावेतों होतें; तें येथे कर्ज घेऊन पाठविलें. घर बांधले त्यास रुा सात आठसेंपावेतों लागले व घोडी चौदा विकत घेतली, त्यासी रुा ३२०० बतिससें कर्ज घेऊन दिल्हे. येणेप्रमाणें लोकांचें देणे जाहाले आहे. याखेरीज व्याज काय होईल तें न कळें. यैसी हकिकत आपली संसारिकाची जाहाली आहे. आपली तो सालमजकुरीं इजत राहात नाही. गुजराथहून साहेबांचे आज्ञेवरून आलों. त्यास साहेबीं आपलें ऊर्जित केले होतें, परंतु सालमजकुरीं घोडीं घेऊन आपले घर बुडविलें. दरमाहे व्याज रुा १५० दीडसेंपावेतों वाढतात. येणेप्रमाणे सालमजकुरीं आपली संसाराची अवस्ता जाहाली आहे. माणुसपणातुन उठिलों आहे. साहेबीं हे गोष्टी चितांत आणून सेवकाचे ऊर्जित केले तरी उतम आहें; नाहीतर बरा विचार दिसत नाही. सेवेसी बहुत ल्याहावें यैसें नाही. हे विज्ञापना.

¶*Kuwarsingh Jamadar requests monetary help from Bajirao.*

No. 28] *[1730 ?*

श्री

राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान यासी

आज्ञा केली ऐसीजे. तुम्हास हुजूर यावयाविसीची दाहापाच आज्ञापत्रे सादर केली. परंतु यावयाचा विचार न केलात. ज्या ज्या युक्ती ल्याहाव्या, त्या त्या लिहिला असता, येकाहि पत्राचे उतर लेहून आला नाही हे स्वामीस अपूर्व दिसोन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आले आहे. याउपरी येणें असेल तरी, पत्रदर्शनी स्वार होऊन, हुजूर दर्शनास येणे. येविसीची आज्ञा, दर्याजी नाईक जासूद पाठविला आहे. सांगता कलो येईल. बहूत बहूत सिताबीने येणे याउपरी दिवसगतीवर न घालणे. सूज्ञ असा.

¶Shahu reprimands Bajirao for not obeying his summons to come to court immediately and orders him to come at once.

No. 29] [*1730-31*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक धोंडो राम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील वर्तमान ताा छ १२ शवाल मुाा ठाणे उंदीरखेडे स्वामीच्या कृपादृष्टीकरून यथास्थित असे विशेष. स्वामीनी भवानजी धनवडियाबाा आज्ञापत्र सादर केले तेथे आज्ञा की, दरमाहाचा येवज लौकर पाठवणें. येसियासी, बाबतीचें वर्तमान कदमाकडे साडेसोळा हजार रुपये नेमणूक; त्यास निमे सवाआठ हजार राजश्री रघोजी कदम याजकडे ते देशीहून रनाळियास आले. त्याजकडे कारकून माणसें पाठविली त्याणी आपल्या माहालकरियाकडे आमचे कारकून ठेऊन आपण गुजरात प्रांते गेले आणि माहालकरीयास पत्रें पाठविलीं कीं, राजश्री आपासी व आम्हासी विरुध आरंभिले आहे. बाबतीचा रुपया न देणे येसी पत्रें पाठविलीं तीं बजिनस माहालकरी यानी आमच्या कारकुनास दाखऊन उठऊन दिल्हे. बाकी सवाआठ हजार रुपये संताजी कदम याजकडे त्याणी सवासा हजार रुपयाची नेमणूक करून दिल्ही आहे. दोन हजार रुपये देत नाहीत. पिलाजी गायकवाड याजकडे तीन हजार रुपये नेमणूक. त्यांजकडे पत्रें पाठविलीं. त्याणीं पष्ट उत्तर दिल्हें की राजश्री आपा या प्रांतें आले; बेमबलग यैवज या प्रांतीं घेतला. याउपर बाबतीचा रुपया आम्हाकडे नाहीं, येसें साफ उत्तर लिहिलें. वरकडहि कितेक राजश्री सेनापतीकडील लोक वसुलास खलेल करितात. राजश्री मानाजी जाधव यांचा व राजश्री चिमणाजी पंडित दादा याजकडील आमीलासी कजिया आरंभिला आहे. यामुलें आमलनेरचा पैसा जाधव देत नाहींत येसा प्रसंग आहे. राा भावसिंगराऊ टोके याजकडील दोन हजार रुपये तो ते देतच नाहींत. येसा येवज चोकडील खोरला आहे. जकातीचा मार्ग अगदी सुरतप्रांतीचा बंद जाला आहे. सर्व निर्वाह करणार स्वामी समर्थ आहेत. कदमाकडील व गाईकवाड टोके याजकडील पैसा येत नाही. श्रुत होय. तूर्त दरमाहापैकी थोडा बहुत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येवज वेदमूर्ति राजश्री सदाशीवभटजी याजबा पाठविला आहे. सेवेसी प्रविष्ट होईल. साकल्य वृत्त भटजी निवेदन करितील. भवानजी धनवडा यासी आज्ञापत्रप्रा दाहा रुपये दिल्हे. सेवेसी श्रृत होय हे विज्ञाप्ति.

¶*Dhondo Ram, Peshwa's agent in Khandesh, informs him that the Kadams—Santaji and Raghuji—Pilaji Gaekwad and others have refused payment of the Babati due from them, and consequently he cannot realize the full amount from the Paragana.*

No. 30] [*17-11-1731 ?*

+ नकल १/१

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति
स्वामीचे सेवेसी

सेवेसी आज्ञाधारक मानाजी जाधव विज्ञापना यैसीजे. येथील क्षेम ता छ २८ जमादिलोवल मुकाम राहुरी प्रा संगमनेर माहाराजाचे कृपादृष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे. माहाराजांची आज्ञा घेऊन स्वार जालो ते कसबे मजकुरावर आलो. राजश्री चिमाजीपंत आपा पारनेरानजीक लोणीवर मुकाम होता. त्यास, तेथून फौज व पिलाजी जाधव तमाम पथके हुजरातीची दोन हजार फौज आम्हावरी रवाना केली. पिलाजी जाधवास हुकूम राजश्री चिमाजी-पंतानी केला की, मानाजी जाधवास लुटून त्यास धरून घेऊन येणे. जर त्याने हत्यार धरिले तरी त्यास मारून टाकणे. त्याचा जाब पडला तर आपण माहा-राजापासी देऊ. त्यास फौज घेऊन पिलाजी जाधव आम्हावर आला. आम्ही बेफाम होतो. तो दोन प्रहर रात्री फौजा अकस्मात गोटाजवल आल्या. मग आपण खबरदार होऊन पुढे स्वार पाठविले. तो पिलाजी जाधव यास खबर गेली की, आता मानाजी जाधव खबरदार जाहाला; आणि त्याजपासी फौज सातसे स्वार आहेत तो काही जीत हाती लागतो यैसे नाही. नास होईल. दोनच्यारसे माणसे जाया होतील. मग पिलाजी जाधव फौजसमेत राहुरी खुर्द येथे राहिला. आम्हास सांगोन पाठविले की तुम्ही राजश्री चिमाजीपंताच्या भेटीस येणे. त्यास आपण जाब दिल्हा कीं तुम्ही फौज दोन हजार घेऊन आला

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहा तर आपण काही जोरावारीने भेटीस येतो यैसे नाही. मग पिलाजी जाधव याने सांगोन पाठविले कीं तुम्ही येत नाही तर आम्हास हुकूम आहे तो करावा लागतो. यैसें आम्हास त्यानी सागोन पाठविले. दिवस उगवलियावरी पिलाजी जाधव दादजी सितोले हे उभयेता आमच्या डेरियास आले. कितेक दबावाच्या गोष्टी आम्हासी सांगितल्या. त्यास आपण जाब दिल्हा की, तुमचे दबावणीने आपण भेटीस येतो यैसे नाही. माहाराजाचे निशान आपणापासी आहे. मरून खस्त होईन. चाकर माहाराजाचा आहे. तुमच्या चितास येईल ते करणे. मग पिलाजी जाधव सोहलतीच्या गोष्टी सांगितल्या; आणि आम्हास भेटीस घेऊन गेले. राजश्री चिमाजीआपाची भेटी जाहली. त्यास तेथे जे आम्हास बोलो नये ते बोलिला की, तुम्ही माहाराजांची पाठ करून राहाता तर येक दिवस मारू (न) ताराज़ करीन. त्रिंबकराऊ दाभाडा मारिला, माहाराजानी आमचे काय केले? तुम्ही वीट करून किती दिवस राहाल? यैसे आम्हास जाब दिल्हे. आपणासी तो फार आकस लाविला आहे. आपली सरदारी दोन परगणियावरी आहे. त्यास तमाम परगणियात स्वार पाठऊन रोखे करून गुरे-ढोरे वळून आणून सिवार देखील चारिले. मग आपण राजश्री चिमाजीपंताची आज्ञा घेऊन कसबे राहुरीवरी आलो. चिमाजीपंतास जाब दिल्हा की, याउपरी आपण परगणियात राहात नाही. उठोन देसास जातो. परगणे तुमचे हवाला केले आसे. जाब दिल्हा आणि उठोन आलो. तरी चिरंजीव खंडेरायाचे सरदारीचे आगत्य माहाराजास आसले तरी हे गोष्टीचे पारपत्य केले पाहिजे. आपण तो येकनिष्ठ चाकर आसो. आम्हासी चिमाजीपंतानी आकस लाविला आहे की, तमाम आपले सरदार चाकर आहेत तुम्हीहि चाकरी येकभावाने आपली करावी. त्यास आपण जाब देतो की आपण माहाराजाचे पाये सोडून दुसरियाची चाकरी करणार नाही. यास्तव आपणासी आकस मांडिला आहे. हे गोष्टीचे पारपत्य माहाराजानी केले पाहिजे. सेवसी श्रृत होय.

¶*The writer of this letter Manaji Jadhav appears to be the same Mansingh of Sindkhed, to whom Mr. Kale refers in his history of Berar and whom Shahu took under his protection after the battle of Fatekharda (9-9-1724), and ever afterwards looked upon with paternal affection. In course of time when Shahu gave up all power to the Peshwas, the latter began to coerce the old sardars, who refused to obey them. The letter is significant of the change of ruling power from the hands of the Chhatrapatis to those of the Peshwas. It is distressing to trace the evil fortunes of the Jadhavs of Sindkhed.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 31] [December 1731

श्री

फेरिस्त कतबे लोकाचे सा[1] राजश्री पंत प्रधान सुहुर सन इसने सलासैन मया आलफ माहे रजब करार रूपये :

५००००	पिलाजी जाधवराव
११०००	गोरखाजी भापकर
६०००	सिदोजी राऊत
६०००	मोघोजी सेलार
१००००	त्रिंबकराऊ ढमढरे
३५००	जानराऊ ढमढरे
२०००	दादाजी सितोले
५५००	जानोजी ढमढरे
२००००	मल्हार दादाजी
२५०००	बापुजीपंत नाना
१५००	बालाजी चिंतामण
२५००	तुलाजी सितोले ३००० पैकी करार
२५००	जिवाजी सितोले ३००० पैकी
१५००	संताजी चितलकर
६०००	खेम सेट वालेकर
४५००	बाबती बेटावद

२२५०	जानोजी ढमढरे
११२५	दादाजी सितोले
११२५	परसराम सितोले
४५००	

१ समक्ष, मार्फत ?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१२५००	संताजी धायेभर
२०००	परसराम सितोळे
८०००	त्रिंबकराऊ विश्वनाथ
९४००	देशमुख व देशपांडे पा। पुणे
२४०००	अंताजी माणकेश्वर
१०००	गोजाजी ढमढरे
२०००	त्रिंबकराऊ माणकेश्वर
	धायगुडे अंताबा नाईक
	भिडे यांचे नांवे
१०००	देशमुख व देशपांडे
	सासवड
१५००	देशमुख पा। चाकण
२२४९००	

¶*This is a list of sardars at the disposal of the Peshwa.*

No. 32] [*18-4-1735 ?*

पो ८ जिल्हेज

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री
आपा स्वामी वडिलांचे सेवेसीं

अपत्यें माहादाजी अंबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागायत छ ९ जिल्हेज भृगुवारपरियेंत येथास्थित असे विशेष. काल साईंकालीं राजश्री स्वामीनी बोलाऊन आज्ञा केली कीं [1]मोडीविसीं तुम्हांस वरचेवर सांगतों परंतु अद्याप मोड येत नाहीं. पुढें पर्जन्य काल आला, मग कांहीं तोफेचा कारखाना चालणार नाहीं. यास्तव द्यावयाचें असिलें तरी लौकर देणें. तुमच्या चित्तांत न द्यावी यैसें असिलें तरी तैसेंच सांगणे. आम्ही तऱ्ही प्रयेत्न करूं, यैसे बहुत श्रमी होऊन बोलिले. यैसियासी येथें जी मोड स्वामीनी पाठविली ती पावती करूं. बाकी मोड स्वामीनी लौकर पाठविली पाहिजे. येथें राजश्री स्वामी दिवसांतून येक दोन वेळ बोलाऊन ताकीद करितात कीं, मोड लौकर आणवणें. जर स्वामीकडील मोड लौकर आली तरी उत्तम जाहालें.

---

1 The different metals of which guns are cast.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नाहींतर येथें जसी मिळेल तसी विकत सवग माहाग घेऊन द्यावी लागेल. यैसी नेकड[1] येथील आहे. यास्तव लौकर मोड येई तें करावें. नाहींतरी येथें घ्यावयाची आज्ञा करावी. म्हणजे घेऊन देऊं. विदित जाहलें पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. कथील व खापरसुत याविसींहि निकडीनें आज्ञा केली आहे. तरी कथील व खापरसुत सत्वर पाठवावें. मोड आधीं या पाच-सात दिवसांत ये तें करावें त्यावर खापरसुत व कथीलहि लौकर पाठवावे. हे विज्ञापना. तोफ वोतावयासी अवघा रस येकदाच करावा लागतो. येथें राजश्री स्वामीनी मुसा तयार केल्या आहेत आणि कलेभूत[2] मेणाविलें आहे. याउपरि कलभुतावर मातीचें कलभूत दिल्हें म्हणजे मोड येऊन रस तयार जाहाला पाहिजे. मातीचें कलभूत जाल्यावर फार दिवस राहातां नये. पाउसाचे दिवस. कारखाना थोर. पाऊस पडला म्हणजे अगदीं काम बिघडेल आणि तोफेची बदलामी येईल यैसें आहे. तरी स्वामींनी मोड सत्वर पाठविली पाहिजे. हैगय येक घटका करूं नये. लौकर लौकर मोड येऊन पोंहचे यैसे केलें पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ambaji Purandare forwards to Bajirao and Chimaji Appa Shahu's urgent commands as regards the casting of guns. This proves how keen Shahu was about the equipment of artillery.*

No. 33] [*5-7-1732 ?*

पाा छ (१०) मोहरम

श्री

श्रीमंत सहस्राये चिरंजीव विजईभव राजमान्य राजश्रीं पंतप्रधान तथा राजश्री चिमाजी आपा यासी

(प्री)तिपूर्वक सिऊबाई कृतानेक आसीर्वाद. येथील कुशल ताा आषाड सुध दशमी गुरुवार जाणून स्वकीये लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावले. चिरंजीव कृष्णरायास बुधिवाद सांगतो, परंतु त्याचे चितात येत नाही म्हणून लिहिले. त्यास, कृष्णराव तुमचे लेकरू व सेवकपणाचा पेशा व आपण वाढविले. आपले आज्ञेप्रमाणे वर्तणूक करावी विहितच आहे. त्याहीमध्यें अंतर पडिले असिले तर क्षमा करावयास आपण योग्यच आहेत. धंद्याविसी लिहिले; यैसियासी, खानदेश व जुनर प्रांत आपण विल्हेस लाविलेच

---

१ निकड. २ साचा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहे. राहाता कल्याण प्रांत राहिला. त्यास आपणाजवळ चौघे येऊन च्यार गोष्टी सांगतात त्याप्रमाण वाटतात. वरकडाकडें मामले आहेत त्याचा काही बखेडा होत नाही. आम्हाकडें येक धंदा राहिला आहे त्याचाच बखेडा मांडला आहे. त्यामध्ये इतके दिवस आपली सलग होती यामुले तैसीच वर्तणूक करीत होते. आता प्रसंग पाहोन आपले आज्ञेप्रमाणेच वर्तणूक करितील. त्याचे अवगुण लिहिले तर अवघेच अवगुण आहेत यैसे नाही. येक दोन तैसे आहेत. येक दोन बरे आहेत. रयेतीविसी आपण लिहिले, तर रयेतीने आजपर्यंत कोणास बरे म्हटले आहे यैसे नाही. तथापि तो प्रांत तुम्हचा आहे. राजश्री सरखेल याणी रुपये घेतले असते तरी दुसरियास कलते नाही आणि घेतले आहेत त्याचा काही बोभाट नाहीं. रयतेस भासते की सरखेल खावंदच आहेत. हे चाकर. या करिता क्षणक्षणा बोभाट आपणाकडे करितात. कृष्णरायाचे अवगुण लिहिले त्यास आपण रुपये घ्यावयास चुकले नाहीत आणि गालिप्रदाना द्यावयास चुकलेत नाहीत. वरकड आपली त्याची बोली तिसाला आहे. आता सवालक्ष रुपयाची गोष्ट लिहिली तर सवालक्ष रुपये देवत नाही. फारसे जाले तर निदानी दोन च्यार हजार गुदस्तास जाजती म्हटले तरी मान्य करितील. वरचील आमचे ह्याकरितां तुम्ही सासुरवास फार सोसिता; त्यास, पोटाचे संकट नाही. पोट सर्वांचे भरते. ईस्वरे कोण्हास उपेक्षिले नाही. परंतु तुमचे पदरीं थोरपण. तुम्ही त्याचे सांगोपांग करून वडिलाचे नाव रक्षावे. याकरिता करीत होतो. रुपयावरच इमारत असिली आणि तुमचें पदरीचा आमचा दाणापाणी तुटला असिला तर कोण्हाचा येत्न नाही. ईस्वरी इच्छा प्रमाण. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे आसीर्वाद.

हे आसीर्वाद.

¶Shiubai to Bajirao. She accepts in good grace the rebuke administered by the Peshwa to Krishnarao for harassing the ryots, and hopes that he would improve; but in the end she warns the Peshwa that she may well go on even without his favour and that the Peshwa may, if he likes, wrest the province from her.

No. 34] [*1732?*

श्रीशंकर

सेवेसी त्रिंबक खंडेराव दोन्ही कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. चिठीत आज्ञा की, थोरले गरनाळचे गोळे किती गावात टाकले आण टाकीत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाणें, म्हणून आज्ञा. त्यास, काल मंदवारी दोन प्रहरापासून नऊ सुमार गावात गोले टाकले. आज प्राथकालापासून प्रहर दिवसपावतो सुमार ९ पाच टाकले. वरचेवर आणिक गावात गोले टाकितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Trimbak Khanderao to Peshwa, reporting the number of shots fired in the village from the large gun.*

No. 35] *[11-10-1733*

श्री

बार छ १३ जमादिलोवल सन आर्बा सलासीन.

यादी.

देशमुख व देशपांडे पा सिंदखेड यासी पत्र जे. रा नीलकंठराव जाधव यासी व यांच्या पाठभावामधे कलह लाऊंन कटकट करिता आणि याचे वाडेवरी चालून गेलेत म्हणून हुजूर विदित जाले. तरी हे गोष्ट तुम्ही उतम केलेत नाही. याउपरी नील-कंठराव जाधव यासी काही कजिया न करिता तुम्ही व हे येकमते वर्तोन वतन अनभवणे. फिरोन येविसीचा बोभाट हुजूर येऊ न देणे, म्हणून पत्र १.

त्रिंबक तुकदेव कमाविसदार दिा सरलस्कर यासी पत्र जे. मौजे वडाली पाा सिंदखेड व मौजे सुलजगाव पाा मार या दोनी गावची गुरेढोरे नेऊन माणसे मारिली आहेत म्हणून हुजूर विदित जाले. तरी तेथे तुम्हास स्वारी करायास प्रयोजन काये आहे?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

याउपरी देखत आज्ञापत्र देहाय मज-
कुरची गुरे सोडोन देणें, फिरोन
बोभाट येऊ न देणे १.

येकून २ पत्रे देणे

¶*Shahu's orders about Jadhavs of Sindkhed. Nilkantrav Jadhav must be traced in the genealogy of the Jadhavs.*

No. 36]

पौ छ २७ जमादिलाखर [*19-11-1733 ?*

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री आपा स्वामीचे

सेवेसी

अपत्यें मल्हार तुकदेक कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशेल ताा छ २२ जमादिलाखरपर्यंत स्वामीच्या आसीर्वादेंकरून येथास्थित असे विशेष. राजश्री पिलाजी जाधवराव यांस येथे पाठवावयाविषीं राजश्री स्वामीनी दस्तकाचीं पत्रें स्वामीस येक व राजश्री सुमंतास येक व चिरंजीव राजश्री माहादोबास येक यैसी लाखोटे करून पाठविलीं आहेत, त्यावरून विदित होईल. तरी स्वामीनी जाधवरायास पाठविलें पाहिजे. घोड्याच्या मजकुराचे राजश्रीनी स्वामीस पत्र दिल्हे तेहि लाखोटा करून पाठविलें आहे. त्याचेंहि वर्तमान विदित होईल. घोडा येथून छ मारी दोन प्रहरीं राा केला आहे, तोहि पावेल. विदित जाले पाहिजे. राजश्री चिमणाजीपंत यास सत्वर पाठऊन द्यावे. राजश्री स्वामीनी आज्ञा केली की, लाखोटे ती दिवसानी पावते करून उत्तरे सत्वर आणून देणे. त्यास पत्रे पावलियावर स्वामीनी जासूद सत्वर रवाना केले पाहिजेत. राजश्री पिलाजी जाधवराऊ यांस पाठविले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Malhar Tukdeo asks Bajirao at Shahu's instance to send Pilaji Jadhav to Satara at once.*

No. 37]

[*1733 ?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे

सेवेसी

पोष्ये आबाजी त्रिंबक कृतानेक साा नम(स्कार), विनंती उपरी. येथील कुषल जाणून स्व(कीय) कुषल लेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सांप्रत स्वामीकडील कागदपत्र येत नाही याकरिता राजश्री स्वामीनी मुजरद जासुदजोडी पत्रे देऊन स्वामीकडे पाठविले आहेत, त्यावरून सविस्तर कलो येईल. बहुत काय लिा ? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Ambaji Trimbak requests Chimaji Appa to send answers for Shahu's letters.*

No. 38] [*1733 ?*

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसावी यांसी

ॐ श्रीसकलगुणालंकरण अंखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो पिलाजी जाधवराऊ दंडवत, विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १३ जमादिलोवल मुाा कामेरी ताा तारगाऊ पाा कऱ्हाड यथास्थित असे. विशेष गोसांवियाकडील वर्तमान बहुत दिवस कलत नाही. यास्तव चितास समाधान नाही. तरी सविस्तर लिहिले पाहिजे. इकडील वर्तमान तरी राजश्री स्वामीचा मुकाम अद्यापि पालीवर आहे. राजश्री पंतप्रधान अजी दर्शनास जाणार आहेत. भेटीनंतर कूचमुकामाचा विचार होणे तो होईल. चिरंजीव राजश्री आपाचा परामर्श वडीलपणे आपण करीतच असतील. परंतु सूचना मात्र लिहिली असे. बहुत काये लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विनंती.

श्री
श्री पांडुरंग
चरणी दृढभाव
चांगोजी सुत
पिलाजी जाधवराव.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhavrao informs Chimaji Appa that the King is still at Pali and that the Peshwa is going there that day to wait upon him.*

[*5-3-1734 ?*

No. 39]

श्री

श्रीमंत राजेश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक लक्षुमणराऊ राम .कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील सेवकाचे वर्तमान ताा छ १० सौवालपावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येथास्थित असे. स्वामीची आज्ञा की, आंबाडच्या देशमुखांकडील पैका पाठविणे. त्यावरून आधीं येताच आंबाडास येऊनु त्यास दोन दिवस बैसविले आण तहसील लाविले. मग इमाम वरीदि बेगखां * * याने येऊन सागितले जे, ये प्रसंगी त्यास मारामार (केली तर काही) कार्य होणे नाही. तर सिमगी पूर्णिमा जाहाली म्हणजे पंचमीस येणे आण निकाल करून देवऊन म्हणौऊन करार केला आहे. तरी पंचमीस तेथे जाऊनु त्याकडील पैकेचा निकाल करून घेऊनु पैका आला म्हणजे सेवेसी पाठऊन देऊन. यानंतर पैठणचे बाकीविसी स्वामींनी तुरुकताजखा व दरवेस महमद यास पत्रे पाठविली होतीं, ते घेऊन आम्हीच तुरुकताजखानाकडे जावे. इतुकेमधे ते दोघे शांत जाहले. हे वर्तमान सेवेसी विदित जाहलेच असेल. याकरिता तैसेच राहिले. व राजश्री रंभाजी निंबालकर या प्रांते आहेत. यैसेयास माहालोमाहली बाकीसाकी राहिली आहे त्याचा रोहपोह करावा लागतो. याजकरितां त्यास येक पत्र पाठवावे जे, लक्षुमणराव ते प्रांते आपले तर्फेने आहेत; त्याचे हरयेक गोस्टीविसी साहित्य करणे म्हणौऊन पत्र आले म्हणजे कोणी बोभाट नेईल तो मनावर नेघीत यैसे होईल. याकरिता सेवेसी लिहिले आहे. व रा। खंडोजी कवडे व केसो गोपाल दि॥ रा। आवजी कवडे याणी आंबाड परगणेचा गाव मौजे माहारजवले मारले. वस्तभाव चिंदीचोला गलादाणा गुरेढोरे कुली नागऊन नेला. मग ते गावकरी जाऊनु गुराची खंडणी साहासातसे रुपये देऊन, गुरे मात्र सोडऊन आणिली, त्यास आंबाडचा फौजदार आम्हासी कटकट करितो जे, ते वस्तभाव, लूट नेली ते व खंडणी घेतली ते आणून देणे. नाहीतर सरदेशमुखीमधे मर्जेरा[1] घेईन यैसे म्हणतो. तैसेच पडदूर परगणेमधे धामधूम करून रोखें करून पांच च्यारसें रुपये घेतले. व खेडले परगणेमधे तैसीच धामधूम करितात. येप्रांते मोगलाईकडून जागोजाग जिलेदार व फौजदार आहेत. यैसेयास, स्वामींनी खंडोजी कवडे व केसो गोपालास व रा। * * * स पत्रे व दोघे हुजूर पाठवावयाची आज्ञा केली म्हणजे उतम आहे. जाहले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. पारपत्य करणार स्वाम धणी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶ *This letter explains the double Government, i.e., the Maratha and the Nizam, which existed in certain districts according to the treaty with the Nizam agreed to in 1728. Turuk Tajkhan, Rambhaji Nimbalkar, Darvesh Mohammad are the Nizam's officers. Turuk Tajkhan is reported in this letter to be dead. The letter is addressed to the Peshwa by one Laxmanrao Ram.*

---

१ वजा, वळते.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 40] [29-5-1734 ?

पो छ १२ मोहरम, मुाा कोहज (?)

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे
शेवेसी

सेवक गोविंद कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. उपरी, येथील क्षेम तागाईत छ ७ मोहरम प्रात:कालपावेतों स्वामीच्या कृपादृष्टीकरून सेवकाचें व जुनर प्रांतीचें वर्तमान येथास्थित असें विशेष. जुन्नर प्रांतीचे बातमीस माणूस जुन्नरीं ठेविलें, त्यास बातमीचें वर्तमान वितााा

कुवरबाहादुर यासी आकस्मात मृत्य जाहाला. जुन्नरीं कळलियांनतर येक दिवस नोबत मना जाहाली होती. वर्तमान सत्यमिथ्य म्हणवेना. मजकूर १.

सोमवंशी सरलस्कर व शंभुसिंग व गोरखाजी भापकर यैसें बीड प्रांतीं बहुत धामधूम केली. त्यावरून उभयेतां निंबाळकर मोकबला घ्यावयासी आले. हें वर्तमान यासी कळतांच हे त्रिवर्ग जिकडील तिकडे गेले. त्यांजकडून आपल्याकडे पत्रें आलीं असतील तीं प्रमाण. मजकूर १.

जानोजी निंबाळकर व सुलतानजी निंबाळकर हे आपल्या फौजेनसी किलिजखान याच्या लस्करांतून निघोन आले. त्यास, सुलतानजी येतां मार्गीं घोरपडे याच्या गांवास मोर्चे लाऊन बैसला. मागून येणार, जानोजी निंबाळकर करमालियासी आले, हें वर्तमान. स्वामीकडे परभारें आलें असेल तें प्रमाण. मजकूर १.

सोमवंशी याचे भले भयाभीत जालें, तजावजा होणार, यैसी धशत निर्माण जाली आहे. मजकूर १.

येणेप्रमाणें वर्तमान यैकिलें त्यावरून सेवेसी कळावे म्हणोन लिहिलें असें. विदित जाहालें पाहिजे. बहुत काय लिहिणें? कृपा लोभ आसों दीजे, हें विज्ञप्ति.

¶*Govind Krishna to Chimaji Appa, giving news about Somvanshi and Nimbalkar.*

No. 41] [1734 ?

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामींचे सेवेसी

विनंती. १६ जमादिलाखरी त्रितीये प्रहरी राजश्री स्वामींनी बोलाऊन नेऊन आज्ञा केली कीं, मौ * * * * रे येथील कागदावर सिके करून

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

देणें. त्यावरून अ * * * विनंती केली कीं, पत्रांत इनाम सरदेशमुखी व मोगलाई व सात्रोत्रा इनामतिजाई लिहिली आहे. यैसियासी, सदरहूप्रमाणें चालणार नाहीं. सरदेशमुखीखेरीज स्वराज्य देणें तर द्यावे. त्यावर राजश्री बोलिले कीं, राजश्री शाहाजी माहाराज व राजश्री सिवाजी माहाराजा यांची पत्रें धारादत्ताची आहेत. यांत तुम्ही जाणाल तें करा. त्यावर अम्ही विनंती केली, अम्हास इतके काय ठावकें ! अम्ही माहाराजांचे पाये जाणतो. स्वराज्यखेरीज वरकड कांहीं चालणार नाहीं यैसें आहे. त्यावर राजश्री कांहीं बोलिले नाहीत. स्वामीस कळावे याकरितां लिहिलें असे. राजश्रींचा अगृह जाणोन कागदावर सिके करून दिल्हे. विदित जाहालें पाहिजे. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Purandare's letter to Bajirao communicating how Shahu insisted on passing a Sanad for the dues of Sardeshmukhi, etc., of a certain village.*

No. 42] [*1734?*

श्रीशंकर

श्रियासह चिरंजीव विजईभव राजमान्ये राजश्री चिमाजी आपा यासी प्रति चिमणाजी दामोदर कृतानेक आसीर्वाद उपरी. काली शुक्रवारी चिरंजीव राजश्री गणवा प्रातकाली रवाना केले, ते तुम्हाजवळ पावले आसतील किंवा पावतील. इतकियात कालीच साईकाली तिघे स्वार आमळनेरास तुमचा रोखा घेऊन जमिदारास आले. तरी ये गोस्टीचे काये आहे ? मुलूक तुमचाच आहे. कोणी तुम्हासी नवदिगर[१] गोस्ट सागेल की काये ? परंतु यंदा श्रावण मासापासून आजीपावेतो काही वस्ती करून, माणूस दृष्टीस पडेल, यैसे केले आहे. हे सविस्तर वर्तमान चिरंजीव गणबा श्रुत करितील. तुम्हास सर्व राज्य आहे. आम्हास इतकाच जागा आहे. चांदसर (?) तर आगदी खराब आहे. हे सविस्तर वर्तमान गणबा सांगतील. त्याचे उतर पाठवणे. बहुत काये लिहिणे ? लोभ आसो देणे, हे आसीर्वाद.

¶*Chimnaji Damodar to Chimaji Appa, requesting to be continued in his possession without molestation.*

---

१ अडवणुकीच्या ; वादाच्या.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 43] [*Prior to 1734*

नकल.

श्री

श्रीमंत राजश्री अंबाजीपंडित तात्या स्वामीचे सेवेसी पो गंगाधर येसवंत कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती उपरी. स्वामींने आज्ञापत्र पाठविले ते पावोन अमृतोल्हास जाहाला. राजश्री संताजी वाघ याची मजमू राजश्री धोंडोबाच्या नावे सनद घेतली तरी उतम आहे. राजश्री मल्हारजी होळकर याची सरदारी जे आहे ते स्वामीच्या घरची आहे. आणि मी सर्वश्वे स्वामीचा म्हणवितो. आपल्या पायाखेरीज दुसरा अवलंब जाणत नाहीं. कूर्मद्रष्टी करून लोभ करीत असिले पाहिजे. वहुत काये लिहिणे हे विज्ञापना+

¶*Gangadhar Yeshvant Chandrachud got himself admitted into Holker's service through the influence of Ambajipant Purandare. He was in the Holker's service from 1734 to 1774. This letter appears to be written sometime prior to 1734.*

No. 44] [*13-2-1735 ?*

पो छ ३ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

सेवक पोष्य रामाजी दामोदर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना विनंती. ताा छ ३० रमजानपर्यंत स्वामीच्या कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री विठल जोशी औरंगाबादेस आहेत. तेथें त्याचे कांहीं रुपये द्यावयास स्वामीस अनकुल पडतील तर त्यांचा मुबदला आम्ही सातारा स्वामीस देऊं. कितीक ऐवज द्यावयास अनकुल पडेल तो स्वामींनी लेहून पाठवावा. त्याप्रमाणे अम्हास अनकुल पडेल तो सातारा देऊन स्वामीस लेहून पाठऊ. तर याचे काये उतर तें अविलंबे पाठऊन द्यावे. श्रीयात्रेच्या उदेशामध्ये आहे. श्वामीच्या कृपेने घडेल ते पाहावे. यात्रेची सामग्री आहें. येथें राजश्री दादाच्या स्वाधीन रुपये वीस केलें. पुणे अगर जे ठिकाणी देवितील तेथे घेऊन अगर स्वामी आज्ञा करीतील त्याप्रमाणें वर्तणूक करून. येविसीची आज्ञा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Ramaji Damodar to Chimaji Appa suggesting to him how the repayment of debt of Vithal Joshi could be adjusted.*

\+ गंगाधर यशवंत चंद्रचूड अंबाजीपंत पुरंदऱ्याचे वशिल्यानें होळकराचे पदरीं दाखल झाला असावा, असें या पत्रांत ध्वनित होतें. पत्र स. १७३४ पूर्वीचें. म्हणजे या वेळेपासून स. १७७४ पर्यंत चाळीस वर्षे गंगाधर यशवंत कामावर होता हें स्पष्ट आहे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 45] [पो 23-4-1735 ?

पा छ १० जिल्हेज

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्रीं आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. [१]मोडीविसी राजश्री स्वामी बोलिले की, आम्ही जे कर्म अवलंबिले ते अवघ्या सरकारकुनाच्या मते सिधीस न जावे. प्रज्यन्य समीप आला. आता मोड कधी येईल आणि तोफ तयार कधी होईल? आम्ही तोफेचे कलभुत[२] नेऊन बाहेर ठेविले की मोड लौकर येईल. त्यास अद्याप मोड येत नाहीं. येखादा पाऊस पडला म्हणजे तोफेचे कलभुत मातीचे आहे ते विरोन जाईल. मग मोड दिल्ही तर काये कामाची? उगेच अजिचे उद्यावर घालावे, मोड देऊ नये, पाऊस पडला म्हणजे साचा विरोन जाई, मग माहाराज उगेच राहातील येसे आहे की काये; तेहि न कले. येसे बहुत श्रमी होऊन बोलिले. तेव्हा आम्ही अर्ज केला कीं दीड खंडी मोड आली आहे, ती माहाराजानी घ्यावी. बाकी राहिली तीहि दोचौ दिवसा येऊन पोहोचेल. यैसा अर्ज केल्यावर बोलिले की, थोडी थोडी मोड घेऊन काये करावी? तोफेचे काम काही उगेच थोडे सांधून करावयाचे नाहीं. जे जसी मोड येईल तसे काम होईल येसे नाही; अवघे मोडीचा रस येकदाच जाहाला पाहिजे. याकरिता देत असाल तरी लौकर आणवणे नाही तर आताच साफ सागणे की देत नाही. म्हणजे आम्ही आणीक तरतूद तऱ्ही करू. येसे बहुत बोलिले. तरी स्वामीनी मोड लौकर पाठविली पाहिजे येविसी दिनप्रतीने सेवेसी लिहीत गेलो. परंतु अद्याप कांही मोड येत नाही. तरी आता येकदाच सवंग माहाग जसी मिलेल तसी घेऊन अगत्य पाठवावी. याउपर मोड यावयासी दिरंग लागला तर राजश्री स्वामी खटे होतील. क्षुलग काम राजश्रीनी मनात आणिल्यास लौकर न होणे म्हणजे मर्जी कसी होती हे स्वामीसहि विदित आहे! तरी याउपर दिवसगत न लाविता मोड लौकर पाठवावी व कथील खापर[३]सुतहि पाठवावे. सेवेसी श्रुत होये हे विनंती+.

¶*Purandare writes from Satara to Bajirao to send old cast metal for casting cannons at Satara. Shahu was very impatient on the subject.*

---

१ तोफ ओतण्याकरतां लागणारी धातू. जुनाट तोफा वगैरे मोडून केलेली.

२ सांगाडा, साचा.

३ एकतऱ्हेची धातू तोफास उपयोगी.

+ हें पत्र नं. ३२ नंतर वाचावें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 46] [*16-9-1735?*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व
तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. राजश्री फतेसिंगबाबा व राजश्री प्रतिनिधी येकत्र होऊन मुल्लकूगिरीस कर्नाटक प्रांते जावयाचा सिधां(त) केला. राजश्री स्वामीस राजश्री फतेसिंगबावानी विनंती केली. त्यावर राजश्री बोलिले की, उतम विचार आहे. परंतु मोगलाचा विचार आद्याप कलला नाही. कोणत्या (प्रां) ते जातो हे तहकीक कलेल त्यासारिखा विचार राजश्री नारबावा अलियात्रर करून सागणे ते सागो, यैसे उतर दिल्हे. स्वामीस कलावे याकरिता लिहिले असे. उभयेताचा मनसबा जाहाला; मुल्लकगिरीस जातात यात संवशये नाही. राजश्री सुंमत राजश्री फतेसिंगबावाच्या घरास गेले होते. त्यापासी राजश्री फतेसिंगबावा बोलिले कीं, आपण कर्नाटक प्रांते जावयाचा विचार योजिला आहे. या विचारास तुम्ही पुस्तवानी करावी. यैसे कितेक श्नेहपुरस्कार भाषण केले. त्यावर सुमंतानी उतर दिल्हे की, दिलीहून फौजा येतात त्याचे व नवाबाचे येकचित आहे व तुम्हाकडील फौजा मुल्लक लुटितात व गाहुली घेतली व गतवर्षी फौजा आल्या होत्या त्याच्याने काही जाहाले नाही. आता आपण साहेबकाम करून दाखवावे, हेहि अवश्यक नवाबास आहे. यामुले धारूरास येतात, गलबल खामखा होते. यैसे असता तुम्हास कर्नाटक प्रांते जावयासी कैसे बनेल? नवाबाचा भलता विचार कलल्यावाचूंन बाहेर जावयाची उतावली करूं नका. तुम्ही पैका खर्च करून हजार दोन हजार फौजा ठेवाल व वरकड बालेघाटी जाऊन सरंजामी फौज जमा करू यैसे म्हणाल, तरी नवाबाची गलबल होईल तेव्हां बालेघाट प्रांताचे लोक काबिले थाग्यास लावावयासी जातील, मागती तुम्हापासी हजार दोन हजार फौज राहिली तर तितक्यानसी काही कार्य होते की काये? यास्तव तुम्ही उतावली कोणेविसी न करणे. निवाबाचा विचार कलल्यासारिखे जे करणे ते करावे, यैश्या गोस्टी सागोन दरडी ढासलल्या. परंतु सुमंताचा विस्वास नाही. कोणी काही आसा दाखविली म्हणजे तिकडेच डोल देतील यैसे आहे, जाले वर्तमान स्वामीस विदित व्हावे यास्तव लिहिले असे. हे वर्तमान रघुनाथ भटानी सांगितले नाही. आम्ही परभारा मनास आणून लिहिले असे. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

1565

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

राजश्री फतेसिंगबावा व राजश्री प्रतिनिधीचा येक विचार जाहाला आहे. लक्ष प्रकारे करनाटकात जावे. कदाचित अनकूल न पडे तर उतर प्रांते बुंधेलखड वगैरे या मुलकात जावे यैसाहि विचार आहे. हे विनंती.

¶*Mahadoba Purandare, all in his own hand, writes to the Peshwa informing him of the plans of Fatesing Bhonsle and the Pratinidhi to go into the Karnatak and of the way in which Shahu dissuaded them from the course owing to the activities of the Nizam.*

No. 47] [*5-10-1735* ?

छ २८ जालेवल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. दक्षण प्रांतीच्या मनसब्याची कल्पना आमच्या चितात येऊन राजश्री गोविंदराऊ चिटनीस यासी सांगून राजश्रीस हटकाविले. त्याचा उदार निवाला ते वर्तमान तपसिले पहिले लिहिले आहे त्यावरून विदित होईल. त्यावर मागतीहि राजश्री गोविंदराऊ याजकडून विनंती करविली ते वेलेसहि राजश्री बोलिले की, राजश्री नारबावा आलियावर सिधांत करून सांगतो, हा विचार उतमच आहे, यैसे बोलिले. साराऊष राजश्रीच्या चितात आले आहे की, स्वामीच्या चितात उतरकडील भर भरला आहे तो मनसबा तुम्ही करालच व फौजा जातात याणी मोगलाची व मुलकाची हुद (?) घेतलियामुले हावभरी होतील आणि केवल दिलीसी ढेहा (?) लावली म्हणजे कोणे वेलेस नाही कोणे वेलेस तऱ्ही अरिस्ट येईल. स्वामीस नका म्हणावे तरी फौजेस पोट भरावयाची जागा नाही, यामुले आपणहि काही आईकणार नाहीत, यास्तव कर्नाटक प्रांत आपले स्वाधीन करावा म्हणजे तिकडील अरिस्ट वारेल व फौजहि मातबर पदरी होईल यैसा विचार आहे. परंतु सामादिकास विचार पुसता काही दक्षण प्रांत स्वामीच्या ताल्लुका स्वामीस द्यावा हे कदापि सांगणार नाहीत. तेव्हा केवल खावंदानीच सुभासुभ विचार करून साहेबयेल्यारीने करणे ते करावे, तेव्हाच होईल तरी होईल. यास्तव इतका प्रसंग घडोन मनसबा सिधीस जाईल न जाये हे न कले. परंतु स्वामीचे हास्त गालीब[१] आहेत व राजश्रीच्या चितात तिकडील

---

१ मजबूद.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अरिस्टाचे भये याजमुळे कार्य जाहाले तरी होईल. यैसियासी स्वामीच्या चितात उतरेकडील मनसबियाचा विचार पूर्ण आला आसेल यास्तव हे गोस्टीचा विचार ध्यानात येणार नाही. तर उतर प्रांतीचा येक परगणा व दक्षेणेकडील येक गाव यैसा बराबर आहे. फौजा तिकडे जातात त्यास पैका मिलतो ते कलतच आहे व तो मुलूक मोगलाचे तोंडी आहे यास्तव दक्षण प्रांतीचा तालुक स्वामीचा जाहालियाने उतम आहे. इकडील पैका मिलावयाचा म्हणावे तरी स्वामीचा तालुका नसता नाबाचे सलाबतीनेच तमाम वकील येऊन बाज खातात व तालुका जाहाला आणि फौजसहवर्तमान पनालियापर्यंत स्वामी गेलियानि तमाम पालेगार व येवन रुजू होतील व घोरपडे व उदाजी चव्हाण आदिकरून तमाम फौज स्वामीचे पदरी पडेल. हा विचार स्वामीच्या चितात न येसा काये आहे? परंतु आधी तो येथून होणे मुस्कील; कदाचित येथील विचार घडोन आला तर लक्ष प्रकारे करावा. उतरेकडील मनसबा चितात आणून हे गोस्ट टाकावी यैसे नाही. पत्राचे उतर पाठवावे. तदनरूप येथे बोलू. राजश्री बोलिले आहेत की राजश्री बावा आलियावर सिधांत करू. त्यास या विचारास कोणी संमत देणार नाहीत. माहाराजानीच विचार ध्यानात आणून करणे ते साहेब येख्तयारीने केलिया अवघे संमत देतील वगैरे गोस्टी बलकटीच्या बोलाव्या तर स्वामीची मर्जी कलली नाही. तरी उतर पाठवावे तदनरूप वर्तणूक करू. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Purandare to Bajirao, explaining King Shahu's policy—the question was whether Bajirao should go to the far north or confine himself to the south.*

No. 48] [*5-10-1735*

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा

राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आपत्ये माहादाजी अंबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता। छ २८ जमादिलवल रविवारपरियेंत येथास्थित असे विशेष. काली मंदवारी नवाबाच्या लस्करातून बातमी आली. त्याबराबर सुमंतास व राजश्री स्वामीस पत्रे आली होती त्याच्या नकला करून पाठविल्या आहेत त्यावरून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

विदित होईल. काली मंदवारी रात्री राजश्री फतेसिंगबावाचे पागेस अग्नि लागोन दग्ध जाहाली. येक घोडा कुंमाई[1] जलून मेला. वरकड घोडी मात्र काहाडली. सामान जलाले. स्वामीस कलावे याकरिता लिहिले असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News from Satara that Fatesing's stables were burnt by fire.*

No. 49] [*25-10-1735 ?*

श्री.

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी. अपत्यें माहादाजी अंबाजी कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ १९ जमादिलाखर मंदवारपरियेंत येथास्थित असे विशेष. राजश्री स्वामीनी स्वामी-कडे कितेक वर्तमान सांगोन राजश्री आनंदराऊ पंडित सुमंत यासी व आम्हास पाठविले. त्यास आम्ही काली सुक्रवारी सातारियाहून निघोन घाटावर आलो. अजी मंदवारी सासवडास आलो. याउपरी सत्वरीच स्वामीपासी येऊन पोहोचतो राजश्री सुमंत आजी शनवारी सिरवलावर येतील. उदईक पुणियासी येतील. साराउष गोस्ट आम्ही येऊ तोपर्येंत जेथे मुकाम असेल तेथून पुढे येकंदर न जावे. आम्ही स्वामीपासी येऊन वर्तमान विदित करून. मग जो विचार कर्तव्य तो करावा. तोपर्येंत एकंदर पुढे कूच न करावे. विदित जाहले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Purandare to the Peshwa, informing the latter that he was coming to visit him personally with Anandrao Sumant at the instance of Shahu.*

No. 50] [*1-12-1735*

श्री

पाा छ ३ साबान.

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती. राजश्री पंतप्रतिनिधीच्या गमनाचा अर्थ पहिलें स्वामीस लेहून पाठविला होता. त्यास प्रस्तुत छ २६ रजबीं इंदुवारीं आवंदास देवदर्शनास जातो

---

१ घोड्याची एक जात.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

म्हणून राजश्री स्वामीची आज्ञा घेऊन आपण व राजश्री येमाजीपंत यैसे प्राथ: कालचे तेरा घटकांत स्वार होऊन गेले. स्वामीस कलावें याकरितां लिहिलें आहे. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Purandare informs Chimaji of the departure of the Pratinidhi to Aundh.*

No. 51] [*28-12-1735 ?*

पौ छ २४ साबान

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे
सेवेसी

सेवक रामाजी दामोदर सां नमस्कार, सेवेसी विज्ञापना. राजश्री राऊ गंगातीरास गेले. निजामनमुल्क अवरंगाबादेस आहे. परंतु नर्मदापार होलकर याची भेटी होऊन महदकार्याचे वर्तमान आलियाचे इकडे वर्तमान आहे. श्री करील वराडच्या मामलियाची बदमामलींविसी लिा तर पूर्वील संप्रदायानरूप आम्ही तेथून आलियाउपरी जाहली म्हणऊन लिा. ते स्थल ते रीतीचे आहे. तेथे मुजमु आपली; तोच कारभाराविसी वारंवार लिा होतो परंतु माणूस मिलेना मग त्यानी हा योजिला आहे. तो करील ते पाहावे. आपण प्रसंगी असतो आणि हे गोस्ट होती तेव्हा ल्याहावे येसे आहे. पत्राचा मजकूर लिा त्याचा मजकूर यैसा आहे. रा हरि दामोदर बोलिले कीं दाहा हजार फौज ठेऊन मामला करावा लागतो. त्यास यैवज काये, म्हणऊन बोलिले. फौज ठेऊन मातबर कामकाज करणे, चौथाई संस्थानाची न देणे म्हणऊन पत्र असेल. वरकड पाच सात वरसे कारभार केला; परंतु अंतर पडो दिधले नाही. आता मुजमु आपली. धनी स्वामी आहेत. मी सेवक आहे. राजश्री दादासाहेबास पत्रें लिा आहेत. हे विज्ञापना.

¶*Ramaji Damodar to Chimaji Appa, describing the disturbances in the administration of the Berars. A strong army, he says, is quite necessary for maintaining order.*

No. 52] [*1735 ?*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री अपा स्वामीचे सेवेसी विनंती. काली गुरुवारी प्राथ:काली राजदर्शनास गेलो. तेव्हा राजश्री बोलिले की, तुम्ही घडीभर बसा, तुम्हासी आम्हास दोन गोस्टी बोलणे आहे. त्यावर अवघ्या

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लोकास निरोप दिल्हा. आणि राजश्री येकलेच बसले. आम्हास जवल बोलाऊन बोलिले की, आजकाल ईस्वरइछेने राजश्री प्रधानपंताच्या सर्व गोस्टी सर्वोत्कर्ष आहेत. याची कीर्ति भूमंडली बहुत दिवस राहील. येशास व कीर्तीस गारस्त्यास[1] व स्वामीसेवेसी व कितेकविसी किमपि अंतर नाही, यैसे आहे. परंतु येक गोस्टी अनुचित करितात कीं, द्रव्याची अश्या धरून वत * * * * साव * * * * * अर्जिले कीर्तीस किंचित कलंक सांभा-(ळावा. आ)म्ही आपला घराऊ विचार जेव्हा गाठ पडे * * न येवढी गोस्ट न करीत ते करवणे. मागे दादाजी कोंडदेव लाहानसाच ब्राह्मण झाला; परंतु त्याणे जे इनसाफ केले ते अवरंगजेब पातशाहासहि वंद्य जाहले. वरकड द्रव्य न मिले म्हणाल तर रास्ती इनसाफ केला आणि खऱ्यापासून अगर खोट्या-पासून जे घेईन म्हटले ते घ्यावयासी सता आहे, यैसे बोलिले. त्यावरी आम्ही विनंती केली की, मागेहि माहाराज येकदा असी गोष्ट बोलिले होते. त्यावरुन आम्ही राजश्री पंतप्रधान यासी सांगितलें. परंतु ते बोलिले की आम्ही लेकरे. माहाराजावाचून आम्हास ममतापुरस्कर बुधिवाद कोण सांगेल? तरी तुम्ही माहाराजास विनंती करणे की इनसाफ गैरवाजबी माहाराजाच्या चितात कोण-कोणते आले आहेत ते आज्ञा करावी. त्याचा विचार माहाराज सांगतील तैसा करूं. यैसे बोलिल्यावर बोलिले की, आम्ही काये सागणें? तुम्हास कोणता न कलेसा आहे? व तुम्हास राग येईल, तरी आम्ही याउपर बोलणार नाही. वरकड तुमचेबदल खातर आम्हासहि ते गोस्टी मंजूर म्हणावी लागेल. परंतु जोपर्येंत तुम्ही व आम्ही आहो तोपर्येंतच चालेल, पुढे चालणार नाही, यैसे बोलिले. त्यावर आम्ही विनंती केली की, ते काही मनात विषाद आणून बोलिले नाहीत. माहाराजास जे गोस्टी अनुचित आढलली असेल ती आज्ञा करावी व त्याचा विचारहि सांगावा. त्यावर बोलिले की, आम्हास * * * * (सांग)णें असल्यास * * * * (समी)प सांगो, यैसे बोलिले. जाले वर्तमान स्वामीस विदित व्हावे यास्तव लिहिलें असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Information having reached King Shahu that Bajirao was in the habit of selling justice to the highest bidder, he remonstrated with Purandare, the Peshwa's representative at Satara, whereupon the latter reported the matter to his master Bajirao.*

---

१ गार्हस्थ्यास.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 53] [*1735 ?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक विसाजी गणेश कृतानेक विनंती. येथील वर्तमान भाद्रपद शुध दशमी येथास्थित आसे. यानंतर स्वामीचे आज्ञेप्रमाणे रा। आनंदराव पवार यांसी सागणे ते सांगितले. सर्वहि मान्य करून, येकनिष्ठेने चालावेसे मान्य केले. परंतु प्रस्तुत रा। सिवाजीपंत यांचे व त्यांचे अंतर शुध दिसत नाही. ज्या रीतीन वर्तावयाची आज्ञा केली, त्याचेंहि समाधान अंतरीं वाटले किंवा नाही, हें न कले. राजश्री उदाजी पवार यांसी येक पद राजश्री स्वामी देणार. बहुतसी कृपा. सरंजाम डोंगरपूर बासवाडा जैनाबाद मौजे कविठे वतनी गाव गैर सरंजाम होणार, हे वृत येथें यैकतात. परंतु खेद मानावा ते गोष्ट आढलत नाही. राजश्रीं राणोजी राजे, काली सातारियाहून आले. त्याणीहि वृत त्यांस तेथील उत्कर्षाचें सांगितले. त्या भराने संतोषी आहेत. कदांचित पदाची प्राप्त दैव(यो)गे जाली, तरी येथील विचार तर ये रीतीचा प्रस्तुत आहे. सेवेसी श्रुत जाले पाहिजे. गोविंदराऊ पवार मौजे आणे येथें रुसवा करून राहिले आहेत. ताम्राकडे राजकारण करीत होते. त्यास प्रस्तुत तें काहीं जालें नाहीसें दिसतें. सातारांचें वृत अथवा परिणाम लागोन उचित व्हावयाचा प्रसंग शाहाणे लोक जाणतच आहेत. प्रारब्धानरूप इतरांस संकल्प विकल्प होताहेत. बहुत लिहिणें तर, मजला आपण वडील आहेत. मी स्थापित आपला आहे. गणेश दादाजीस दीडसें रुपये पावले. वरकड फडनीस, चिटनीस, जमेनीस, यांसी रुपया पावला नाही. प्रसंग जो आहे, तोच आहे. आपण बुधिवाद व निरवणूक केली त्या प्रमाणे चालण हा कालवरी नाही. हे विनंती. पश्चातबुधीचे आहेत. मग सर्वश्रें संकट स्वामीसच आहे. परंतु कळावें यास्तव लिहिले आहे हे विनंती.

¶*Visaji Ganesh writes to Chimaji Appa on the attitude of Anandrao Pawar.*

No. 54] [*1735 ?*

श्रीरामवरद

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक नारो विठल प्रभु कृतानेक विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ ३ माहे जमादिलोवलपरयेंत मुा। सातारा स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

यथास्थित असे. विज्ञप्ति त्याव्ह्यास कारणे जे, आपण व राजश्री कृष्णाजी पवार विश्वासराऊ व राजश्री उदाजी पवार येसे येऊन राजश्री छत्रपति स्वामीचे दर्शन जाहालें. पुरोक्त माहाराज स्वामींची जावयाची आज्ञां ते प्रांते जाहाली. त्यांस पूर्वी स्वामी फुडी (पुढें ?) होते. सर्व प्रकारे साभिमान धरून पुणियाहून कितेक प्रकारे अभये देवून उभारणीं केली ; त्यास येथाशक्तीनरूप जे सेवा घडोन आली ते केली. मालवियांत स्वामीकडील फौजा होत्या त्याणी आपणास व राजश्री उभयतास पवारांस पत्रे पाठविली कीं, मालवियाचा बंदोबस्त करून तुमचें कुमकेस गुजरातेस येतो. त्याजवरून दोहोदेजवळून मनदसोरच्या रोखे गेलो. बोलाविले असतां चालोन येवून जे कलोन करावे तेंच केले ; परंतु आपली क्रिया स्वामीच्या पायांसी गुंतली होती आणि राजश्री कृष्णाजी पवार विश्वासराऊ यांणी मधे पडोन तो कजिया वारला. त्याजवर राजश्री मल्हारजी होलकर यांणी मधे विश्वासरायास देऊन तीस हजार रुपये कबूल करून आपल्या लस्करासमीप नेले. सवाई जयेसिंग याजकडील कार्य जाहालियावर येक पैसा न दिल्हा ; आाणि नानाप्रकारे कटाक्ष केले ते कोठवर ल्याव्हे ? परंतु मुख्य आपला विचार स्वामीच्या चरणांसी दुसरा नांही, त्याजकरितां सर्वच येकीकडे राहिले. मोरं[1] जे स्वामी साहित्य करितील त्याप्रमाणे सेवकापासून सेवा घडोन येईल. तेथे पाल्हाळ काय लिहिणे ? वरकड आपण तों पदरीचा सेवक आणि राजश्री कृष्णाजी पवांरहि स्वामीचे पदरीचे आणि हा मनसुबा स्वामीच्या वचनावरून त्याणींहि मान्य केला होता. आंणि राजश्री उदाजी पवार तों पूर्वापासून स्वामीचे पदरीचे ; त्यास नाना यत्न करून दाभाडियाकडून काढिले. तेहि विचार करून स्वामीचे त्याचे येकचित करावे हा सेवकाचा हेत होता आणि सेवा करून दाखवावी येसा बहुत हेत होता ; परंतु हे सर्व स्वामीच्या सरदारानी आमचे हेत सेवटास जाऊ न दिल्हे. त्यास स्वामीनेहि मेवाडबगाडा (?) येथील सनदा हे खासगीचे परगणे यांच्या सनदा सेवकाजवळून घेतल्या. त्यासीहि हुजूर काही आपण अद्यापवर चर्चा न केली. त्यांस हे उभयता पवार स्वामीच्या पदरीचे आहेत. आणि ते प्रांते तो जावे लागते. त्यास स्वामीची फौजहि मालवी प्रांती जाईल. जर हा मनसुबा स्वामींच्या चितास येईल तर जे सरदार ते प्रांते जातील त्यास आज्ञापत्रे येतील तर ते व आपण येसे सुरत महालाहून पायागडपरयेंत जाऊ. गडची बेगमी होऊन फौजेचीहि उस्तवारी[2] जेसी सेवकापासून होऊन येईल तेसी करून. परंतु स्वामीच्या चित्तास येईल तर रा मल्हारजी होलकर व रा राणोजी सिंदे व रा आनंदराऊ पवार यास पत्रे येतील, तर खामखा ते व आपण येक

---

१ म्होर–पुढें. २ व्यवस्था.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

होऊन त्या प्रांतास जाऊं. जो आपल्या चितांत सेवा करून दाखवावी येसा हेत आहे त्याकरितां सविस्तर वृत सेवेसीं लिहिली असे. त्यास स्वामीच्या चितास जेसा विचार येईल तेसी उतरे व उभयेता पवारास समाधानाची बहुतसी पत्रे पाठवणार स्वामी समर्थ आहेत. मेवाडबगड याविसीं काये आज्ञा स्वामी करितात व तीस हजार रुपयाची काये आज्ञा? जेसी आज्ञा स्वामी करितील तेणेप्रमाणे सेवक वर्तणूक करील. येविसीं विस्तरे काये लिहिणे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Naro Vithal Prabhu on behalf of Udaji Powar writes to Bajirao about Udaji's readiness to serve the Peshwa in his northern conquests and begs him to utilise his services. More light is necessary to determine the date of this paper.*

No. 55] [*1735?*

श्री

राजश्री पंतप्रधान साहेबांचे

सेवेसी. श्रीमंत अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये स्नो॥ रघोजी कदमराव दंडवत विनंती. येथील कुशल माघ शुध ५ पंचमीपर्यंत आपले प्रतापेकरोन येथास्थित जाणोन स्वानंदलेखनआज्ञा केली पाहिजे विशष. राजश्री रावोपंतासमागमे उदेपुरीहोन उंटे आली होती ते साहेबांचे आज्ञेप्रमाणे रनाळियात आजीपर्यंत आपणांपासीं ठेविली आहेत. याउपरी लस्करास साहेबांकडे मार्गस्त करावी किंवा पुण्याकडे पाठवावी? जेणेप्रमाणे आपली आज्ञा होईल त्याप्रमाणे यांसी मार्गस्त केले जाईल. सदैव पत्र पाठऊन सांभाळ करावयासी आपण समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें, कृपा वर्धमान केली पाहिजे, हे विनंती.

¶*Raghoji Kadamrao to Bajirao, offering to send him the camels that had been procured from Udepur.*

[पाा *5-1-1736?*

No. 56]
पाा छ २ रमजान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री अपास्वामीचे सेवेसी विनंती. काली भृगुवारी तृतीये-प्रहरी राजश्री स्वामी राजश्री सुमंतास बोलिले की, तुम्हास नवाबाचे पत्र, 'येणे' म्हणून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आले आहे की काये ? त्यावर सुमंत बोलिले की, होये, पत्र आले आहे. त्यास राजश्री बोलिले की पत्र आले असिले तर तुम्ही जावे. सुमंत बोलिले की माहाराज जेव्हा आज्ञा देतील तेव्हा जाईन. त्यावर राजश्री बोलिले की, बावा[१]! येविसीचा काये विचार ? त्यावर बावा बोलिले की नवाबाचे पत्र आले असिले तर यासी अगत्य रवाना करावे. तेथे याचे मातबरीविना भलतेविसीचा जाबसाल होतोसा नाही. त्यावर राजश्री बोलिले की सुमंतास पाठवावे हे काही आमचा विचारास येत नाही. का म्हणाल तरी, राजश्री प्रधानपंत उतरप्रांते गेले आहेत ते तिकडे काये मनसबा करितील ? आणि याणी यासी काये बोलावे ? कदाचित राजश्री पंतप्रधान याची व सार्वभोमाची भेट जाहली तरी नवाब सुमंतासी काही सुधे भाषण करणार नाही. सदरेस येखादी अधिकउणी गोष्ट नवाब बोलिला तर सुमंतास परम संकट प्राप्त होईल हा विचार आम्हास सुचतो. यास्तव राजश्री पंतप्रधान याजकडील वर्तमान येऊ द्यावे. मग यासी रवाना करणे ते करावे, यैसे बहुत तपसिले बोलिले. त्यावर सुंमत बोलिले की महाराजानी विचार म्हटला हा येथार्थच आहे. परंतु प्रस्तुत नवाबानी आपल्यास येणे म्हणून लिहिले असता अनास्थेची गोष्ट करील हे होणे नाही. तथापि माहाराज तूर्त स्वारीस जातात, आम्हीहि बराबर येतो. कदाचि(त) विचारे जाहाले तर सैदलस्करखान याजकडे जाऊन त्याचा बंदोबस्त करणे तैसा करून, यैसे बोलिले. त्यावर राजश्री बोलिले की सैदलस्करखान याजकडे सुमंतास पाठवणे तर पाठवावे आणि त्याचा खुलासा काये आहे तो मनास आणावा, यैसे बोलिले. परंतु येकहि विचार ठरावला नाही. स्वामीस कलावे याकरिता लिहिले असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*This letter records how Shahu was afraid of giving orders on political complications in the absence of Bajirao. Shahu would not send Sumant to the Nizam, unless Bajirao was at hand, lest new complications might occur. It seems Shahu was right in not compromising Bajirao's position in distant lands.*

No. 57] [पौ *5-1-1736?*

पाा छ २ रमजान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री अपा स्वामीचे सेवेसी विनंती. प्रस्तुत येथे वर्तमाने आली आहेत की निजामनमुलुक म्हणजे खामखा दुर्बुधीवर आहे. तदनरूप

---

१ नारबावा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आचरणहि करितात. सैदलस्करखान फौजसहित जुनर प्रांती येतात. खासा नवाबहि विज्यापूर प्रांते येतात. चव्हाण बिवडला व शामल बहुत सेर जाहला, ऐसी वर्तमाने विशेष आलियावरून राजश्री स्वामीनी सदरहू वर्तमानाची चर्चा बहुत सचिंत काहाडिली. तेव्हां सुमंत बोलिले कीं महाराजास जेजुरीस जाणे की न जाणे? त्यावर राजश्री आनमानीतसे जाणे म्हणून बोलिले. त्यावर राजश्री स्वामी बावांसी[१] बोलिले कीं तुमच्या विचारे काये विचार? त्यावर बावा बोलिले कीं महाराज जेजुरीस जातात ही गोस्ट आजी दोन महिने मुलकात व दूरवर घुमली. यैसे असता अता न गेल्याने लौकिक विरुध आहे. खामखा जावे, यात दुसरा विचार कार्याचा नाही. सदरहूप्रमाणे समत सुमंतानी दिल्हे. त्यावर राजश्री बोलिले कीं सतमीस येथून निघावयाचा मुहूर्त आहे, ते दिवसी निघोन खांबटकीच्या घाटे सिरवलावरून हरगुंड्यास[२] जाऊन तेथून जेजुरीस जाऊं. तेथून सिवापुराकडे जाऊं. त्यावर राजश्री नारबावा बोलिले कीं सिवापुराकडे जाणे तर जावे नाहीतर न जावे. देवदर्शन मात्र करून यावे. त्यावर राजश्री बोलिले की जेजुरीस गेलो तेव्हां सिवापुराकडून येऊच; तथापि महालातील मर्जीप्रमाणे वर्तावे लागेल. विचारे होईल तैसे करू यैसे बोलिले. साराउष चहुकडील गलबलीच्या वर्तमानामुले राजश्री सचिंत आहेत. यापेक्षा अधिक गलबला आइकल्याने यात्रेस जावयाचा विचार पडेलसे दिसते; परंतु स्वामीनी सामान करणे ते करावे. हैगै सहसा न करावी. जाहाले वर्तमान विदित व्हावे यास्तव लिहिले असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nana to Chimaji from Satara, explaining how disconcerted Shahu had become on account of disturbing news of the Nizam's movements.*

No. 58] [*5-1-1736*

पाा छ २ रमजान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंती. काली सुक्रवारी राजश्री मंत्री व राजश्री माहादोबा व सेखमिरा आले. राजश्री स्वामी वर्यिंकडे[३] सिकारीस गेले होते. मार्गी राजदर्शन जाहाले. तेव्हा राजश्री नारबावा व सेखमिरा दोन घटका पुढे आले होते, त्यासी राजश्रींनी पुसिले की काये वर्तमान? मोगलाकडील काये वर्तमान? राजश्री चिमाजी

---

१ नारबावा? २ हरगुडे = ता. पुरंदर. ३ वर्यें साताऱ्याजवळ.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

अपा कोठे आहेत ? आम्ही जेजुरीस जाणार येविसी काये विचार ? यैसे बोलिले. त्यावर राजश्री नारबावा बोलिले की मोगल येतो खराच परंतु त्याचा मजकूर काही कलत नाही. च्यार हजार फौजसहवर्तमान येत आहे. याउपरी, राजश्री आपा पुण्यात आहेत, माहाराजाच्या आज्ञेप्रमाणे राजश्री पिलाजी जाधव यासी कोकण प्रांते रवाना केले. जेजूरीस जाणे तर मातबर सामानानसी जावे, सरलस्करची कुल फौज समागमे घ्यावी आणि जाणे तर जावे. त्यावर राजश्री बोलिले की सोमवंसी यासी फौजसुधा गोवलकोटास पाठवावे लागते. त्यावर बावा बोलिले की संभाजी अंगरे लोक व तोफा सामानसुधा आल्याविना सोमवंसी यासी न पाठवावे. त्यावर राजश्री बोलिले की, बरे. आता आपण घरास जावे. आम्हीहि घरास येतो. मग जे बोलणे ते बोलू, यैसे बोलिले. त्यावर बावा घरास आले, तों मागाहून रा। माहादाजीपंत आले. त्यासीहि राजश्रीनी पुसिले की मोगलाची काये तजवीज आहे व पुढे वर्तमान काये ? त्यास यानी उतर दिल्हे की मोगल मातबर सामानानसी येत तो आहे. मग त्याचा मगज काये हे कलत नाही. त्यावर राजश्री बोलिले की, उगीच निजेली गाधले उठविली. याउपर यासी निवारण कोणे रीतीने करितां ? त्यावर रा। माहादाजीपंत बोलिले की कोणे-विसीचे निवारण करावे ? मोगलाचा काये मजकूर हे आम्हास काये कले ? त्यावर राजश्री बोलिले की, बरे. तूर्त घरास जाणे. आम्ही घरास येतो. त्यावर हे घरास आले. त्रितीये प्रहरी राजश्रीहि घरास आले. आम्हास व राजश्री मंत्री व राजश्री सुमंत यासी बोलावू पाठविले. त्यावर मजकूर जाहाला तो अलाहिदा लिहिला असे. कलले पाहिजे. +सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nana to Chimaji Appa, communicating Shahu's anxiety about the movements of the Nizam.*

No. 59] [पो *6-1-1736 ?*

छ ३ रमजान

श्री

राजश्री बाजीराऊजी पंडितप्रधान गोसावी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो। चंद्रशेन जाधवराऊ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकीय कुशल

+ पत्र नानासाहेबाचें. हस्ताक्षर माहादोबा पुरंदरे यांचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लेखन केले पाहिजे विशेष. राउली पत्रें पाठविली ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ सविस्तरे आवगत होऊन परम संतोश जाला. पत्रीं लेख की "आपण तो उतर प्रांते जातों. मजल दरमजल जातों. तिकडे प्रसंग पडेल तदनुरुप श्रीसंकल्पेकरून घडोन येईल तें गोसावियाच्या श्रवणीं अवगत होईल. मागे राजश्री आपा आहेत. इकडे उपस्थित होईल तदनुरूप राजश्री आपणांस लिहितील तदनुरुप आपण रा। नाइकजी मोहितियाहाती मुखोत्गे (मुखोद्गते) सागोन पाठविलें, तदनुरुप करावे" म्हणऊन कितेक विस्तरेकरून लिहिलें. यैसियास, आपले उतरेस गमन जाले आहे. तिकडे श्रीकृपेकरून येशच विशेशात्कारेकरून प्राप्त होईल आणि इकडूनहि राजश्री लिहितील त्याचेही पारपत्य करून. उभयेपक्षी इतरता नाहीं. आपणाकडील क्षणक्षणा वृत पत्री लेखन करून पत्रे प्रेशन करीत गेले पाहिजे. राजश्री नाईकजी मोहितियास आज्ञा करून आपणाकडे पाठविले पाहिजेत. आपणासी शफतपूर्व (क) करार करून गेले आहेत कीं आपण फिरोन येतो. तरी आगत्यरूप राजश्रीस पाठविले पाहिजे. सदइव पत्रे पाठऊन स्नेहाभिवृधि करीत गेले पाहिजे. बहुत काये लिहिणे + हे विनंती.

¶*Chandrasen Jadhav expresses his readiness to execute Bajirao's commands and assures him of his full friendship. This shews that Chandrasen did not entertain implacable enmity for the Peshwas.*

No. 60] [*9-2-1736 ?*

छ १४ सवाल मुा पावल

श्री

तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

अपत्ये नानाने कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. स्वामीच्या आसीर्वादेकरून ता। छ ७ सवालपरियेंत कुषल आसो विशेष. स्वामीकडील सांप्रत पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं याकरिता चितांस समाधान नाही. तरी आसीर्वादपत्र पाठवायांस आज्ञा केली पाहिजे. स्वामीनी छ १२ साबानीची पत्रे मुकाम मंदसोर बराबारी संताजी ताव्या यासमागमे पाठविली तीं छ १४ रमजानी प्रविष्ट जाली. त्यावरून समाधान जालें. त्याची उतरे लेहून संताजी ताव्या स्वामीकडे रवाना केला आहे. त्यांवरून वर्तमान विदित जाले आसेल. सांप्रत स्वामिकिडील वर्तमान कलत नाही, याकरितां राजश्री स्वामीनी पत्रे लेहून मुजरद जासुदजोडी स्वामीकडे रवाना केली आहे त्यावरून सविस्तर आर्थ विदित होईल. यानंतर

+ येथून पुढील अक्षर बालबोधींत लेखकाच्या हातचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तपोनिधि मनसापुरी गोसावी बारागांव नांदूर येथे राहत आहेत. त्याच्या दर्शनाचे प्रयोजन राजश्री स्वामीस आहे, हे वर्तमान पूर्वी स्वामीस विदितच आहे. याकरिता राजश्री स्वामीनी आज्ञा केली आहे की, तुम्ही येतेसमई तुम्ही त्याच्या घरास जाऊन त्याचे बहुताभातेन समाधान करून त्याचा बहु(मा)न करून त्याला समागमे दर्शनास घेऊन येणे म्हणून आज्ञा केली. त्यावरून स्वामीस पत्र लेहून पाठविले आहे. तरी स्वामीनी त्यांच्या घरास जाऊन बहुत समाधान करून त्यास समागमे घेऊन आलियाने राजश्री स्वामी बहुत संतोषी होतील. याकरिता बहुत प्रकारे कार्य करून गोसावीबावांस समागमे घेऊन आले पाहिजे. येविसी आनमान केला न पाहिजे. सेवसी श्रुत होये हे विनंती.

¶*Nana Saheb to Chimaji Appa, requesting him on behalf of the King to visit the saint Mansapuri Gosavi and bring him with himself to Satara.*

No. 61] [*20-2-1736*

पाा छ २० सवाल

श्री

तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

अपत्यें मल्हार तुकदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १८ सवाल भृगुवार प्राथःकालपर्यंत स्वामीच्या आसीर्वादेंकरून येथास्थित असे विशेष. येथील सकल अर्थ अलाहिदा पुरवण्या लेहून पाठविल्या आहेत त्यावरून विदित होईल. सारांश स्वामीनी राजश्री रामचंद्र हरि याजकडे येक शाहणा कारकून व पांच स्वार पाठऊन फौजसहवर्तमान त्यास घेऊन यावे, यामध्ये उतम गोष्टी आहे. राजश्री स्वामी संतोष पावतील. निमित्य पदरीचे जाते याकरिता स्वामीनी मानिलेस फौजसहवर्तमान आणविले पाहिजे. चइत्र सुध सप्तमीचे श्राध करून स्वामीनी खासा येक महिना दरबारी येऊन राहावे. मागती पुणियास जावे. परंतु यावयाचा विचार केला पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Malhar Tukdeo, the Peshwa's agent at Satara, writes to Chimaji Appa asking him to bring Ramchandra Hari to Satara and thus to satisfy the King. The Peshwa, he says, must at least pass one month at Satara with the King.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 62] [*12-5-1736 ?*

छ ११ मोहरम

श्री

विनंती उपरी, आम्हास आपण पत्रे पाठवितील त्याजबरावरी राजश्री पिलाजी जाधवराऊ यासहि पत्रे पाठवीत जाणे. परवा पत्रे पाठविली त्याची उतरे पाठविली आहेत. पुढेहि पत्राबरावरी त्यास पत्रे पाठवावी. हे विनंती+

¶*Chimaji Appa suggests to his brother Bajirao to write to Pilaji Jadhao.*

No. 63] [*5-6-1736 ?*

पाा छ १६ रबिलाखर

श्री

तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आपले अंताजी नारायण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ ६ रबिलोवलपावेतो स्वामीचे कृपेकडून वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री पिलाजी जाधवराव याचा लाखोटा स्वामीस आला तो शेवेसी पाठविला आहे त्यावरून विदित होईल. पत्राचे उत्तर मारनिलेस पाठवावयासी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. याचे उत्तर सत्वर ये ते केले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Antaji Narayan to Chimaji Appa : forwards Pilaji Jadhao's letter. The writer is Chimaji's Mujumdar and father-in-law of Sadashivrao.*

No. 64] [*23-6-1736 ?*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसांवी यासी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधव दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. आम्ही या प्रांते आलो, त्यास मावजी पवार याने पाटवदियात[१] ठाणे बलाविले. आपाचे कोण्ही नाही, त्याचा अमल चालतो. इकडेहि बोडके पाा टिकली येथे व नागापुर पाा अंतुर येथे हरि नारायेणाने ठाणी बसविली. जिवाजी मोरे आले. पाा कनड येथें आडचेकसे राऊत व बरकंदाज यैसे बसले. गोंदेगावी ठाणें बसऊन निभोरियासी खटपट करीत होते. त्यास आम्ही

+ पत्र चिमाजी आपाचें बाजीरावास असावें.

१ पाटोदे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

कनडेतून टाकलीतून अंतुर फुलमरी सुतोंडा उभे धावेने फेरा करून जाळून नागापुर मारिले. या करितां बाहेर तो त्याचा अमल बंद जाला. गोंदेगावातील ठाणे पलालें. तिकडून चालिसगावावरीं सांप्रत छ २४ सफरी येताच जिवाजी मोरे आव्यातून पलाला. आता का। कनडे का। टाकली थेथे मोगलाचें बलें बसले आहेत. धामधूम करितात. तर त्याच्याहि उपायांत आहो. यैसेंच पाटवदियाची गुंज मोडावी लागते. तर राजश्री आपाजीपंतास पाटवदियात पाठवणे. थेके ठाई बलावले म्हणजे कामा न ये, तर पाटवदियात आपास पाठवायासी तजवीज अगत्य केली पाहिजे. राजश्री कंठाजी कदम बोरकुंडाआलीकडे आम्हापासून आडचा गावावरी आहे. व राजश्री रायाजी जाधव अमलनेरी गाव घेतला. वाडा थेका दों रोजा घेणार. त्यास आणून दौलताबादेकडून रोज्याकडून तमाम वाळुंज देखील जाळून टाकितो. आपले पुण्य समर्थ आहें तरी निंबाची चौकीस आगी देतो. चाकरीस अंतर सहसा होणार नाही. दिवाण ऐवजाचीहि तजवीज लकरीच करून चिठी जोसी याची पाठऊन. अद्यापि च्यार पाहर कोठे राहिलो नाही. उभे धावने फेरा केला. कमाविसदार लपाले, खानदेशांत ते भेटले नाहीत. माणसे पाठविली आहेत. वरकड खानदेश गंगथडी वगैरे इकडील मामलियाचें काये केले, आम्ही कोठे काही घेतले, तर मामलेदार म्हणतील आमचा मामला बुडिवला. तर कोणावयास पाठवायाचे असेल ते पाठवावे. येदलाबाद वगैरें मामला बुडवतों. वरकडहि माहाली कोण्ही कोठे दिसत नाही. याचा विचार मनास आणिला पाहिजे. हे विनंती.

¶*Pilaji Jadhav communicates to Bajirao his activities in Khandesh.*

No. 65] *[4-8-1736*

पौ छ १६ रा।।लाखर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ तथा राजश्री आपा स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी. ७ रबिलाखरी भृगुवारीं प्रात:काली दरबार जाला तेव्हां राजश्री स्वामीनी जाजती लोकांस आज्ञा दिल्ही. अगत्याअगत्ये सरकारकून व लोक होते. राजश्री स्वामी राजश्री रामाजी दामोदर यास बोलिले कीं रा। गोरखोजी भा(प)करासारखा माणूस पदरचा दवडावा यैसे नाहीं. कामाकाजाचा मर्दाना फौजेचे सामान उतम आहे त्यास काही जाऊ द्यावा यैसे नाहीं.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

परंतु आम्हीं ज्याची निरवणूक केली त्याची अवस्था यैसी जाणावी कीं पंधरा दिवसीं दवडावयाचा तो आठाच दिवसांत दवडतील. यैसी सर्वत्र चाल चालत आली आहे. त्यावर राजश्री येमाजीपंत बोलिले कीं साहेब उत्तम प्रकारें आज्ञा करितात. रा रामाजीपंत कशास आज्ञा उलंघन करितील ? त्यावरी रा रामाजीपंत बोलिले कीं सरदारी व मामला हीं दोन्ही येकासच असिलीं म्हणजे मामला बुडतो; याकरितां सरदारी निराली, मामला निराला यैसें असिलें पाहिजे. याकरितां सरदारी भापकरास आहेच; मामला मात्र दुसरियास सांगितला पाहिजे. तदनंतर राजश्री स्वामी बोलिले कीं हे गोष्ट खरीच आहे. सरदारी व मामला येकासच असिला तर मामलियाची पायेमली होते खरीच. परंतु गतवर्षी सयाजी गुजर जाऊं लागले * * * * आम्ही सांगितले कीं यास पदरचा जाऊं न द्यावा. साठ हजार रुपये मामल्याचे देत आहे, ते कबूल करून त्यास जाऊं न देणे. बरा माणूस आहे. परंतु सांगितली गोष्ट न आइकिली. तो पदरचा दवडिला तो राजश्री प्रधानपंताचे पदरीं जाऊन पडिला. त्यास त्यानी दाहा-हजार फौजेचा सरंजाम देऊन ठेविला. तो संतोषरूप आहे. तसेंच गोरखोजी भापकराचे चवथे पुत्र त्यांजकडेच आहेत तेहि खुशाल आहेत. गोरखोजी गेला म्हणजे त्याचे बरेंच होईल, यैसे बोलिले. त्यास राजश्री नारबावा मंत्री बोलिले की राजश्री उ(दाजी) पवारहि राजश्री पंतप्रधान यांचे पदरी जाऊन पडिले. त्यास त्यानी पांचा हजाराचा सरंजाम देऊन ठेविले. त्याचाहि काल उतम आहे म्हणून. त्यावर मागती राजश्री स्वामी बोलिले कीं राजश्री प्रधानपंताकडे उदाजी पवार चाकर राहून सरंजाम घेतला असें असिलें तर आमचा हुजरातचा सरंजाम त्यास कशास पाहिजे ? त्याजकडून दूर करून त्याचे येवजीं दुसरा सरदार ठेऊन त्यास तो सरंजाम देऊं म्हणून बोलिले. (त्या)वरी आम्हीं प्रत्योत्तर केलें कीं उदाजी पवार कांहीं साहेबांची चाकरी टाकून गेला यैसे नाहीं. साहेबींच उदाजी पंवारास राजश्री पंतप्रधान यांचे ताबीनात[१] केले. त्यावरून साहेबांचे हुकुमावरून त्यासमागमे गेले आणि त्यानीहि नेले. याउपरी राजश्री पंतप्रधान देसास आले. पवारहि देसास आले. राजश्री पंतप्रधान साहेबांचे दर्शनास येतील तेव्हां पंवारहि हुजूर येतील. सेवाचाकरी मागती करितील. त्यांचा सरंजाम दूर करावयाचें साहेबांचे मुखांतून न यावे. साहेबीं हे गोष्टी न काढावी. त्यावर राजश्री स्वामी बोलिले कीं उदाजी पंवार फौज पाठऊन हुजरातीस चाकरी करूं म्हणतील तर तें कांहीं आम्हास मानणार नाहीं. खासा

---

१ ताब्यांत दिले, हाताखालीं दिले.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

उदाजीच आला तर सरंजाम त्याचा त्यास करार होईल, नाहींतर होणार नाहीं म्हणून. त्यावर आम्ही मागती बोलिलों कीं राजश्री उदाजी पंवार खासाच सा(हे)बांचे चाकरीस येतील. साहेबीं जी भाकर (दि)ल्ही आहे ती ते टाकणार नाहींत. सेवाचाकरी पहिलें केली आहे, आणि पुढेंहि करितील. उदाजी पवार साहेबांचे दर्शनास येत तोंपर्यंत त्याचे सरंजामाची चर्चा साहेबी न करावी. चाकरीस न येतच तर मग पुढें साहेबांचे चितास येईल तें करावें. मग राजश्री स्वामी उगेच राहिले. तर स्वामीपासीं मारनिलेचा कारकून कोणी असिला तर ये गोष्टी(चा) विचार त्यास पुसावा. तथापि कारकून न(स)लाच तर बोलाऊन आणून विचार मनास आणिला पाहिजे. उतर पाठविलें पाहिजे. जाले वर्तमान सेवेसी कलावें यास्तव लिहिलें आहे. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Differences about policy and appointments between Shahu and the Peshwa and the consequent confusion are well exemplified in this letter.*

No. 66] [*12-8-1736 ?*

श्रीरामवरद

श्रीमंत राजश्री राऊ
स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक बरवाजी ताकपीर सां दंडवत विज्ञापना. येथील वर्तमान ता श्रावण वद्य १ परियेंत स्वामीच्या कृपादृष्टीकडून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विषश. बहुत दिवस जाले, माहाराजाकडील आभयेपत्र येऊन परामृश न झाला. त्याजवरून चितास समाधान नाही. विषश. चिरंजीव सटवाजी श्रीमंत् रा आपा स्वामीसमीप आहेत. त्याची माया तो स्वामीसहि आहे. आम्ही लेहावे यैसा पदार्थ नाही यानंतर स्वामीनी वृत्तीविषई बेलभंडार वचन दिल्हे आहे. ते स्वामीच्या ध्याना तो आहेच. परंतु स्मरणार्थ मात्र लि आहे विषश. सर्वश्वे तीर्थीश्वरूपाचे ठिकाणी स्वामी आहेत आणि वचन स्वामीनी दिल्हे आहे, ते गोष्टीचा अभिमान धरून वतनावरी संस्थापना स्वामी करणार समर्थ आहेत. यानंतर चिरंजिवाचे ऊर्जित करून सेवा घ्यावयासी स्वामी समर्थ आहेत, हाहि आम्ही तो पूर्ण भरोसा स्वामीचा धरिला आहे. यानंतर उमाबाई दाभाडे व गायेकवाड या उभयेतांचे समजाविशासि आम्ही आहे. याचे शौरश्य जाहालिया-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नंतर स्वामीकडे सकळ वर्तमान लेहून पाठविले जाईल. वरकड आम्ही तो सर्वश्वे पायाची जोड केली आहे. दुसरी गोष्टी जाणत नाही. चरनासंनिध नाही म्हणून माया पातळ केली न पाहिजे. चिरंजीव पदरी आहे. कलल ते रीतीने साभाळून इजतीस स्वामी चढवणार समर्थ आहेत. विषश काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Barvaji Takpir applies to the Peshwa for his own elevation and for that of his son in the services of the Peshwa. He is trying, he says, to settle the differences between the Gaekwar and Umabai Dabhade.*

No. 67]

[30-12-1736

पा छ २७ साबान

श्री

पुा तीर्थरूप राजश्री अपा स्वामी वडिलाचे सेवेसी

विनंती. काल अम्ही राजश्री स्वामीच्या दर्शनास गेलो, ते समई राबता मोडला होता, ते समईच आम्ही गेलो. आत गेलो; मुजरा जाहाला. येकलेच बसले होते. आम्हास आलीकडे बोलाविले. आम्हास पुसले जे, बाजीराऊ कोठे गेले? काय मनसबा तो तुम्हास काही कलला किंवा नाही? आम्ही जाब दिल्हा जे, मनसबा आणीक काय आहे? दोन तीन वर्षे स्वारीस गेले नव्हते म्हणून गेले, इतके आपल्या ठावके आहे. त्याजवर राजश्री बोलिले, तुम्हास का त्याचा विचार काय (तो) कलेल? इतके वर्तमान जाहाले ते समई कोणी नव्हते. त्याजवर आम्ही मुजरा करून बाहेर आलो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nana to Chimaji, communicating his interview with Shahu who enquired about Bajirao's movements.*

No. 68]

[1736 ?

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती. स्वामी गुरवारी सुमुहुर्ते स्वार होऊन प्रस्थाने राजश्री बाबूजी नाईक याचे घरी जाऊन राहिले. प्रतिपदेस मजल दरमजल जाणार म्हणून वर्तमान येथे आले, त्यावरून राजश्री स्वामीनी पुसिले. त्यास स्वामीनी तो पत्री काही लिहिले नाही परभारा वर्तमान भलतेही येथे येतें, त्यावरून राजश्री आम्हास

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पुसतात. आम्हास तो होये नव्हे म्हणावयासी काही कलले असत नाही. तरी येविसींचि काये वर्तमान ते लिंहिले पाहिजे. त्याप्रमाणे येथे राजश्री पुसतील तेव्हा सांगो. तर सविस्तर लिहिले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Purandare to Bajirao, requesting him to keep him (Purandare) informed of his intended tours, since he has to communicate the same to the King when he happens to ask about them.*

No. 69] [*1736 ?*

श्री

राजश्री चिमणाजीपंत गोसावी यांसी

॥ऽ अंखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री चंद्रशेन जाधवराऊ दंडवत उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ सविस्तरे आवगत जाला. शामलाच्या पराभवाचे वर्तमान सविस्तरे लिा त्यावरून परम संतोश जाला व रा उदाजी चव्हाण याकडल्या पैकिया विचा(र लि)हिलें. त्यास या पत्रांचें पूर्वीच नवाब सा(हे)बी आपणास आज्ञा दिधली. ते समागमेच होते. त्यासहि नवाबसाहे(बी) सनदा करून देऊन त्यास रवाने केले म्हणऊन वर्तमान यैकिले. यैसियास आताहि त्याजकडे पत्रें पाठऊन त्याची उतरे आणऊन तुम्हास लेहोन पाठऊन. कर्ज कोन्हास सुटत नाहीं. बहुत काये लिहिणें हे+ विनंती.

¶*Chandrasen Jadhao congratulates Chimaji Appa upon his victory over Sidi Sat.*

No. 70] [*6-5-1737 ?*

छ १६ मोहरम

श्री

विनंती उपरी. आजतागाईत कर्ज घेऊन खर्च केला. पुढेहि राजश्रीपासून धातुपोषणाची पत्रे येतात. कर्जासी समंध पडला आहे म्हणून. कर्जासी समंध पडला तर येथे स्वामीचा यत्न काये आहे? मसलतच प्राप्त जाल्यावर समई खर्चास तो पाहिजे. बरे विचार करून निकाल निघाला बदलौमी[१] न येता, तर

\+ यापुढील मजकूर बालबोधींत असून तो खाशाच्या हातचा. चंद्रसेनाचा व पेशव्यांचा पूर्वीचा द्वेषभाव नाहींसा झाला असें यावरून दिसतें.

१ बदनामी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

काढावा. नाही तर जे कर्ज होईल त्याचा फिटावयाचा उपाय जो होणे तो ईश्वरकृपेने होईल. परंतु धन्याची बदनामी आपणावरच येऊ द्यावी यैसे नाही. हे विनंती.

¶Chimaji Appa to Bajirao, complaining of Shahu not supplying funds and of debts daily increasing.

No. 71] [*26-4-1737?*

छ ६ मोहरम

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ स्वामीचे
सेवेसी

विनंती. स्वामीनी लिहिले की तुमच्या लिहिल्यावरून राजश्री फतेसिंगबावा व सौ विरुबाई व राजश्री नारबावा समस्त यासी पत्रे लेहून हवाला आपल्या पत्रावर घातला आहे, तरी आपल्या विचारे ज्यास पत्रे देणे ते देऊन वर्तमानहि सांगणे ते सांगावे. म्हणून लिहिले. यैसियासी स्वामीनी पत्रे लिहिली होती ती ज्याची त्यास दिल्ही. वर्तमानहि कार्याकारण सांगितले. स्वामीस विदित व्हावे यास्तव लिहिले असे. हे विनंती.

¶Chimaji Appa delivers Bajirao's letters to Fatesing, Virubai and Narbava..

No. 72] [पा *8-7-1737?*

छ २१ रोवल

श्री

पुरवणी राजश्री अपास्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. दरबारीचे वर्तमान स्वामीचे सेवेसी पूर्वी लेहून पत्रे पाठविली ती सेवेसी प्रविष्ट जाली आसतील. साप्रंत वर्तमान तरी राजश्री स्वामी चिता-पासून स्वामीचे फौजेचा मार्ग लक्षीत आहेत. तरी स्वामीनी श्रीमत राजश्री नानासमागमे उतम फौजा देऊन सत्वर रवानगी केली पाहिजे. येविसी अनमान केला न पाहिजे. स्वामीचे येणे पुणियास जाले असता फौजेस दिवसगत लागालियाने कार्याची गोष्टी नाही. उदाजी चव्हाण याणी मागती जीव धरून तासगावास येऊन चहूकडे उपद्वयाप मांडिला आहे. त्याचे पारपत्य करणे राजश्री स्वामीस अगत्य. परंतु फौजेचे बल नाही. त्याचे पारपत्य करावयांस सरदार

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

नाही. सांप्रत समीप जितके सरदार व फौज आहे तितकी सिरवल गुर्मेट व आकेवोट[२] हे दोन्ही ठाणी भांडत आहेत, त्यास गुतली आहे. काही राहिली ते फौजने कही राखावी, माहालची चौकी करावी, येसा प्रसंग येथील आहे. तरी स्वामीनी पत्रदर्शनी फौज उतम दोनसे कैरोल[३] फौजमध्ये लोक नावाचे येसे श्रीमंत राजश्री नानासमागमे देऊन पाठविले पाहिजेत. येविसी अनमान केला न पाहिजे. सत्वर पाठविले पाहिजेत. हे पत्र राजश्री स्वामीची मरजी पाहून लिहिले आहे. राजश्री स्वामी नित्य पुसतात की राजश्री पंतप्रधान याजकडील वर्तमान काये? दुसरी गोष्टी स्वामीचे येणे पुणियास जाले येणे करून बहुत समाधान पावले. तरी स्वामीनी फौज सत्वर पाठविली पाहिजे आणि वरच्यावर पत्रे पाठविली पाहिजेत. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Shahu desires Nana to accompamy him with strong forces, in his expedition towards Miraj.*

No. 73] [*5-11-1737?*

छ २२ रजब

श्रीर्जयति

आपले नानाने सां। नमस्कार विनंती. येथील क्षेम ता। छ १४ रजब मु। पुणे येथास्थित असे विनंती. स्वामीची पत्रें एकदोन वेळां आली. त्याची प्रतिउत्तरे सेवेसी पाठविली आहेत त्यावरून विदित होईल. येथे आज्ञेप्रमाणे तरतूद वरचेवरी करीतच आहो. कर्जदारांच्या ऐवजाची आज्ञा की निकडीने पैका घेणे. त्यास तीर्थरूप राजश्री आपाकडील पत्रे आली ती सेवेसी पाठविली आहेत, व हिसेब पाठविला आहे. त्यांत त्याणी यक बाबैल[४] व उतराण हे दोही महालचा हवाला मात्र क्षेपनिक्षेप रा। बाळाजी भिकाजीकडे आहे; वरकड येईल तो ऐवज देतील, ऐसे लिहिले आहे. आम्ही निकड करावी तरी ते हाली प्रो। म्हणतील. यास तीर्थरूपाचे पत्राचा अर्थ चितात आणून जे आज्ञा कर्तव्य ते करावी तदनरूप वर्तणूक करून. सांप्रत आपले जाणे पुढे कोठवरी जाले, काय वर्तमान ते लेहून पाठवाया आज्ञा केली पाहिजे. पुढेहि वरचेवरी वर्तमान लेहून येई ऐसी आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Nana to Bajirao, explaining the difficulties of recovering money.*

---

१ जि. सातारा. २ जि. बेळ्गाव. ३ बंदुकवाले. ४ प्रां गुजराथ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 74]

[*25-12-1737*

श्री

विनंती सेवक रामाजी माणकेस्वर सां। नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ १३ रमजान भानुवासर तिसरा प्रहर दिवसपर्यंत स्वामींचे कृपावलोकने-करून येथास्थित असे विशेष. येचसमई दरबारी राजश्री स्वामींनी भाषण केले कीं परवा भोमवारीं पुणियास जावयाचे उद्येषें येथून कूच करूं. साळप्याचे घाटें जेजुरीवरून जाऊ असे बोलिले व तयारी निघावयाची करीत आहेत. तर आपले माहालकरी निरेवर पाठवून द्यावे. जेजुरीस साहित्य मुकामाचे सर्व करवावे. भोमवारीं निघावयास मुहुर्ताचा गुता धरीत नाहीं, असेहि बोलिले. तर राजश्री नारो आपाजी यांस आज्ञा करून टाकोटाक निरेवर पिंपरियाजवळ पाठवावे व जेजुरीस साहित्य कर्तव्य तें करवावें. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramaji Mankeshvar Potnis on behalf of the Purandares, informs the Peshwa of Shahu's intention to start for Poona.*

No. 75]

छ २९ जिल्हेज

[*1737 ?*

श्री

पुरवणी राजश्री चिमाजीपंत आपा गोसावी यांसी

विनंती उपरी. राजश्री वाघोजीराऊ खानवेलकर यास आपणाजवळ ठेवावे. कार्याचे माणूस आहेत, त्यास बोलाऊन आणून त्यास च्यार गोष्टी सांगोन आम्हाकडे रवाना करणे, म्हणून लिहिलें. ऐशास बरा नावाचा कर्ता सिपाई माणूस आपणाजवळ असावा याजकरितां आमचाहि हेत होता. परंतु मारनिले राजश्री फत्तेसिंग भोसले याजकडे चाकरीस राहिले आहेत. प्रस्तुत त्याच्यातर्फेनें येथें आहेत व त्याचे भाऊ रामाजीराऊ खानवेलकर राजश्री त्रिंबकराऊ सोमवंशी सरलष्कर याजकडे चाकरीस राहून प्रस्तुत येथें सेवा करीत आहेत. मारनिलेनी कारकून आपणाकडे पाठविला होता त्यावरून आपण लिहिलें असेल. त्यास माणुसास दंडक लागला आहे कीं एक जागा चाकरी करावी आणि दहा जागा शोध करावा ऐसा विचार आहे. कळले पाहिजे. विशेष काय लिहिणें? कृपा केली पाहिजे हे विनंती.

मोर्तब सुद.

¶*Pilaji Jadhav to Chimaji Appa : writes that the addressee cannot obtain the services of Waghoji Rao Khanvilkar.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 76] [*8-1-1738*

छ २१ जिल्हेज

श्रीनिवासप्रसन

श्रीमदउमारमणचरणनलिन आखंडितलक्ष्मीआलंकृत
राजमान्ये राजेश्री आपा स्वामीचे
सेवेसी

पोष्ये कृष्णाजी आनंत सां। नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता। छ २७ रमजान जाणोन स्वामीनीं आपले स्वानंदवैभव लिहिती आज्ञा केली पाहिजे विशेष. आपले पत्र व राजेश्री पंडित प्रधान यांचीं पत्रें छ २४ रजबची पाठविली ते छ ९ माहे रमजानी पावले व दुसरे पत्र छ १९ माहे शाबानचे छ २२ रमजानी पावले. त्यांमधें राजश्रींनी लिहिले होते जे सालगुदस्तांप्रो सालमजकूर सन ११४७ चा यैवज पाठऊन देणे. फिरंगान खर्च व फौज सांगाते होती त्यांचा खर्च मोबलग जाला त्यांकरितां जरूर जाणोन बंधूस लिहिले. समये हाच आहे. यांकरितां आगत्येंरूप पाठवणे म्हणोन लिहिले. तरी येथील विचार पाहता च्यार साला पासोन कहेत[१] पडला. खसूस[२] या साली पावसाची कमी व मुलुकात काहताकरिता रयेत व ढोर मरून गेली. व महर्ग फार. हा आवघा विस्तार राजेश्री वेंकाजी सिवदेऊ पाहून आले आहेत ते सांगतां कळेल. त्यांही वेगळे बारा हजार स्वाराची तलब[३] द्यावी व मुलूख राखावा व नवाब आसफजाहास इजाराचा पैका द्यावा यैसे नानाप्रकारें संकट आसतां इतकियांत हैदराबादेस जाणे म्हणौन दोनी चार हुकूम आले. सालगुदस्तां हजार स्वार व प्यादे पाठविले. सिरावरी त्यांचा खर्च येक वरीस जाले. आता आमचेहि निघणे जाहले. त्यांस हमराह[४] लोकास खर्चास द्यावे लागते. यैसियामधें आपले खर्चाची तगादियाची मनावरी द्रिस्टी न देतां भाऊपणावरी चित ठेऊन या समयात जैसे मिलाले तैसे करून आम्ही साहा बंधूनी लाखा रुपयाची हुंडी राजेश्री कृष्णाजी नाईक याचे दुकानची करऊन आपणापासी त्यानी पाठवणे म्हणोन लिहिले होते, तैसच हुंडी पाठविली आहे. तरी आपण राजेश्री पंडित प्रधान यास लिहून पाठविले पाहिजे. बंधू जैसे मनातून आपणास इछितातीं त्यास मनोमन साक्षी आसे. या मागे

---

१ दुष्काळ. २ खसुस—? ३ पगार. ४ बरोबर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आणिखी पाठऊन देणे म्हणौन साहेबजादे सहूदर आलीखान साहेबास सांगितले आहे ते पाठवितील. बंधू भेदवाद सहसा मानीत नाही. विशेष काये लिहिणे हे विनंती.

¶*The writer Krishnarao may be the son of Anandrao Sumant: he writes about the tribute to be sent to the Peshwa.*

No. 77]

छ ३० मोरम [*5-5-1738 ?*

श्री

चिरंजीव राजश्री नाना यास चिमणाजी बलाल आशीर्वाद उपरी. तुम्हास फौज-सहवर्तमान राजश्री स्वामीकडे रवाना करावे ऐसा विचार करून येथून चिरंजीव राजश्री माहादोबास पाठविले. त्याणी तुम्हांस सविस्तर सांगितलेच असेल. राऊत नेमून पाठवावे तुम्ही स्वार होऊन जावे ऐसा विचार होता. त्यास चव्हाण राजश्री स्वामीस येऊन भेटलियाचा मजकूर चिरंजीव राजश्री दादोबानी लिहिला. तुम्हीच पत्रे पाविलीत. ऐशास हली तुम्ही राजश्री स्वामीसंनिध जावे किंवा न जावे येविसीचा विचार तुमचे विचारे उत्तम विचार कोणता ? महादोबास तो गेलेच पाहिजे. जातील. परंतु प्रस्तुत तुमच्या जाण्याचा विचार करावा न करावा तो पुर्ता चित्तांत आणून जैसे तुम्हास सुचेल तैसे लेहून पाठवणे त्याप्रमाणे कर्तव्य ते केले जाईल. सारांश जावयाचा विचार तुमचे तर्केकरून उत्तमसा जाला तर हल्ली फौजेचे प्रयोजन आहेसे नाहीं. चालीस पंनास राऊत असल्यास उदंड[1] आहेत. तरी लौकर लेहून पाठवणे. सेदानसे[+] जथून देईन म्हटलें तरी * * देतीलसे आहे. परंतु तेथील (मनसबा) * * * ठिकाणी लागत आला. यास्तव विचार काय सुचेल तो लिहून पाठवणें. छ २६ मोहरम हे आशिरवाद.

¶*Chimaji to Nana, asking him to decide whether he should proceed to the camp of Shahu.*

No. 78]

छ १६ रालाखर [*10-7-1738 ?*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामीनी छ २४ रबिलोवलचीं पत्रें पाठविलीं तीं छ ३ रबिलाखरी पावलीं. लिहिलें वर्तमान सविस्तर कलों आलें. तीर्थरूप राजश्री

१ पुरेसे, पुष्कळ.

\+ येथून अक्षर चिमाजीचें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

राऊ स्वामीचीं पत्रें छ ८ रबिलोवलची इछावर प्रांत मालवा येथून आलीं, मजल दरमजल देशास येतात हा आर्थ स्वामीनी राजश्री स्वामीस लेहून पत्र पाठविलें तें नेऊन गुजरानलें. राजश्री स्वामी पत्रश्रवणेकरून बहुत संतोषी जाले. राजश्री पंतप्रधान देशास आले, बहुत उत्तम गोष्टी जाली म्हणून बोलिले. स्वामीस कलावें यास्तव लिहिलें आहे. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Purandare to Chimaji, communicating Shahu's satisfaction about Bajirao's success.*

No. 79] *[14-7-1738 ?*

छ १६ रबिलाखर

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी

अपत्ये मल्हार तुकदेव कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती उपरी. स्वामींच्या अशीर्वादे करून ताा छ ७ रबिलाखर मुाा गौरवाड[1] परियेंत कुषल आसो विशेष. स्वामीनी हुजूरच्या कासिदासमागमे छ २४ सफरीची पत्रे पाठविली. ती छ २८ रबिलोवली प्रविष्ट जाली. राजश्री स्वामीस पत्र कासिदानी प्रविष्ट केले. राजश्री स्वामीनी पत्र आक्षरशाहा वाचून पाहिलें. त्यावरून बहुत समाधान पावलें. विदित जाले पाहिजे. स्वामीनी आसीर्वादपत्र पाठविले त्या प्रांतीचें वर्तमान सविस्तर लिहिले त्यावरून बहुत समाधान झाले. दरबारीचे सविस्तर वर्तमान आलाहिदा पुरवणीपत्रे पाठविली आहेत त्यावरून विदित होईल. राजश्री पंतप्रतिनिधि कोटहोम करावयास माहुलीस गेले आहेत. अनुष्टान समाप्त जालियांवर मागती लस्करामध्ये येतील. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Malhar Purandare communicates to Bajirao Shahu's gratification at the news of Bajirao's doings in the north.*

No. 80] *[29-9-1738 ?*

॥ श्रीवेंकटेशप्रसन ॥

श्रीमंत माहाराज राजेश्री बाबासाहेबाचे सेवेसी

सेवक नारो राम सांा नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम अधिक अश्विन वाा १२ भानुवार जाणौन माहाराजी आपले सामराज्यैवैभव लेखनआज्ञा केली

---

१ ता. चिकोडी.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पाहिजे. येथील वर्तमान दोनीच्यारीदां विज्ञापना केली होती त्यांवरून सविस्तर कळल असल. कुंटाकुळ[1] ताा खेडवाडी तमाम वैरान होती त्यांस कौल देऊन रयेतास आणिले. बैल नाही त्यास बैल, पोटास नाही त्यास पोटास देतो मणौन भरवसा देऊन ठेविले. घरहि बांधीत आहेत. तुंमलवाले नितुर्नी कोटा वगैरे गांव बांधिला आहे. पंधरा दिवस जाहले, तोरण बांधायास येथून चौघ प्यादे व कारकून यांस पाठविले होते. त्यानीं तोरण बांधून दिल्ह नाहीं. श्रीमंतानीं आपणास जाहगीर दिल्ह आहे यैस बोलत आहे. त्यांच लेक तेथं आहे त्यांस ताकीद होये कीं, सरकारच मुल्क बांधिले ते कुटाकुळच अमीलाच हवाला करावे यैस ताकीदपत्र तुमलवालेच नांवी, दुसर गुमिनेड पाळें मवालेच नांवी ताकीदपत्र. सरकारच मुल्क कोंडममला व इंनगल्लूर वगैरे गांव त्या गांवच पाटील त्याच असरेंत राहून त्यांच ठाण आणून ठेविला आहे. बाकी यानी व दुसर कोणी दिल्ह नाही. तें गांव सोडून देणे मणौन ताकीदपत्र दया केले पाहिजे. पंनास बंदूख व बारवाले आहेत. दारूगोळी केवळ नाहीं. किलेच मजकूर येणप्रमाण जाहलिया कैस ? यास काये आज्ञा ? आम्ही पंनास प्यादे ठेऊन ठाई ठाई चौकीबंदी ठेवि (अपूर्ण).

¶*The writer, Naro Ram, (not the Mantri) writes to Bajirao how the writer had settled certain villages. Baba was the nickname used for Bajirao.*

No. 81] [*4-10-1738 ?*

छ १ रजब

श्री

पुरवणी राजश्री **राऊ व ताा आपा**

स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. सौभाग्यादिसंपन्न वज्रचुडेमंडित मातुश्री विरूबाईसाहेब याणी बोलाऊन नेऊन आज्ञा केली कीं तुम्ही माहालचा घर सातारा बांधोन दिल्हे आहे त्यास घर जाया होत चालिले आहे तरी नीट करून देणे. याचप्रमाणे राजश्री स्वामीनी आज्ञा केली. वाडियांतील पत्र स्वामीचे सेवेसी पाठविले आहे; तरी स्वामीनी येविसी काये ते आज्ञा केली पाहिजे. किरकोल खांब मोहटी आडवट कामेरे (?) जाया जाले असतील ती नीट करून द्यावे लागतील याकरिता सेवेसी पत्र पाठविले आहे. उतर येईल त्याप्रमाणे वर्तणूक करून. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*The Peshwa is asked to arrange for repairs to the lodging of Virubai.*

---

१ कर्नाटक प्रांत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 82] [*1738 ?*

श्री

तीर्थरूप राजश्री आपा स्वामी वडिलाचे सेवेसी

अपत्ये नानाने साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ ८ जिल्हेज मुकाम म्हैसाल[1] कृष्णातीर येथे वडिलाचे आसीर्वादे करून सुखरूप असो विशेष. श्रीशंकराच्यार्य स्वामीकडून राजकारण घेऊन पूर्वी तीर्थरू (प) राजश्री राव येथे असता आले होते त्यास मागती ठीक करावयास्तव माघारे पाठविले होते. हली ठीक करून सुबराव व मल्हारपंत आले आहेत हेच सेवेसी पाठविले आहेत. तरी स्वामीनी सविस्तर वृत चितात आणून श्रीशंकराच्यार्य स्वामीचेहि काम होऊन आपला मनसबा ये तें केलें पाहिजे. हे सांप्रत स्वामीच्या प्रत्ययास राजकारण आणून द्यावे, स्वामीपासून भला माणूस घेऊन जावा म्हणून आले आहेत. तरी ते प्रांती माहीत व शाहाणे दौलतराव मुरार आम्हापासी आहेत यास स्वामीनी राजकारण मनास आणून आम्हास पाठवावयाविसी आज्ञा केली पाहिजे. याचे ते प्रांती नावहि आहे व शाहाणेहि आहेत. यास्तव लिहिले असे. बहुत काय लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*The whole letter is in Nana's hand. He asks Chimaji Appa to allow him to send Daulatrao Murar to the Shankaracharya in pursuance of the affair that was pending between Bajirao and the Shankaracharya.*

No. 83] [*1738-39*

छ १६ रालाखर

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आपत्ये मल्हार तुकदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ ९ रविलाखरपर्यंत मु। गौरवाड स्वामीच्या आसीर्वादेकरून यथास्थित असे विशेष. गुमट फते जाला. याउपरी यथून कूच करून अथनीकडे जावे ऐसे राजश्री स्वामीचे मानस आहे. पुढें होईल वर्तमान ते सेवेसी लेहून पाठऊं. दरबारचे वर्तमान सविस्तर आलाहिदा पुरवणीपत्रीं लेहून पाठविले आहे त्यावरून

---

[1] सांगलीजवळ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

विदित होईल. स्वामींनी छ २४ रबिलोवलची पत्रे राजश्री तुबाजीपंतास व राजश्री लक्ष्मणपंत व बाबूराव यांस पाठविली तीं ज्याची त्यांस प्रविष्ट केलीं. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Malhar Tukdeo Purandare informs Bajirao and Chimaji Appa that Gumat has been successfully assaulted and that Shahu will in all probability march upon Athani.*

No. 84] [*7-1-1739 ?*

पौ छ ७ सवाल

श्री

पुाा चिरंजीव राा बाबूराव यासी आसीर्वाद उपरी. तीलशर्करा करून पत्रे लेहून पावत्या करणे.

किले हाय.

१ किले पुरंधर
१ किले वज्रगड
१ किले लोहोगड
१ किले कार रखमाजी कोलवी
१ किले घनगड केसोजी रणगंभीर
१ किले तला बजाजी कारके
१ किले घोसाला सूर्याजी भोसले
१ किले कुर्डु अमृतराव पासलकर
१ किले मानगड दादजी माणकर
१ किले बिरवाडी पिलाजी बलकवडे
१ किले सुरगड मोहाजी मराठे
१ किले अवचितगड
३ किले श्रीवर्धन व मनरंजन व सुभानजीराऊ येरूणकर राजमाची
१ नारायण गड
६ काा किले जिल्हा राजश्री सचीव
१ सिहिगड भगवंतराऊ सोमवंसी
१ राजगड

किता

१ श्री देव जेजुरी
१ श्री देव मोरेश्वर
१ श्री देवी कुरकुंब
१ श्री देव थेऊर
१ श्री देव चिंचवड
१ राजश्री सिवराम बावा चित्राव
१ बापूभट दाते
१ विस्वनाथ जोशी रायेरीकर
१ खंडभट शालग्राम
१ बालाजी माहादेव
१ सदासिव भट दीक्षित
१ सिऊबाई मामी
१ माधवराऊ विस्वनाथ
१ बालाजी दादाजी
१ गोविंद कृष्ण
१ गोपाल भास्कर ठाणे चाकण
१ संभाजी जाधव
१ बापूजी श्रीपत
१ त्रिंबक हरि सुभेदार सुपे
१ गोपाल शंकर पाटस
१ सिवराम कृष्ण

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१ रोहिडा
१ तोरणा
१ केळंजा
१ भोरप त्रिंबकजी इंगळे

६

२२

सावकार

१ बापूभट मोघे
१ बाजी नाईक कांबरस
१ रघावा नाईक
१ बावाजी नाईक कडु
१ रामजी घम
१ पांडुरंग नाईक दसपुत्रे
१ रामाजी नाईक भिडे
१ भगवंत ना। कानडे
१ गोविंद ना। अनगल
१ मोराबा ना। तांबवेकर
१ दादाभाई
१ शेशाद्रि शास्त्री
१ कोंड जोसी
१ गोविंदभट बरवे

१ सतसेट मधवे
१ रामभाऊ व लक्ष्मण व हणवंत-
राऊ पाठणकर हिरोजी राऊ
याचे घरी
साबाजी नाईक निंबालकर
जानोजी नाईक निंबालकर

माहादाजी घाटगे बुधकर
१ कृष्णाजी माहादेव दि। खंडोजी
माणकर मु तळा
१ बालाजी अनंत
१ नाबादी बाई
१ रामाजी मलार
१ महिपतराऊ अवजी चिटनीस
१ हरीराम पोतेनीस
१ पुणेकर देशमुख व देशपांडे
१ केसो सभदेव
२ पार्वतीबाई व उमाबाई दाभाडी
१ बाजी येसवंत दि। मलारजी
होलकर
१ विसाजी गणेश दि। येसवंत
राऊ पवार
१ त्रिंबकराऊ ढमढेरे
१ लखजी घायेभर
१ तान्हाजी धायेभर
१ बाजीराऊ दामोदर
२ भुलोजी नाडोजी ढमढेरे
१ हरभट पटवर्धन
१ बालभट पटवर्धन
१ हरभट मनोहर याचे पुत्र मु।
का। खेड
१ वेणुबाई यासी बाजी भिवराऊ
याचे घरी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येणेप्रमाणे तुम्ही तेथे पत्रे लेहून त्याजवर सिके करणे. त्याजवर सिके करून व जे असीर्वाद विनंती कागद असतील त्याजवर चिरंजीव राजश्री सदोबा याजपासून विनंत्या व आसीर्वाद करऊन पत्रे व तिलगुलाच्या थैल्या सिऊन तील साखर भरून जेथील तेथे रवाना करणे. संकराजी केशव व खंडोजी माणकर, वासुदेव जोशी व रघुनाथजी व रामचंद्र हरि व बरवाजी ताकपीर व कल्याणप्रांतीचे किले वगैरे कल्याण व फिरंगाण प्रांती तिलगूल व पत्रे रवाना करणे ते येथून केली जातील. तुम्ही तिकडे पत्रे न पाठवणे. मानाजी अंगरे याजकडेहि पत्रे येथूनच रवाना केली जातील. आणीक कितेक पत्रे येथून रवाना केली आहेत त्यास तुम्ही तेथे थैल्या भरून ही पत्रे व थैल्या रवाना करणे हे आसीर्वाद.

¶*This is a list of prominent persons to whom the customary sugar and sesamum seeds were sent by the Peshwa. From the last lines, the list seems to have been prepared about the end of Bajirao's reign.*

No. 85] [*7-4-1739 ?*

पौ छ ९ सफर

श्रीशंकर

राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

ℒ श्रीमंत सकलगुणालंकर्ण अखंडितलक्षेमीआलंकृत राजमान्य स्नेहपूर्वक राधाबाई थोरात कृतानेक दंडवत विनंती. येथील कुशल ताा चैत्र शुध १० स्वामीचे कृपादृष्टीनें मुकाम भागानगर येथास्थित असे विशेष. आपले वर्तमान राजश्री जाधवराव यांही नवाब नासरजंग याजकडून आपले खासियाची जागीर चिरंजीव राजश्री राणसिंग थोरात यांचे नावें सनदापत्रा करून दिल्हा हें वर्तमान स्वामीस पूर्वीच श्रुत केले. स्वामी कृपावंत होऊन आमचे विशींई राजश्री नारोपंत कमाविशदार प्राा पारनेर यासी जामगाऊ तर्फेचे आज्ञापत्र दिल्हे कीं याजकडे तरफ माारचा अमल सुरळित देवणे. त्यासी बाकी साकी गावगणा अगोधरच वसूल नेला म्हणतात. जामगावी ठाणे मात्र बसले आहे. तेथील साहित्य करणार साहेब आहेत. चिरंजीव राजश्री मानसिंगराऊ थोरात साहेबाचे पदरी आहेत. पूर्वीपासून सांभाळ करीत आहेत. सांप्रत तो पायांपासी आहेत. त्यांचा अभिमान साहेबी धरिलाच आहे. त्याचे सर्व प्रकारें ऊर्जित केले पाहिजे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपले खासे कैलासवासी जाले त्या तागाईत आपण तेव्हईखाले आहोत. त्यामागें वडील मायबाप स्वामी आहेत. आपली शरम लज्या साहेबांस आहे. विशेष ल्याहावें तर सूज्ञ असां. बहुत काय लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Radhabai Thorat to Chimaji Appa, requesting him to take her son under his protection.*

[पाो *9-4-1739 ?*

No. 86]

छ ११ मोहरम

श्री

विनंती उपरी. प्राा येदलाबाद वगैरे पाच माहाल चिरंजीव राजश्री नानाच्या पथकाकडे आहेत. त्याचा इजारा गुदस्ता साडे बात्रीसा हजारास आहे. साल मजकुरी साडे सातसे रुपये जाजती केले आणि रामाजी केशव याजकडे गुदस्ता आहे त्याकडेच मामला दिल्हा असे. दीक्षित पैकियास खावंद घेतले असेत. खुलदाबादहि चिरंजीवाकडेच आहे. त्याचाही मख्ता गुदस्ताप्रमाणें दिल्हा असे. वाळीज परगणा येते समई आम्ही तेथील बंदोबस्त करून तेथे इजारा होता तो मोडून सालमजकुरी कामाविसदार ठेविला असे. तोहि माहाल नानाकडेच आहे. अंदुर सुलतानपूरहि कमाविसीनेंच सांगतो. कलावे म्हणून लिहिले असे हे विनंती+.

¶*Chimaji writes about the division of Edlabad provinces assigned to Nana's troops.*

[पाो *9-4-1739*

No. 87]

पाो छ ११ सफर

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नाना यांसी चिमणाजी बलाळ अशीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहित जाणे विशेष. राजश्री वासुदेव जोशी याचे पत्र राा गंगाधर जोशी यांस लेहून लाखोटा पाठविला आहे. हा माारनिलेस देऊन रुपये ३०००० तीस हजार घेऊन लौकर पाठऊन देणे. येथे पैकिया करितां वोढ[1] फार जाली आहे यास्तव लौकर ऐवज पाठवावे. शहरचा ऐवज

---

१ संकट, आपत्ति.

+ सबंध पत्र चिमाजी आपाच्या हातचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आला असेल तोहि पाठऊन देणें. या खेरीज पाा बेटावद येथील राजश्री जानोजी ढमढेरे यांजकडील ऐवज पैकी हुंडी वेदमूर्ति राजश्री सदासिवभट पटवर्धन याजवर हुंडी रुाो २२३१॥ दोन हजार द्रोनसे * *

(यापुढील अर्धे पान फाटून गहाळ आहे.)

¶*Chimaji Appa asks Nana for money.*

No. 88] *[18-5-1739 ?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य बापूजी श्रीपत कृतानेक नमस्कार विनंती. येथील वर्तमान वैशाख बहुल सप्तमी भृगुवासरपर्यंत स्वामीचे कृपेंकरून येथास्थित असे विशेष. स्वामींनी पत्र पाठविले ते आजी दो प्रहरा पावले. तेथे आज्ञा जे मातुश्री सिऊबाईचे पत्र आले कीं पालीवरी मऱ्हाठे लोक होते त्याणी तेथील किलेदार जिवे मारिला आणि लोकांनीं निरोप सांगोन पाठविला कीं किला तुम्हास देतों, तरी लोक पाठऊन देणे. त्यावरून सखोजी सिंदे लोकानसी रवाना केले आणिखी फौज व पांवलोक[1] रवाना करावे लागतात. याकरितां पुरंधर, वज्रगड व दरेकराचे लोक आहेत त्यापैकीं दोनसे माणूस एक सरदाराबराबर देऊन पाठवणे म्हणून आज्ञा. ऐसियास कांहीं लोक मुलकात तहसिलेस गेले आहेत. राजश्री स्वामींनीं पागेच्या कामास सातारियास लोक नेले त्यास बहुत दिवस जाले म्हणून मोबदला पाठविले तेहि तैंसेच तेथे ठेविले आहेत. राहिले लोक त्यामध्यें स्वारीच्या कार्याचे लोक होते त्यास सांगितले आहे. अजी आपली तयारी करितील आणि उदैक एक सरदार व लोक प्रात:काळींच स्वार होऊन सेवेसी येतील. आम्हीहि उद्याचा दिवस शनवारी गुता आहे तो वारून रविवारी सेवेसी येऊन. विदित जाले पाहिजे. कृपाभिवृधि केली पाहिजे हे विनंती.

¶*Bapuji Shripat Chitrav, a Kanva Brahman serving originally the Pant Sachiv as Killedar of Purandar, writes to Chimaji offering to go to Pali to capture that place. This Bapuji was at this time in charge of the Poona district on behalf of the Peshwa.*

---

१ पायदळ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 89] [9-7-1739 ?

श्री

तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

अपत्यें अंताजी नारायण कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता। छ १३ रबिलाखर पावेतो स्वामीचें कृपेकडून वर्तमान येथास्थित असें विशेष. स्वामींनी छ ६ रबिलाखरचें पत्रें पाठविली ती छ ११ राखरी पावली. तेथे आज्ञा कीं पा। जैनाबाद वगैरे नि। यादो त्रिंबक यास ब्याणव हजार रुपयास तीर्थरूप राजश्री राऊस्वामींनी मामला विल्हे लावला, व पा। रावेर येथील सरदेशमुखीचा मामला पंधरा हजार येकशास मा।रनिलेकडें तीर्थरूपानी विल्हेस लावला, त्याची रसद पुण्यास येऊन निशा करून घ्यावयाचा करार केला आहे. तरी तुम्ही राजश्री बाबूजी नाईक वोंकार यास वाघोलीस पत्र पाठऊन बोलाऊन आणून सदरहू मामल्याचा मजकूर त्यास सांगोन रसदेचा यैवज मागोन घेणे आणि चिरंजीव राजश्री नानाकडे रवाना करणें व राजश्री पिलाजी जाधवराव याजकडे सालमजकूरची रसद रुपये ७००० सात हजार येणे अहेत त्याविसी मा।रनिलेस पत्र पाठविले आहे, हे त्याजकडे पाठऊन यैवज आणऊन चिरंजीव राजश्री नाना याजकडे रवाना करणें म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रमाणे राजश्री बाबूजी ना। ओंकार पत्र वाघोलीस पाठविलें त्यास ते वाघोलीस नाहींत. त्याजकडील केसो हरि ओंकार दि। ना। मा।रनिले याणी पत्र आम्हास लिहिले ते शेवेसी पाठविलें आहे. त्यावरून विदित होईल. केसो हरि याणी बाबूजी ना। ओंकार यास पत्र लिहोन पाठविलें आहे त्याचें प्रत्योंतर मा।रनिलेंस आले म्हणजे आम्हास लिहोन पाठवितील. त्याचा अर्थ सविस्तर शेवेसी लेहून पाठऊ. जाधवरायाचें पत्र त्याजकडे रवाना केले, त्याचे उतर त्याणी स्वामीस लिहोन पाठविलें आहे त्यावरून विदित होईल. साता हजारापैकीं साडेतीन हजार तूर्त देऊ केले आहेत ते आलियावर श्रीमंत राजश्री नाना स्वामीकडें रवाना करितो, बाकी साडेतीन हजार राहिले ते श्रावणमासी प्रविष्ट करितो म्हणून मा।रनिलेनी (लिहिलें) आहे त्यावरून अवगत होईल. मुडकीचे बागातील पाने सुमार ३००० तीन हजार शाहाभाई व बाबूखान दि। खंडोजी कनपुरा याजबराबर शेवसी पाठविली आहेंत. सेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

¶*Antaji Narayan Fadnis, father of Sadashivrao's first wife Umabai and first cousin of Janardanbaba Fadnis, writes to Chimaji Appa about the collection of dues from the districts of Raver and Jainabad.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 90] [*14-7-1739 ?*

छ २० राखर

श्री

आपल्ये चिमाजीने कृतानेक सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ १८ रबिलाखर यथास्थित असे विशेष. राजश्री कृष्णराऊ तेथे आले आहेत त्याची बोली विल्हे लावणे तैसी स्वामी लावितीलच. त्यास गुदस्ता स्वारीस जातेसमई सदासिवभट पटवर्धन याचे रुपये वीस हजार व रा। कृष्णरायाचे पंधरा हजार येकूण पसतीस हजार कर्ज घेतले आहेत. त्यास कृष्णरायाचे पंधरा हजार आहेत ते जेव्हा स्वामीस अनुकूल पडेल तेव्हा वारितील. सदासिवभटाचे वीस हजार आहेत त्याचे व्याज अडिचोत्राप्रमाणे आहे त्यास सदासिवभटाचे देणेहि फार जाले आहे. याकरिता रा। कृष्णरायाची बोलीचाली होईल त्यात भलती घालमेल करून सदासिवभटाचे रुपये वीस हजार वारले पाहिजेत. सदासिवभटाने त्याचे देणे आहेत. स्वामीच्या विचारे आले तर केले पाहिजे. येवढे वीस हजार सदासिवभटाचे वारले म्हणजे राहिला यैवज सदासिवभटाचा तो सावकास जेव्हा अनकूल पडेल तेव्हा दिल्हा तरी घेतील. स्वामीनी विचारे करून कृष्णरायास सांगितल्याने हें कार्य व्हावयाचे आहे. त्याजवर रागे भरावे यैसे नाही. समाधाने मायेनेच कार्य करावे. सुचला अर्थ लिहिला आहे. यात स्वामी वडील आहेत. फिरंगाणच्या तहाची चालणा करून पाहातो हे विनंती.

¶*Chimaji to Bajirao regarding payment of debt due to Krishnarao Chaskar and Sadashiv Bhat Patwardhan. The whole is in Chimaji's hand.*

No. 91] [*1739 ?*

श्री

सहश्राय चिरंजीव राजश्री नाना यास प्रती सिऊबाई कृतानेक आशीर्वाद. येथील वर्तमान ता। माघ वद्य त्रयोदशी पावेतो सुखरूप असो. यानंतर बहुत दिवस तुम्हाकडून कागदपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तर सविस्तर वर्तमान लिहून निरंतर पाठवीत जाणे विशेष. राजश्री प्रधानपंताकडील कागदपत्र काही आले असतील तर सविस्तर वर्तमान लिहून पाठवणे. ये प्रांती कितेका दिवसी येतील ते लिहिणे. किलीजखानाचा निरोप जाला किंवा नाहीं ते सविस्तर वर्तमान लिहून पाठवणे; व राजश्री वासदेव जोशी यास राजश्री प्रधानपंती लिहून पत्र पाठविले की रसदेचे रुो देणे ते पत्र तुम्ही परभारे रवाना केले म्हणून आम्हास लिहून पाठविले आणि तुम्ही लिहिले कीं आम्ही पत्रे पाठविली आहेत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तरी तुम्ही माणस शाहणे पाठऊन कल्याणाहूनय (फाटलें * * *) त्यावरूंन आम्ही कल्याणास व (फाटलें * * *) आम्हास पत्र पाठविलें ते व आम्ही आपले पत्र पाठविले. त्याणी उत्तर पाठविलें की राजश्री प्रधानपंताचे पत्र आम्हास राजश्री नानानी पाठविलें नाहीं. आम्हास ठावके नाहीं. याप्रकारचे त्याणी लिहून पाठविले, त्यास तुम्ही आम्हास लिहून पाठवाल तर आमच्या समाधानास्तव पत्र आम्हास पाठविले की काय ? किंवा पत्र आले परंतु पाठवावयास विस्मरण जालें हे न कळे. विस्मरण जाले असेल तर त्याचा सोध करून तें पत्र आम्हाकडे पाठवणे. आम्ही येथून पाठऊन. रुा (फाटलें) तरी वेऊत किंवा मुळीहूनच कृत्रिमच असेल की आमचे रुा बुडवावे तर आम्ही वासुदेव जोशी यास बोल कशाश लावावे ? जे त्याचे चितास आले ते उत्तमच म्हणावें आणि आसावें यांतच बरे आहे. पत्राचे उत्तर पाठवावयासी आज्ञा करणे हे आशीर्वाद.

¶*Shiubai Joshi to Nana asking him to help in recovering her debts from Vasudev Joshi.*

No. 92] [*1739 ?*

पेाा छ २८ जााखर

श्री

सहश्राय चिरंजीव राजमान्य राजश्री कृष्णराऊ याप्राति सिऊबाई कृतानेक आशीर्वाद. येथील वर्तमान ताा मार्गसीर वद्य येकादसीपावेतो सुखरूप असो. यानंतर राजश्री पंतप्रधान यांस पत्र पाठविले आहे त्यावरून सविस्तर वर्तमान कळेल. वरकड तुमच्याच गावाचे रुो तो दोन तकसिमा वसूल राजश्री वासदेव जोसी याणी घेतला ते सविस्तर वर्तमान सविस्तर चिरंजीव राजश्री माहादाजी नारायण लिइले असेल त्यावरून कळेलेच असेल. वरकडे रसदेचे रुो वासदेव जोसी देत नाहीत. याकरिता राजश्री प्रधानपंताचे भेटीस येणे लागते तर येक घोडा बसावयायोग्य पाठऊन देणे. घोडा पत्रदरशनी पाठवणे. पाठवावयास अनमान कराल तर मी पाईच येईन. कळले पाहिजे हे आशीर्वाद.

¶*Shiubai Joshi writes to her son Krishnarao to send her a horse to enable her to go and meet the Peshwa.*

1600

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 93]

※
श्री

राजश्री माहादजीपंत गोसावी यांसी

ℒ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष. सांप्रत

श्रीपांडुरंगचरणीं
दृढभाव चांगोजीसुत
पिलाजी जाधव.

आपणाकडून पत्र येऊन त्या प्रांतीचे वर्तमान कलत नाही. तरी राजश्री भाऊ स्वारीस गेले आहेत तिकडील अर्थ व दरबारचा अर्थ सविस्तर लिहिला पाहिजे. आम्ही श्रीमंतांचे व आपले आज्ञेप्रमाणे वसई प्रांतीच आहो. वरकड सविस्तर या प्रांतीचे अर्थ श्रीमंताचे पत्री लिा आहेत. आपणास विदित होईल. गोव्याकडील वर्तमान येत असेल ते लेहून पाठवावे. श्रीमतांस बागाचे जमिनीचा अर्थ लिा आहे. आपण विनंती करून जमिनीची सनद देविली पाहिजे. . विस्तारे ल्याहावे यैसे नाही. श्रीमंताची मरजी जमीन द्यावयाची नसेल तरी मालियाची महिनियाची व अडसरीची बेगमी यादी प्रा. करावयाची सनद राजश्री शंकराजीपंत यास पाठविली पाहिजे रा छ ६ सफर बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao requests Mahadajipant (Purandare) to try to secure for him some sanads of land. He asks from Bassein for more information regarding Bhau and the Durbar.*

No. 94] [*1739 ?*

छ २९ राोवल.

श्री

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री आपा यासी प्रति बाजीराऊ बलाल आशीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ २२ रबिलोवल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. तुम्ही ऐवज पाठविला.

※ हें पुढील कारकीर्दीतलें पत्र येथें अगाऊ छापलें गेलें आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बा। नारायेणगड याजबा। रुो ८००० आठ हजार पाठविले. त्यापैकी नापैवस्ता थैलियावरी सिके असोन आले रुो ६ बाकी रुो ७९९४

सहरहु रुो येथे जमा जाले छ १७ रबिलोवल पिसव्या रुमाल.

सेव्याजी खासबारदार याजबा। रुो १०००० पाठविले ते येथे पत्रा प्रमाणे पावले रुपये १००००

सदरहु येथे जमा छ २० रबिलोवल.

सदरहुच्या पिसव्या व रुमाल.

दाल

तुरी कैली	दाल मुग कैली
८८८२	८८८२

यकूण च्यार पाईली दाल समत पिसव्या.

येणेप्रमाणे थैल्या व व दालीच्या पिसव्या व रुोचे रुमाल व थैल्या बा। हरी तुकदेऊ जासूद याजबा। पाठविल्या आहेत. कळले पाहिजे लोभ असो दीजे हा आशीर्वाद.

¶*Bajirao acknowledges receipt of money to his brother Chimaji*

No. 95] [*1739?*

श्री

श्रीमंत राजेश्री राऊ व तथा राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

सेवक मुरार केशव सां नमस्कार विज्ञाप्ति ऐसीजे. गतवर्षी राजश्री फत्तेसिंग भोसले यांजकडून धंदा केला. फौज घेऊन राजश्री दावलजीचा लेक व आपण समागमे दाहा हजार स्वार फौज जथोन मुलुकगिरीस गेलो. मुलकांत जाऊन स्वारी करावी तों राजश्री छत्रपति स्वामी व राजश्री बावासाहेबाची आज्ञा जाली कीं राजश्री आपाचे कुमकेस जाणे. त्यास त्या प्रांते मेहेकर पावेतो आलो. तों वर्तमान आले कीं सलुख जाला * त्यावरून माघारे फिरलो. तो राजश्री बाबासाहेबाची स्वारी भालकीकडे वगैरे त्या प्रांती आली. त्याजकडे जावयाची तजवीज केली. तों राजश्री बावासाहेब स्वार (होऊन) राजश्री छत्रपति स्वामीच्या दर्शनास आतनीस आले. मग आपण रामगीर प्रांते च्यार रोज फिरोन घासदाणे घेऊन फौज वारून फौजेसहवर्तमान सुरक्षित आलों. मोगलाही चहू

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कडून आवाई[1] केली होती. परंतु (* *) स्वामीचे प्रतापेकरून नग राखोन आलो. सालमजकुरी राजश्री बाबासाहेबापासी येऊन धंदा कबूल केला. देवगड व चांदे वगैरे संस्थाने व वराडचे माहाल व भूम व परंडे वगैरे बालेघाटचे महाल आहेत. याजवरी एकलक्ष रुपये करार करून मामला केला. त्यास हा धंदा घेऊन स्वामीचे पदरीं पडावें, सेवा करून उर्जित करून घ्यावे, येविषीं राजश्री दादांही स्वामीजीस विनंतीपत्र लिहिले. अस्वासन पत्रउतर आलिया दर्शनास येऊन स्वामी आज्ञा करतील त्याप्रमाणें वर्तणूक करून. आपला अभिमान धरिला पाहिजे. सेवेसी राजश्री खंडोपंत व गोपाळराऊ पाठविले असेती. विशेष काय लिहिणे हे विनंती.

¶*Murar Keshao to the Peshwa, recounting his past services and requesting further encouragements. This is an example how Marathas who possessed the necessary pluck came to prominence in those days. Shahu was near Miraj and Athani in 1739.*

No. 96] *[6-1-1740 ?*

छ १७ सवाल

श्रीजयति

तीन प्रहर दिवस

मुा पुणे

तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी. अपत्ये नानाने साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील * * छ १९ * * येथास्थित असे. विनंती राजश्री आऊजी लवकर येथे आलियावरी विनंतीपत्र लेहून पाठविलें. त्याजवरी राजश्री स्वामीस विनंती केली (त्यावरून स्वदस्तुरचे) पत्र स्वामीस लिहिले आहे त्याप्रमाणे जो विचार करावण तो केला पाहिजे. पूर्वपत्रावरून अगर या पत्रावरून राजदर्शनास यावयाचा विचार स्वामीनी केला असिला तरी येत-समई पांचसें स्वार समागमें घेऊन भेटीस आले पाहिजे. स्वारांचे प्रयोजन आहेसे नाही. परंतु येकटे येऊन भेटल्याने रहस्य नाही. भेटीसमई असावे म्हणून स्वार समागमें घेऊन यावे. भेटी होताच आज्ञा स्वारांस द्यावी. जातील. विदित जाले पाहिजे. हती तेथे ठेवावे. तीर्थरूप राजश्री राऊ आलियावरी नजर करितील. आपण समागमें आणिलें न पाहिजे बहुत+ काये लिहिण ? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Nana to Chimaji : advising him to bring some troops with him when he comes to visit the king.*

---

१. हुल्लड. + पुढील मजकुर लेखकाचा.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 97] [26-2-1740 ?

छ ११ जिल्हेज

श्री

आशीर्वाद उपर. पूर्वी महादोबानींहि हरएक प्रकारें विल्हे लावावे यैसेच लिहिले होते. विचार पाहतांहि तोच विचार उत्तम आहे. कुमकेस परकी आणावे, त्यानी नानाप्रकारे फंद करीत बसावे, आपण काजियांत पडावे, त्यास वाटा द्यावा यैसे प्राप्त होईल. यास्तव आपण बिवाड केला आपणाच सलूख आपले हाते केला म्हणजे दुसऱ्याचा उपकार नाहीं, हाच विचार उत्तम. दुसरे महाराजाची मर्जीहि खेकटे वाढवावे यैसे नाहीं. यास्तव लक्ष प्रकारे आले तर करून टाकून मोकले होऊ. छ ९ जिलहेज मंगलवार प्रहर दिवस प्रातःकाल हे आशीर्वाद.

राजश्री स्वामीस कार्याकारण वर्तमान सांगणे तैसे महादोबा सांगतील. तुम्ही महादोबास लिहिणे अगर हीच पत्रे त्याकडे पाठविणे हे आशीर्वाद.

¶*Chimaji Appa, in his own hand, writes this to Nana. It refers to some affair in which a foreigner (the Nizam ?) was to be called for help. What can the affair be ?*

No. 98] नक्कल

छ २४ रालोवल

श्री

श्रीमंत क्षत्रिये कुलावंतस माहाराज
राजश्री छत्रपती स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक चिमणाजी बलाल कृतानेक विज्ञापना सेवकाचे वर्तमान ता छ २१ माहे रबिलोवल मुकाम कसबे पुणें माहाराजाचे कृपावलोकने करून यथास्थित असे विनंती. माहाराजाचे आज्ञापत्र रामचंद मिर्धे याजबराबरी सादर जाहाले, ते मस्तकी वंदून सनाथ जाहालो. पत्री आज्ञा जे राजश्री फतेसिंगबावा हुजूर आले आहेत. मनसुबे प्राप्त जाहाले. त्याचा सिधांत कर्तव्य तो व राजश्री दादोराऊ भिमसेन व सेखजीहि आले आहेत याचा विचार करणें तो तुमचे विचारे करावा लागतो. यास्तव पत्रदर्शनी स्वार होऊन येणें. सलाही पाठविला आहे तरी अविलंबे येणें म्हणून आज्ञा. त्यास माहाराजाचे आज्ञेविरहित सेवकास अधिकोतर काये आहे ? स्वारीतून आलियावरी माहाराजाचे पाये पाहावे हाच निजध्यास आहे. तेंथे माहाराजाचे आज्ञेची अथवा पत्राची वाट पाहावी ऐसा अर्थ नांही. तथापि माहाराजाचे पत्र शफथ घालून आलें व सलाहि पाठविला

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

असतां सेवकानी उज़ूर करावा ऐसे कार्य होतें ? परंतु कार्य करावे ? वेथेने बहुत श्रमी केले. शरीरात ताकद घराबाहेर जावयाची राहू दिल्ही नाहीं. हे अवस्था रामचंद मधें याणी अवघी द्रष्टीने पाहिली आहे. हे सेवेसी निवेदन करितील. माहाराजाचा सला व पत्र आले हे कोटी हुकूम सेवकास आहेत. तूर्त न यावयास कांही आड अथवा बाहानाही नाहीं. शरीर केवल अशक्त पडले आहे. घराबाहेर निघून पालकीत बसून यावयाची ताकत नाही. वैद्य आणून उपायें चालता केला आहे व सला माहाराजाचा ठेऊन घेतला आहे. शरीरी सावकाश वाटताच माहाराजाचे दुसरे आज्ञेचा उजूर न करितां सेवेसी येतों. सातारियांस वैद्य प्रमाणिक कर्नाटकी आहेत येथेहि उपाये वेथेस होईल म्हणून आज्ञा. त्यास हे शरीर माहाराजाच्या अन्नाचे वाढलें. माहाराज मायबाप आहेत. सेवकाची चिंता माहाराजाखेरीज़ दुसरा कोण करणार ? त्याहीमध्यें प्रस्तुत येथं उपायें चालता केला आहे. माहाराजाचे कृपेकरूनच आरोग्य होईल.

¶*Chimaji reports his inability to wait upon Shahu at Satara owing to extreme ill-health.*

No. 99] [*1740 ?*

पौ छ १९ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंती. कृष्णाजी प्रभू कारखानीस किले सातारा यास तेलातुपाकरणे टांकी बांधावयास सांगितली आहेत त्याची हैगै होऊन अद्यापि तयार जाली नाहीत; म्हणून राजश्री स्वामी इतराज होऊन पाणिप्रवाह मुखावरी होऊन आबरू घेतली ऐसा प्रसंग येथील आहे. अलीकडे बेमुर्वत प्रसंग बहुतच धरिला आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Letter addressed to Chimaji Appa, communicating Shahu's censure for failing to construct storage tanks for oil and ghee at Satara.*

---

१ तक्रार, आक्षेप. १ हस्तप्रयोग.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 100] [*1740 ?*

छ ११ मोहरम

श्री

विनंती उपरी. राजश्रीची आज्ञा जे सातारा शंभर राऊत घेऊन यावे. त्यास आपल्यास तो जावयास तूर्त अनकूल पडत नाही. परंतु शंभर राऊत जमा करून कोणाबरोबर देऊन पाठवावे की काये ते आज्ञा करावी त्याप्रमाणे वर्तणूक करू. रा पिलाजी जाधवरायास व आम्हास समागमे बोलाविले आहे. आम्हास तो तूर्त जाणे नाहीं. सुभेदारास तूर्त जा म्हणावे तर तेहि तूर्त अनमान करितील. राऊत पाठवावे की कायें ते आज्ञा केली पाहिजे. हे विनंती.

श्री

विनंती उपरी. खानदेसचा अमल सरदेसमुखीचा अगदी बुडाला. आमच्या अमलदाराची इजत काडीबरोबर खानदेसात राहिली नाही. याकरिता साल-मजकुरी इजारा मोडून रा आवजी कवडे याच्या स्वाधीन कमाविस केली असे. त्यास रवाना करितो. ईश्वरइछेने कमाविसीने काही रुपया उणा होईल येसे नाही. येक गांडापूरचे वर्तमान पहिले इजारा देत होतो तेव्हा पाच हजार रुपये सरदेसमुखीचे येत होते. आलीकडे राणोजी भोसले याचा हवाला कमाविस तीन वरसे आहे. त्यामुळे आठ हजार येत आहेत. काल स्वारीस जातेसमई आम्ही बरेवजेनें ताकीद करून काईल केले. त्यामुळे बारा हजार रुपये हातास आले. यैसा सर्वत्र अमल बुडाला आहे हे विनंती+.

¶*Chimaji's letters informing king Shahu why he could not attend personally and how the Khandesh territory did not yield any revenue.*

No. 101]

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक केसो विस्वनाथ सास्टांग नमस्कार विनंती. ता फलगुन सुध प्रतिपदा पावतो स्वामीचे कृपाद्रिस्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन पुणियाचे मुकामीहून आलो. राजश्री आवजी कवडे यासी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे पत्र साताराहून का नेर[1]गालणां

+ दोन्हीं पत्रे चिमणाजीच्या हातचीं. १ जि. खानदेश.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मोकासा गाव राजश्री नारबावा याचा, त्याविसी पाठविले होते. ते त्यासी आम्हा-अगोधर सुलतानपूर परगणियात पावले व आमच्या मुलाने त्यासी पत्र लिहिले होते त्याचे प्रतिउतर आमचे मुलांस वरचेवर लिहिले की आम्ही धुळे प्रांते आलि-यावरी वडेलचे तुमचे काजकाम असेल ते मनास आणू. त्याउपरी आपण स्वामीचे पत्र आवजी कवडे यासी आणिले ते पाा नेर पावेतो घेऊन गेलो. त्यासी आवजी कवडे कार्नसूल[१] आहे त्याचप्रतीच महिनांभर होते. त्यासीं राजश्री रंभाजी निंबालकर सांप्रत तापीतीरांस गेलियानंतर आवजी कवडे खरगुण प्रांते गेले आहेत. साताराचे मुकामी राजश्री पंतप्रधान असतां आवजी कवडे याणी वडेलचे मुकामीहून पत्रे स्वामीस पाठविली होती, तीच पत्रे व आपण पत्र यैसे राजश्री प्रधानपंतांपासी पाठविली. ते प्रसंगी आपण होतो. त्यासीं प्रधानपंती मजला बोलाऊन आज्ञा केली की राजश्री नारबावास हे वर्तमान निवेदन करून आवजी कवडे याणी वडेलासी कजिया केला आहे. त्यासीं नारबाबावास विशाद न ये ते गोस्ट करणे. त्यावरून मजला कळले तैसे बावास विनंती केलियावर वडेल आणि मजला राजेश्री प्रधानपंताचे हाती दिल्हे ते साताराहून येऊन पुणियाचे मुकामी सेवेसी निवेदन केले होते. सांप्रत वडेलचे वर्तमान * * कवडे * याची बाकी च्यारसे शाहातर रुाा होती त्याचे खतपत्र तिहोत्रियाचे व्याजे धोंडो मोरेस्वर यासी दोन महिनियाचे वाइदियाने देऊन राजी राखिले होते. आणि आवजी कवडे याणीं थेकायेकी वडेलावरी जाऊन जो अनर्थ केला तो मजला लिहिता पुरवत नाही. त्यासी वडेलात गोसावी होते त्याजपासून व पाटिलापासून जो टका पैका घेतला आहे व त्याचा पुतन्यां तुळाजी कवडे गावात सिरोन वस्तभाव नगनगोटे घेतले आहे त्याची याददास्त आहे ते सेवेसी पाठवीत होतो परंतु पाठविली नाहीं. पुढे आपण दर्शनास जेस्ट मासी येऊन ते समई घेऊन येऊ. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*Keso Vishvanath reports to Chimaji Appa the plundering activities of Awaji Kavade in Vadel.*

No. 102]

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व ताा राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

आपत्ये मल्हार तुकदेव कृतानेक साां नमस्कार विनंती उपरी. स्वामीच्या आसीर्वादिकरून ताा छ ११ रबिलोवेलपार्येत कुषल आसो विशेष. स्वामींनी

---

१ जि. खानदेश.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

प्रांत खानदेस येथील सरदेशमुखीची चिटनविसी मजकडे दिल्ही आहे. त्याची मोईन पांचसे केली. परंतु स्वामीनी नेमणूककरिता सन आर्बामध्ये अडीचसे रुपये केले. त्यास स्वामीनी राजश्री आवजी कवडे याजकडून दुसाला सन खमसामध्ये रु ५०० पाचसे देविले ते त्यानी पावते केले नाहीत. याकरिता स्वामीस पत्र पाठविले आहे. राजश्री आवजी कवडेहि स्वामीचे भेटीस आले आहेत. तरी पांचसे रुपये घेऊन सासवडी चिरंजीव धोंडोबापासी पाठविले पाहिजेत. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Malhar Tukdeo to the Peshwa, asking recovery of dues from Awaji Kavde.*

No. 103]

छ ४ रमजान

श्री

पुरवणी राजश्री राऊ व ताा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. राजश्री आवजी कवडे यांनी राजश्री मदनसिंगबावा याचे पुत्र राजश्री सभासिंग भोसले जमावानसी त्या प्रांत होते त्यास लुटून घोडी वस्तभाव नेली हे वर्तमान माारनिलनी राजश्री स्वामीस लेहून पाठविले. त्यावरून राजश्री स्वामीनी बहुतासा विस्मय केला कीं आमचा पुतण्यास लुटन्यास प्रयोजन काये? हे वर्तमान तीर्थरूप राजश्री ताव्यास विदित आहे. त्यास आवजी कवडे याजकडे राजपत्र व हुजरे पाठविले. आम्हाजवळी येक जासूद पत्र मागितले ते आम्ही लेहून दिल्हे आणि जासूद दिल्हा. राजश्री स्वामीनी हुजरे यास जबानी सांगितली कीं आवजी कवडे यास राजपत्र नेवून देणे. हुकुमाप्रमाणे घोडी वस्तभाव सोडिली तर बरे नाही तर उठोन येणे. आम्हास कलल तैसी घोडी वस्तभाव आवजी कवडियापासून घेऊन यैसे रागे भरोन भाषण केले. स्वामीस वर्तमान कलावे याकरितां लिहले असे. स्वामीनी राजश्री आवजी कवडे यांजकडे पत्र मुजरद जासुदासमागमे पाठवून राजश्री सभासिंग भोसले याची घोडी कुलवस्ताभाव देणे म्हणून स्वामीनी त्यास बरे खोलून लेहून देणे. दरबारास कजिया न ये ते गोष्टी केली पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Mahadaji Purandare communicates to the Peshwa Shahu's orders about the restoration of Sabhasing Bhosle's property plundered by Awaji Kavde. Sabhasing is the son of Madansing, illegitimate son of Sambhaji (Shahu's father).*

1608

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 104]

श्री ×

राजश्री पंत आपा स्वामीचे सेवेसी

सकलगुण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्नो पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती उपरी. येथील क्षेम ताा छ ११ माहे मोहरमपावेतो सुखरूप असो विशेष. चिरंजीव रो संभाजी जाधव यासी फार बरे वाटत नाही. आंग गार पडले आहे. उष्णता नाही. वेथेने फार कष्टी. कमरेपासून पाय गेले. स्वामीस कळावे म्हणौन लिहिले आहे. येथे राहिलियाने वाचत नाही. यामधे स्वामीच्या चितास येईल ते केले पाहिजे. बहुत काये लिहिणे, हे विनंती.

¶*Pilaji Jadhao informs Chimaji Appa of the serious illness of Sambhaji Jadhao, his younger brother.*

No. 105]

श्री ×

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य बापूजी श्रीपत कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल श्रावण बहुल नवमीपरियेंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. राजश्री पिलाजी जाधव पुणांच्या कोटांत ठेविले आहेत ते सविस्तर वर्तमान अलाहिदा पत्रीं लिहिले आहे त्यावरून विदित होईल. राा संभाजी जाधव याची वेथा आहे तेच आहे. उभे राहवत नाही. मांजा(ड्या?) पासून पाय अगदी गेले. उचलून बाहेर न्यावे आणावे येसे आहे. त्यास वैद्यानी नारायेण तेलाचा उपाय सांगितला. ते यांचे सग्रही नाही. याकरितां लिहिलें असे. स्वामीच्या संग्रही असेल तरी पाठवून द्यावे. तेथे संग्रह नसला तरी राजश्री स्वामीच्या सरकारांत असेल तेथून मागोन पाठवून दिल्हे पाहिजे. स्वामी स्वार होऊन सातारियास जाऊ लागले तेव्हां राा राघोपंत समागमे येत होते. त्यांस स्वामीनी आज्ञा केली कीं

× × हीं पत्रें नं. ३ व ४ नंतर बसनीलसें वाटतें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपण सातारियास गेलियावर तुम्हास लेहोन पाटऊ तेव्हा येणे. त्यावरून त्याणी सेवेसी पत्र लिहिले आहे त्यावरून विदित होईल त्यांस आज्ञा करणे ते केली पाहिजे. शेवेशी श्रुत जालें पाहिजे हे विनंती.

¶*Bapuji Shripat Chitrav writes to Chimaji Appa that Sambhaji Jadhao, brother of Pilaji, was suffering from paralysis and needed some oil as a specific.*

No. 106]

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसांवी यासीं

ꣽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ कृतानेक दंडवत विनंती. येथील क्षेम जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. गोमाजी उंदर याजकडील घोडीविसी सांगितले होते. त्यावरून त्याच्या समाचारास माणूस पाठविले होते. त्यास तो रा मल्हारजी होलकर याजकडे जेजोरीस गेला आहे. त्याजकडे चाकरी राहाणार आहे. आम्हाजवली बहुत दिवस होता सातआठसे रुपये पावीत होता. त्याजला देवाने थोर थोर घोडी दिल्ही, याकारिता आधिक पैका मेलवावयासी जातात. आम्ही आधिक पैका कोठून द्यावा? जे आहे ते आपणास विदित आहे. त्याजपेक्षा आधिक चाकरी करिता त्यास जे पावते ते कलतच आहे. आमचे पदरचा गेला म्हणून त्यास नामर्द म्हणावेसे काये आहे? परंतु आमचे पदरी माणूस लाहाणथोर आहे तेवढियानिसी चाकरी करितो. कृष्णाजी गव्हाणे, दमाजी गव्हाणे दोघे भाऊ बारगीर होते त्यास बसते घोडे बकसीस देऊन सिलेदार केले. दोन दोनसे रुपये देउन गुजारणी बहुत दिवस करीत होते. सालमजकुरी ते रा गोविंद हरि यांच्या पथकास चाकरीस गेले आहेत. त्यास आधिक पैका कबूल केला आसेल तरी तेथे राहातील. आमचे पदरचे माणूस दुसरीकडे जात नव्हते. आपणाकडे जाऊन राहतात त्यासी आमचा येत्न नाही. आपणास कलावे म्हणून लिा आसे. लस्करावरावरी सामान द्यावयाची यादी पाठविली आहे त्याबरहुकूम रा आंताजीपंत याजवा पाठऊन द्यावे. आम्ही सप्तमीस पावलास जाऊन. याउपरी लांबणीवर घालता नये. रा भिकाजी सिंदे व संताजी मोरे व राणोजी भोसले यासी पत्रे लिहून तयारी करवावी. मुहूर्त पाहोन येतील. रा गोविंद हरि यांचा मुहूर्त पंचमीचाच आहे. तेहि येतील. रा बाबूराऊ आले, त्यास सेवेसी उदैक

(शिक्का:) श्रीपांडुरंगचरणीं दृढभाव चांगोजीसुत पिलाजी जाधव

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पाठऊन देऊन. बहुत काये लिंहिणे, कृपा केली पाहिजे, हे विनंती. खासा डेरा निशाण आम्हाबराबरी येईल ते मुहूर्त कडून आलंदीवरून पाठवावा. आवसरींचे सुमारे आम्ही वैरणीच्या आश्रियाने जाऊन. हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao informs Chimaji Appa that some of his own men like Somaji Undare have entered into the service of others because he could not meet with their demands for more remuneration.*

No. 107]

श्री

राजश्री पंतप्रधान गोसांवी यासीं

ङ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री पिलाजी जाधव दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकुशललेखनाज्ञा केली पांहिजे विशेष. आम्ही रविवारी प्रात:काली कूच करून मुहूर्ते कोसभर गावाबाहीर येऊन राहिलो. यैसियासी आजी प्रात:काली राजश्री मल्हार तुकदेव आले ते उभाउभी आम्हास भेटोन आपणाकडे आले. राजश्री नारबाहि तलेगावावरून आपले भेटीस आलेच आसतील. तरी आपणांस दोनच्यार रोज गुंता पडेल किंवा मजल दरमजल कूच यैसे आम्हास लेहून पाठविले पाहिंजे. आम्ही लस्करसमेत यावे, त्यास आपल्यास दोनच्यार रोज गुंता आल्याने पोटपाणी चालिले पाहिजे. येथे घरी आसल्याने दाण्यावरी चालते. यास्तव पत्राची प्रतीक्षा करितो. उत्तर येईल त्याप्रमाणे वर्तणूक करून विशेष काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

पिलाजी जाधवाचा
शिक्का.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao asks for orders from the Peshwa whether he should march or halt for some days.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 108]

श्री

राजश्री चिमाजीपंत स्वामींचे शेवेसी

श्रीमंत प्रहुडप्रतापदिनकर खंडेस्वरी सदा येशवंत राजमान्य स्नेहपूर्वक

श्रीशीवचरण
कुस्णाजी दाभाडे
शरण

धुकटराऊ दाभाडे दिा रा क्रष्णाजी दाभाडे सेनाबारासहश्री दंडवत विनंती. येथील कुशल जाणऊन स्वकीये कुशल हरघडी लेखनआज्ञा केली पाहिजे. यानंतर आपण फौजेसहवर्तमान करवंदीवर येऊन मुकाम केला. राजश्री जगदेराऊ पवार यानी येऊन सिरपुरी मुकाम केला. सिरपुरानजीक असपास दाहा वीस गाव्र होतें, त्याची खली कुल लुटून नेली. गावाचा सत्यानाश केला. याजकरितां सेवेसी विनंतीपत्र लिहिले असे. सरदारास सांगोन लस्करांत ताकीद केली पाहिजे कीं परगणियास आजार न लागे ते गोष्ट केली पाहिजे. राजश्री सुभेदाराचा परगणा तो तुमचा परगणा. दुसरा अर्थ न धरितां सर्वास ताकीद केली पाहिजे. ये विशयी साहेबास विशेष ल्याहावे तरी तुम्हासहि मुलकाची माया आहे. परगणा तुमचा आहे. राजश्री रावोपंत सेवेसी पाठविले आहेती. परगणियाचे वर्तमान सर्व निवेदन करितील. येंदा खरीफाचे पीक कुल गेले. येक गव्हाचे मुलीवरी सर्व इमारत आली होती. त्यास दाहा वीसा गावींची खलीच मोकली जाली. तेथे पैसा काशाचा घ्यावा? बरे जें होऊन गेले ते गेले. परंतु याउपरी तऱ्ही साहेबी परगणियावरी दया केली पाहिजे. येदां माहलचा काही हाल नाही. याजकारितां सेवेसी विनंतीपत्र लिहिले असे. विशेष काये लिहिणे. कृपा अखंडित असो दिधली पाहिजे हे विनंती.

¶*Dhukatrao Dabhade to Chimaji Appa, complaining of the armies on move having plundered and ruined the villages round about Sirpur.*

No. 109]

पैवस्ता छ २० जिल्हेज

श्री

राजश्री राऊ पंत प्रधान

साहेबांचे सेवेसी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य आज्ञाधारक आवजी कवडे दंडवत विनंती. येथील सेवकाचे वर्तमान ताा छ ७ जिल्हेज

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाणोन येथास्थित असे विशेष. साहेबानी कृपा करून आज्ञापत्र सादर केले ते प्रविष्ट होऊन परमानंद जाहला. तेथे आज्ञा केली कीं आपणाकडील सविस्तर वर्तमान लेहून पाठवणे. ऐसियास मामलियाचे वर्तमान तर साहेबांची आज्ञा घेऊन स्वार जाहलो ते भिवरातीरी राजश्री दावलजीराऊ सोमवंसी सरलस्कर यांची भेटी घेऊन दोन च्यार मजला समागमे गेलो. तेथून राजश्री सखो माहादेव आपण घांटावरून सिरसाल परगणियांत आलो. परगणियाचे वर्तमान मनास आणितां राजश्री महिपतराऊ सिंदे यानी पाथरीपासून वासिम नडसी कलंबनुरीपावेतो तमाम धामधूम करून दर माहाली दोन हजार च्यार हजार रुपये घेऊन फिरोन घासदाणियाचे रोखे करून गुरें वळून रुपये घेतले. त्याचे तुमार जमिदारानी आणून दिल्हे. परगणे तमाम खराब केले. तैसेच वागमोडियाची दाहा पंधरा माणसे धरून नेऊन कैदेत ठेविली. त्यास वागमोडे सिरसालियाचे मुकामी येऊन भेटले. राजश्री राऊ सरलस्कर यांची भेटी जाहाली होती. ते समई राजश्री सखोपंतास सांगितले होते की गैरवाजबी कोण्ही मुलुकांत धामधूम करील त्यास ताकीद करणें ऐसे सांगितले होते. त्यास मुलकांतील वर्तमान मनास आणितां परगणे तमाम खराब केले. त्याजवरून सखोपंत व वागमोडे यानी विचार करून आपणास घेऊन महिपतरायावर गेले. तों ते पोहनेर परगणियांतील गाव लोणी तेथे राहिले होते. त्याजमध्यें आपणामध्यें झटपट जाहली. आपले च्यार लोक तोंडीला गेले. ते समई दोनतीन भले माणूस बारगीर कामास आले व घोडी पांच थोर तोलदार पडली. इकडील प्रसंग ऐसा जाहला. पुढें जितुरचें घाटे मेहकराकडे जावें तों पेशजी निजामनमुलुक भागानगर प्रांतांकडून साखरखेडलियावर येक मास मुकाम केला. ते समई या जिल्हियाचे बंदोबस्ती करावयास दरवेस महमदखान यांचे ताबिनात हजार बारासे स्वार देऊन साखरखेडियात ठेविले व महमदसाहेब व समतवाले पांच सातसे स्वार व नांदेडचा किलेदार व गोपालसिंग खंदारचा किलेदार वगैरे ठाणेदार फौजदार यास हुकूम केला कीं या जिल्हियांत फौज कोण्हाची फिरो न देणे. ऐसी बंदोबस्ती करून गुजरात प्रांते गेले. इकडे ज्यास हुकूम केले होते ते व माहुरचा किलेदार हिरदुलाखान जमाव करून माहुर सरकारच्या परगाणियाचे सरदेस येऊन राहिले. ऐसी बंदोबस्ती करून जागा जागा राहिले. रयतेने हावसा खादला. तमाम कमाविसदार उठोन लाविले. आपले पदरी फौजेचा सरंजाम माफीक; त्या रानात रिगाव न होये. याजकरितां आणखी दोनच्यारसे

1613

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

स्वार ठेऊन तरतुद देऊन मेहकराकडे गेलो तो दरवेस महमदखान तयार होऊन सिरपुरास आला. आंपण कूच करून वासिमाकडे गेलो. वासिम परगणियास गुदस्तास चौथाई सोड देऊन जवतव तहरह करून खालते माहूर प्रांते जावयाचा विचार करून नडसी परगणियातील भांडेगाव येथे मुकाम केला तो छ १४ रजबी राजश्री कान्होजी भोसले यांची फौजपागा व संताजी गाढवा व येसाजीपंत व मोहिते यैसे तीनच्यार हजार सडे फौजेनसी आमची बातमी राखोन येकायेकी त्रितीये प्रहरी चालोन आले. साहेबांचे पुण्य समर्थ; आपण तयार जाहलो. त्याचा आपला युध्य प्रसंग जाहला. आपणा खालील निला घोडा पडिला. व राजश्री गोरखोजी पाटील याजकडील बारगीर दोघे भले माणूस ठार जाहले व दाहावीस माणूस जखमी जाहले. साहेबांच्या प्रतापेकरून लज्या राहिली. इकडे सिरसाले, पोहनेर, परली, सेलगाव[1], परबाणी, झरी, कोसडी, वालूर, टाकली, जितूर, आवढे हा मुलुक अगोधर महिपतराऊ सिंदे यानी खराब केला होता; त्याउपरी राजश्री फतेसिंगबावा भोसले व राऊ सरलस्कर या जिल्हियातून हंगामसीर गेले तों सवच संकराजी व माणकोजी पवार व केशो बलाल दिा राजश्री सिदोजीराऊ निंबालकर हे येऊन घासदाणे घेतले; तो खासा सिदोजी निंबालकर आलें. ऐसे चहुंकडून मुलुकावर दंगे जाहले. त्यामुले गुदस्ताचे जमेस चौथाई तिजाई सोड देऊन दोन पैसे करार करून आंक[2] फिरविला होता त्याचा निमे वसल अद्याप जाहला नाही. बाक्या तैशाच राहिल्या आहेत. वर्षापेक्षा सवंगाई मुलकात जाहली आहे. आता गैरहंगाम रानात पसारा नाही. फुटकी खेडी वोस होऊन मातवर गाव हाताभोवते गुंडालून राहिले आहेत. येंदाचा मामला बहुत अफतर[3] जाहला आहे. जाहले वर्तमान सेवेसी लिहिले असे. तमाम मुलकाने हवसा[4] खादला आहे. या प्रांते महिना दोन महिने राहावे तेव्हा बाकीचा निर्गम होईल; तो त्यास तांब्राच्या डवल्याकरिता राहता येत नाही. यासी साहेबाची आज्ञा प्रमाण. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*Awaji Kawade to the Peshwa recounting the difficulties which he had to face in collecting the dues from the ryots on account of the inroads of the plundering armies of Mahipatrao Sindia and Kanhoji Bhonsle. The writer also describes the skirmishes which he had with Sindia and Bhonsle and in which he came out triumphant by the blessings of the Peshwa. He also mentions the movements of the Nizam's armies.*

---

१ ह्या पत्रांत उल्लेखिलेलीं स्थळ वऱ्हाड व निजामशाही यांमधील आहेत..

२ आंकडा. ३ बिघडला. ४ भीति.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 110]

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य

राजश्री आयाबा स्वामीचे सेवेसी

०॥ ⸙ सेवक सोनजी नाा सावंतराऊ सेनाहप्तसहश्री दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत गेले पाा विशेष. आपली आवस्ता तरी दम्याचे वेथेकरितां शक्ती हीन जाहली आहे. कोठे जावेसी शक्ती नाहीं. याकरितां सेवेसी अंतर पडते. नाहीतर हरघडी येऊन स्वामीस आपले सुखदु:ख निवेदन करावे. हे तो योजोन येत नाहीं. त्यास चिरंजीव अबिराजी बाबा व जाऊबा स्वामीसंनिध चाकरी करिताती. तरी यांचे सर्वविशई अभिमान धरून याचे चालविले पाहिजे. जेणेकरून याची उमेदवारी वाढे ते केले पाहिजे. व आपला वतनाचा कजिया पूर्वापासून स्वामीस ठाउका आहे. त्यासी त्याचा कांहीं निर्वाह होऊन येत नाहीं. तरी ये विशई राा पंताची विज्ञापना करून यार्ची वाट केली पाहिजे, जेणे करून पदरी यश पडे. तरी आपण पदरीचे ठेवणाईत पूर्वापासून आहे. बहुत काय लिाा ? कृपा लोभ असो देणे हे विनंती.

¶*Naro Gangadhar alias Ayaba Mujumdar (d. 1754?) is addressed by Sonji Naik Sawantrao begging kindly attention to his sons.*

No. 111]

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक गोविंद बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. ताा छ २६ राबिलावलपर्यंत वर्तमान येथास्थित असो विशेष. राा सिवजी जाधवराऊ गावी आहेत. हे मातबर सरदार आहेत. यैसियांस सरदार राा राणोजी व कानोजी भोसले याजकडील येतात त्याची याद आलाहिदा पाठविली आहे. ऐसियास देवगडचा यैवज यावयास दिवसगत लागते तेव्हा फौज स्वामीकडे कैसी येईल ? फौजेची जरूर स्वामीसच आहे. तरी बराणपुरी अगर बालापुरी दाहा हजार रुपये देविले तरी मातबर फौज पदरी पडेल यास संदेह नाही. राा कानोजी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

भोसले याजकडील संकराजीपंत निजामनमुलुकांकडें जाऊन बोली केली. बालापूर आकोले दहाडे वगैरे जाहागीर घेऊन मोगलाईत जाऊन नवद हजारी मनसब करावी हे तहकीक वर्तमान आहे. सेवेसी कळले पाहिजे. आपण फौजेची पंधरा रोज दिलभरी केली आहे. पंधरा रोजात पैकियाचा विचार होऊन आला तरी उतम, नाही तर जमा जाहाली फौज हातची जाईल ऐसा विचार आहे. बहुत लिहिणे तरी स्वामी समर्थ आहेत. रा कानोजी भोसल्याकडील फौज फुटते. ते मोगलाईत जाणार, याजकरिता लोक फुटतात. जे वर्तमान आढलले ते सेवेसी लिहिले आहे. पारपत्य करणार स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञापना.

¶*Govind Balal writes that Kanhoji Bhonsle is reported to be going over to the Nizam.*

No. 112]

पौ छ १ सवाल

श्री.

पुा राजश्रा आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री कृष्णराव व राजश्री दुर्जनसिंग यास जमावसह-वर्तमान मांडवी प्राते पाठविले आहेत येसे यैकितों. त्यास ते कल्याण भिवंडी प्रांतातून उतरले तरी दाभाडियाची फौज कदाचित त्याचे पाठीवर उतरली तरी या प्रातांस उपसर्ग लागेल. यास्तव उभयतांस नासिकाकडून त्या मार्गें रवाना करावे यांत उतम आहे. स्वामीस कळावे. याकरितां लिहिले असे. बहुत काय लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi requests Chimaji Appa to ask Durjansing to enter Mandvi by the Nasik route.*

No. 113]

श्री.

पुा श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. किलेदाराकडून मीर सराजुदीन व सुंदर निलाजी आले. त्यां-समागमे आम्हास बुटेदार चिकंदोजी थान पाठविले आहे. स्वामीस कळावे याकरितां लिहिले असे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The writer acknowledges the receipt of cloth sent to him.*

1616

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 114]

श्री.

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी नमस्कार विनंती. येथील कुशल ता। माघ शुा। १ प्रतिपदा जाणून स्वकीयें लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामींनी पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहले. माहाराज राजश्री स्वामी श्रीजेजुरीस यात्रेस येणार आहेत तरी मावले माणूस दोनसे लवकर पाठवणे व खांबाची लाकडे व करवताविसी लिहिले. येसियासी स्वामीचे पत्र येतांच राजश्री मोरो गोपाळ यांस व मावलियास पत्रे पाठऊन रवाना करविले आहेत. येतील. करवत तो पूर्वीच रवाना केले आहेत व कुलुपे पाठविली आहेत पावतील. लांकडाविसी लिहिले तरी लांकडे गाडे वाटेवरी रवाना करविली आहेत. स्वामींनी घाटमाथा गाडे पाठऊन लांकडे नेविली पाहिजेत. वरकड मातुश्री सिऊबाई यांणी आम्हास लिहिलें कीं राजश्री नाना यांणीं आपलियास लिा कीं रुपयाविसीं तीर्थरूप राजश्री रायाचे पत्र राजश्री वासुदेव जोसी यास होते ते त्याजकडे पाठविले आहे. येसियासी आम्हास राजश्री पंतप्रधान यांचे पत्र आले नाहीं अगर स्वामींनी पाठविले नाहीं. वरकड पत्र जरी आले तरी त्याजकडे आणखी हजार दोन हजार रुो निघतात. स्वामीस कलावे याकरितां लिहिले असे. राजश्री पंत यांची व निजामनमुलुक यांची भेटी जाहल्या की नाहीं लेहून पाठवावें. कलले पाहिजे. चिरंजीव गगांधर जोसी खासगत घर पुणियास बांधीत आहेत. त्याचे साहित्य राजश्री सिवरामपंत यांस सांगोन केले पाहिजे. बहुत काय लिहिणे लोभ केला पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi reports to Nana that arrangements for the King's journey to Jejuri are complete.*

No. 115]

श्री.

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामाचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती येथील कुशल ता। छ २७ मोहरम जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. भिकराऊत मांग याचे स्वार ६ साहा येथें आज ता। होते. त्यास आजीच निरोप देऊन स्वामीकडे पाठविले आहेत. हे चाकरीस बरे हुकमी आहेत. स्वामीस कलावे याकरितां लिहिले असे. बहुत काय लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi recommends one Bhika Mang to the Peshwa's service.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 116]

श्री.

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ताा मार्गसीर शुध द्वादसी रविवार जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी जामखेडचे रुपयाविसी लिहिले. येसियासी आम्ही पुणियास आलों तो राजश्री अम्रतराव स्वामीकडे गेले. याउपरी अम्रतराव यांजकडे माणसे पाठऊन रुपये आणून देऊन. ते काही सुधेपणे रुो देतात यैसे नाही. आम्हास जामीन देऊन त्याचे विचारे रुो द्यावयाचे नाहीं याकरितां निकड करून रुपये घेणे लागतील. आजि उद्यां त्यांजकडे माणसे व ब्राम्हण पाठऊन देतो. कलावे याकरितां लिहिले असे. आम्ही माणसे पाठवितो ते निकड करून पैका घेतील, परंतु ते स्वामीजवळी बोभाट आणतील, तेव्हां आपण त्याची गोष्ट ध्यानांत न आणावी. कलले पाहिजे. बहुत काय लिहिणे लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi informs Chimaji that he expects some trouble about realizing Government dues from one Amrutrao.*

No. 117]

श्री.

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल छ १७ जमादिलाखरपर्येंत असे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते पावले. पाा नेर येथील कमाविस राा आपाजी माने याजपासून करून घ्यावयाविशी आज्ञा केली व पहिलेहि स्वामीनी स्वमुखे आज्ञा केलीच होती. त्यास आम्ही येथे मनास आणिले तो आपाजी माने आम्हाजवळ बोलावयास अनमान करितां हैबत पाटलाची पत्रे त्यास आली आहे. त्याचा बेत हैबतपाटील कमाविस करील यैसा आहे. इतकेहि असोन आम्ही त्याचा कारकून बोलाऊन मनास आणिले परंतु ते गोष्ट होत नाहीं. कलले पाहिजे. आणिखी येकाचे मारफातीने बोली करविली. त्यास तो सात हजार रुपये म्हणतो. बहुत काये लिहिणे लोभ केला पाा हे विनंती.

¶*Vasudeo Joshi informs Chimaji Appa that Apaji Mane, who was asked to collect revenue from Ner, is unwilling to accept the job.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 118]

पौ छ २६ मोहरम

श्री

आशीर्वाद उपरी. राजश्री बाबूजी नाईक कोठे आहेत त्याजकडील वर्तमान काय ते ल्याहावे म्हणून लिहिले. त्यास मशारनिल्हे व राजश्री शंकराजी निकम उभयेता एकत्र आहेत. शहरी राहावयाचा वसवास खादला आहे. टोक्यासहि राहावयासहि त्याजला प्रशस्त वाटत नाहीं. यास्तव आम्ही त्यास लिहिले आहे कीं तुम्ही शंकराजी निकम येकत्र राहणे विहित नाहीं. टोक्यास राहावयास आनकूल न पडेच तरी कटोरियास राहाणे म्हणून लिहून पाठविले आहे. या उपर ते काय विचार करतील पाहावे. मीरखान आपणाजवल आला कीं नाहीं ते ल्याहावे म्हणून लिहिले, तरी मीरखान प्रस्तुत समागमेच आहेत. मीरखानाकडील मुरादखानाचे राऊत पलून गेले. त्याचा मजकूर लिहिला त्यास त्याची तहकीकात केली जाईल. साहुकारानीं बाबूजी नाईक यास अडविले आहे याजकरितां फार हैरान आहेत. शंकराजी निकम व लक्ष्मणराव राम याजकडील मोगलाईचा यैवज त्याजकडे देविला आहे. जो जमा होत जाईल तो मशारनिल्हेकडे पाववितील लो+भ असो दीजे हा अशीर्वाद.

¶*Bajirao to Chimaji Appa, giving him news about Babuji Naik, who along with Shankaraji Nikam had been asked to stay at Katora if he did not like to stay at Tonke. The writer adds that Babuji Naik was much harassed by his creditors and that Mir Khan was with the writer.*

No. 119]

श्री

पुरवणी[1] तीर्थरूप राजश्री
राऊ व ताा राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री सदासिव दामोदर यानी राजश्री फतेसिगबावाकडून परमुलूक नर्मदेपलीकडील मान्य केला. त्या माहालाची नावनिसी जे कलली ते आलाहिदा लेहून पाठविली आहे. त्यावरून विदित होईल. याखेरीज माहाल कलतील त्याची तहकिकात करून मागाहून लेहून पाठऊन. बोली करिता केली की, दाहा हजार फौज चाकर ठेऊन आपले जातीवर कर्ज करून परमुलकी

+ येथून अक्षर बाजीराव बल्लाळ यांचें. १ पत्र सातान्याहून पुरंदऱ्याचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तुमचे नाव सांगोन टका मेलऊन कर्ज वारून फौज फेडून उरला पैका तर तुम्हास आणून देऊन यैसी बोली केली. राजश्री फतेसिंगबावा यानी मान्य करून त्याचा बहुमान केला, वस्त्रे कडी मोतियाची जोडी दिल्ही. सनदाची परवानगी दिल्ही. विदित जाले पाहिजे. माारनिलेनी राजश्री बावाजवल सांगितले की आपली फौज खासगत दोन हजार आहे. याखेरीज आपले साहित्य राजश्री मल्हारजी होलकर व राजश्री आवजी कवडे करितील. यैसी गोष्टी सांगितली. खरे लटके कलेना. सदासिव दामोदर कोठे आसतो ? याचे ठिकाण कोणते ? याचा शोध स्वामीनी केला पाहिजे. आमचा आढलाचा नाही. विदित जाले पाहिजे. चितास आले तरी पुणियाचा सावकारास सांगावे की, पैका न देणे. जाले वर्तमान स्वामीस कलावे याकरिता लिहिले आसे हे विज्ञापना.

¶*Purandare writing from Satara informs the Peshwa of a contract entered into by Fatesing and one Sadashiv Damodar in which the latter accepted some districts in the north from the former on the condition of serving him. The writer does not know the credentials of Sadashiv and therefore asks the Peshwa to enquire and to ask the sawkars in Poona not to lend him any money.*

No. 120]

रा छ १० रबिलाखर

श्री

माहाराज राजश्री छत्रपती

स्वामीचे शेवेशी

आज्ञाधारक कान्होजी भोंसले सेनासाहेब सुभा शेवेसी विज्ञापना. येथील क्षेम तागायेत छ २७ माहे सफर मुकाम कसबे मलकापूर सुभे खानदेश. स्वामीचे कृपाद्रिष्टीकरून सेनेसहवर्तमान कुषल असो.

बाो स्वामीची आज्ञापत्रें वार्तिकासमवेत पूर्वी सेवकास सादर जाहाली होतीं तीं प्रविष्ट होऊन, त्या पत्राची प्रतिउतरे जासुदासमागमें स्वामीचे शेवेसी रवाना केली आहेत. तेथे आद्यंत वर्तमान इा छावणीपासून ताा छ २२ माहे सफर कसबे बालापूरपर्यंत तपसिले लिहिले आहे. तीं पत्रें शेवेशी प्राविष्ट जाहालियावरी अगदी वर्तमान शेवेशी निवेदन होईल. त्याआलीकडील वर्तमान तरी, बालापुरीचे मुकामी राहून, मुलुकामध्यें बाकी राहिली होती, त्याचे वसुलाची तरतूद, जे कर्तव्य ते करून पाहिली. सेवेटी मुलुकातून नख्त रुपये वसूल न येत आणि लस्करचे मुकामामुले मुलुकाची खराबी आरभली. या

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

कारणें घोडे कापड जे आलें ते घेऊन, बाकीचा निरगम केला. आणि तेथून कूच करून, कसबे मजकुरावरी मुकामास आलों असों. याउपरी स्वामीचे प्रतापें नेमाड प्रांतची स्वारी करावी यैसा हेत धरून, या मुकामीहून कूच करून, त्याच प्रांते बऱ्हानपुरावरून जात असों. तिकडील स्वारीचे जे वर्तमान होईल, ते स्वामीचे शेवेशी लिहोन पाठवावयासी अंतर होणार नाही. तूर्त स्वामीकडील सालमजकुरी खर्चवेचाची बेगमी करून पाठवावी यैसा विचार धरिला होता. परंतु मुलुकातील वसुलाची गत यैसी जाहाली. या कारणें पोख्ती अनकूळता घडोन आली नाही. परंतु जे तरतूद होता जाहाली ते करून, रा। बाजीराव महादेव याचे विद्यमाने सिवाजी धालवडे व अंताजी दामोदर यासमागमें मोहरा सुमार १००० येक हजार पाठविल्या आहेत. हे शेवेसी आलियावरी प्रविष्ट करितील. त्या बेहेलियाकडे जमा जाहालियावरी, प्रविष्ट जाहालियाचे प्रत्योतर सादर करावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. वरकड येथील प्रसंगाचे साकल्य वर्तमान उभयेता मारनिले शेवेसी निवेदन करितां श्रुत होईल.

येणेंप्रमाणें जाहाले वर्तमान शेवेशी लिहिले आहे. श्रुत जाहाले पाहिजे. हे विज्ञापना.

हे विज्ञापना

¶*Kanhoji Bhonsle writes to King Shahu that he is starting on a campaign in the province beyond the Nerbudda. He sends to the King 1,000 mohors and pleads that he could not collect more on account of the bad condition of the country.*

No. 121]

छ २८ साबान जाबसूद

शंकर

राजश्री चिमाजीराऊ आपा गोसांवी यांसी

०॥ ८

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीं राऊ जाणोजी निंबाळकर दंडवत विनंती उपर. येथील क्ष्येम जाणून निजानंद लेखन कीजे. विशेष रा। धोंडो आकदेव यांस तुळजाबाई सिंदे यांनी नाहक कैद करून लाख रुा। तुफान करून मागतात. त्यांजपासीं तों येक पैसा नाहीं आणि यानीं तों तुफान करून त्या

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ब्राम्हणाचा प्राण घ्यावा ऐसा प्रयोग आरंभिला आहे. ऐसियास राउळांस ब्राह्मणांचें सर्व प्रकारें आगत्य आहे. यास्तव लिहिजेतें कीं येक पत्र तुलजाबाई सिंदे यांस पाठविलें पाहिजे कीं नाहक ब्राह्मणांस कैद केलें आहे. हे गोष्ट उतम नाहीं. तर पत्र दर्शनी सोडून दीजे. ब्रम्हहत्या न होये तें कीजे. सोडावयास अनमान केलियां तुमचा प्रांत सुरक्षित राहणार नाहीं. ऐसेंच पत्र बाबजीपंत वकील तुलजाबाई यांसहि लिहावें, कीं तुम्ही धोंडोपंतास आणभाष देऊन बोलाऊन आपले घरी जागा देऊन विस्वासघात करून रा। धोंडोपंतास कैद केलें हे गोष्ट तुमच्या ब्राम्हण्यापासून दूर आहे. याउपर पंत मानिलेची मुक्तता होये आणि तुम्हावर ब्रम्हहत्या येईल आणि मग तुम्हास कोण बरें म्हणणार? व तुमच्या येजमानाचा प्रांत सुरक्षित राहणार नाहीं ऐसीं दोन पत्रें मात्र पाठविल्यां ब्राम्हणांच्या मुक्ततेचा विचार घडोन येणार. तर कोण्हे विषई आनमान न करितां दोन पत्रें पाठविलीं पाहिजेत. ब्राम्हणांच्या कार्यास आपण चुकणार नाहींत ऐसें जाणून लिहिलें असे. बहुत काये लिहिणें हे विनंती.

¶*Janoji Nimbalkar to Chimaji Appa, asking him to write to Tuljabai Sindia to release the poor Brahman Dhondo Akdeo.*

No. 122]

श्री.

श्रीमंत राजश्री आपासाहेब साहेबांचे सेवेसी

विनंती सेवक सुभानजी राऊ येरूणकर नामजाद किले राजमाची दंडवत विज्ञापना. ता। छ २२ माहे रावल पावेतो सेवकाचे व किले मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. सिंदीजोहर किले मजकुरी पाठविले ते छ २१ रबिलावलीं पावले. त्यास आज्ञा होतीजे याची गर्दन मारून वर्तमान लेहून पाठवणे म्हणून आज्ञा. आज्ञे प्रमाणे छ २२ रावलीं प्रातःकाळीं घटके दिवसास गर्दन मारून सेवेसी वर्तमान लि। असे. याचे सीर सेवेसी पाठवावें; परंतु आज्ञा नव्हती म्हणून येथेंच ठेविलें असे व त्याचे हातची मणगटी व पागोट्यांतील तावीज[१] परवारी यासी द्यावयाची आज्ञा नाहीं म्हणून ठेविली असे. तर त्याचे सिराची व तावीज मणगटीची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Siddi Jouhar is beheaded at Rajmachi. The kiledar wants orders from Chimaji about the disposal of his head.*

---

१ दृष्टमणि.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 123]

पौ छ २ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक निळाजी निंबाजी आगलावा सबनीस व बिंबाजी राऊ सावंत दिा धोंडजी व बहिरजी नाईक कानतकर चरणावर मस्तक ठेऊन विज्ञापना. ताा छ रमजानपावेतो सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीचे पुण्ये प्रतापेकरून किले गडगडा अमवाशस आदितवारी फते केला. दोन घटका पावेतों झुझ जाहालें. मोगलाकडील बाराजण ठार जाहले व जखमी सातजण जाहाले. कांही कडा उडाले त्याचा सोध केला नाहीं. सोध करून लेहून पाठवितों. व दिमत मजकूरचे धर्मोजी मालपोटे जखमी भारी आहेत व देवजी घुमाळ यास एक जखम आहे. जदीद लोक दोनसे ठेऊन किला फते केला. राा बावाजीराज मारणे किले कुरंगकर आसामी दाहावीसपावेतो सरंजाम करावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. येणेप्रमाणें सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

राा बाळाजी यादव व बाजी नाईक पांडेकर यांचे राउत पंचवीस पावले. किले मजकूरी करार करून द्यावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत हे विज्ञाप्ति.

जदीद लोकापैकीं दहा बारा पावेतो जखमी जाले. ... जासूद मुखवचणे सांगता विदित होईल हे विज्ञाप्ति. एसू जासूद याणी मर्दोनगी केली आहे हे विज्ञाप्ति.

¶*Nilaji Nimbaji and others report the successful occupation of fort Gadgada.*

No. 124]

श्रीशंकर

राजश्री चिमाजीपंत गोसावी यांसीं

॥ऽ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री स्नो साबाजी नाईक निंबाळकर दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणोन स्वकीये स्वानंदलेखन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

करीत गेले पाहिजेत. या नंतर तुम्ही पत्र पाठविले पावोन लिहिले वर्तमान अवगत जाहाले. येसियासी, पत्री शेटियाजी भोईटे आपल्यापासी आहेत. यांचे उंट व घोडे सोडोन देतो. येसियासी आपल्यापासी अगदी फलटण देस आहे आणि आम्हीहि आपल पदरीच आहे. ये(त)दार्विसीचे पत्र आपणासी पूर्वीच तपशिल पाठविले आहे: त्यावरून सर्व कलो येईल. कलल पाहिजे बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The letter refers to the release of the camels and horses belonging to Shetyaji Bhoite by Chimaji Appa.*

No. 125]

श्री

पुा श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी. दांताच्या धंद्यास मुंबैचे पारसी येथे होते त्यांस तकसीमदार केले. त्याणी मुंबैस जाऊन तेथील मुख्य इंगरजांसी बोली दांताची केली. सावकारी धंदा म्हणजे बोली केली म्हणजे फिरत नाही. त्याहिमध्यें ते परकी जागांच सावकार तेथे वचनास अंतर पडल्याने उतम नाही हा अर्थ स्वामी सर्वज्ञ जाणतच आहेत. आम्ही विस्तार काय ल्याहावा. आपल्या चितास येईल ते करावे. बहुत काये लिहिणे ? लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Chimaji Appa is requested to grant some concessions to a Parsi dealer in ivory from Bombay.*

No. 126]

छ ४ जिलकाद

श्री.

पुा राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. कॊा कल्याण येथील वाणी बकालांची दुकाने सालगुदस्तां जलालीं. त्याजकडून नवी दुकाने बांधवणे लागतात व सालमजकुरी कितेक वाणी उदमी नवी दुकाने बांधावयास उमेदवार आहेत. त्यास पाच सातसे रो तगाई द्यावी लागेल. आपणास कलावे याकरितां लिहिले असे. बहुत काय लिहिणे ? लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi reports to the Peshwa that a loan of about seven hundred rupees will have to be made to those merchants of Kalyan whose shops were destroyed by fire last year.*

1624

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 127]

छ १० रमजान

श्री.

पुा राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. सातारियास दर माहेचे रुपये आज. ताा काय पावले ते तपसीलवार लेहून पाठवणे. सातारियाचे हिसेबास व तुमच्या हिसेबास तफावत पडिला आहे. त्यास तफावत पडावयास निमित्य काय? तरी सातारियाचे जाब जे तुम्हाजवळी असतील त्याच्या नकला पाठवणे म्हणून लिहिले. येसियासी सातारियाहून जाब आले आहेत त्याजवरून तेरीखवार हिसेब तपसीलवार लेहून पाठविला आहे. त्यावरून कलो येईल. हिसेबास अंतर पडावयास कारण काय आपण म्हणतील तरी पूर्वी आम्ही आषाढापासून आश्विनपर्यंत चौ महिनियाचा दरमाहे वीस हजार रुो दिल्हे. त्यास त्याणी जेष्ट मासापासून दरमाहेवरून आश्विन बाकी काढिला. त्यावरून स्वामीनी नसरापूरचे मुकामीहून लिहिले कीं आश्विन मासचा दरमाहे पाठवणे त्यावरून आश्विनहि पाविला. त्यास इाा जेष्ट ताा पौष येकूण आठमहिनियाचे चाळीस हजार रुो पाठविले. त्याचा हुजतीवार हिसेब पाठविला आहे त्यावरून कलो येईल. माघ मासचा हप्ता राहिला तो पुर्णिमा जालियावरी अखेर माघ मास पाठऊन देतो. बहुत काये लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*The Subedar of Kalyan supplies the explanation, demanded by the Peshwa, about a discrepancy in accounts.*

No. 128]

छ १३ मोहरम

श्री.

पुा श्रीमत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामीनी राा कृष्णराव याबरोबर स्वार दिल्हे. त्याणी त्यास निरोप दिल्हा. त्याणी हरदु सुभ्यामध्यें दर गांवास दोनरुपये तांदूळ व कोंबडी घेतली व कितेक गांवी लुटी केली त्याचा जाबता मागाहून लेहून पाठवितो त्या

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

प्रो त्यापासून घेतले पाहिजेत. ढमढेरे याचे राऊतानी तो बहुतच उपद्रव केला. कोणाची कडी व भांडी नेली आहेत. मागाहून सविस्तर लेहून पाठवितो. कळले पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa is informed that the soldiers disbanded by Krishnarao have harassed poor villagers with all sorts of demands for rice and fowls while returning to their homes.*

No. 129]

पो छ १६ सवाल

श्री.

पुा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामीनी राजश्री राणोजी भोइटे यास पाा गाळणा व निंबाईत व नेर येथील ऐवजी रुो ४००० च्यार हजार देविले त्यापैकी माघमासी रुो २००० दोन हजार व वैशाखमासी दोन हजार देणे म्हणून लिहिलें. त्यावरून हे रुपये मागतात. त्यास सदरहू परगणियाचा दरमाहे तो स्वामी घेत असतात आणि हे रुपये कोठून द्यावे, कोणत्या येवजी द्यावे, ते आज्ञा करावी. त्या प्रमाणें वर्तणूक करून. कळले पाहिजे. हे तो नित्य उठोन रुो मागतात. यास याचे उतर काय ते लौकर पाठविले पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi to Chimaji. He would like to know how he should meet Ranoji Bhoite's demand for 4,000 rupees. Ranoji Bhoite was assigned this sum from the revenue of Ner and Galana the whole of which however went to Chimaji himself.*

No. 130]

पाा छ १६ सवाल

श्री.

पुा राजश्री आपा स्वामांचे सेवेसी

विनंती उपरी. तादूळ मौजे निडसी ताा अबर येथे जमा जाहाले आहेत. परंतु कोठी येऊन अद्याप तादूल नेत नाही. याकरितां हें पत्र पाठविले आहे. तरी स्वामीनी कोठी लौकर पाठऊन तादूल नेले पाहिजे. रानात उगेच येक कारकून खोलबोन राहिले आहेत. याकरितां लिहिले असे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi requests Chimaji Appa to send his men to remove rice stored up at Nidsi.*

1626

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 131]

श्री.

पुा राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामींनी पत्र पाठविलें कीं सुपारी खंडी व मिरी खंडी येकून दोन खंडी पाठवणे म्हणून लिहिलें. येसियासी सुपारी पहिली चोपन्न रुपई खंडी होती म्हणजे दर रुपयास पांच सेर पडली होती. हली सतसष्ट अडसष्ट रुपयानी खंडी जाली म्हणजे दर रुपयास च्यार सेर पडली. सवाईचा तफावत जाहला. पुणियात कैसी मिळते कळत नाही. येथिल्यापेक्षां महाग असिली आणि सतसष्ट अडसष्ट रुपई खंडीप्रमाणें पाठवावी यैसे असेल तरी आज्ञा करावी म्हणजे घेऊन पाठऊन देतो. कळावें याकरितां लिहिले असे. मिरीहि प्रस्तुत माहाग आहे. तशामधे येथून उदमी मुबईस पाठविला आहे तो थोडी बहुत सुपारी व मिरी घेऊन येईल. आलियावरी पाठऊन देतो. कळले पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa is informed that the price of betel-nut per khandi has gone up to Rs. 68. The Peshwa's order for betel-nut and pepper would be executed on receiving a reply whether the purchase may be effected at the price.*

No. 132]

श्री

पुा राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामींनी राजश्री मानाजी आंगरे यास पत्र पाठविले कीं सेभर खंडी तांदूळ बाणकोटास पाठवणे. म्हणून तेच पत्र आम्ही त्याजकडे रा राघो केशव यांसमागमे पत्र पाठविले. त्याणी उतर पाठविले कीं तांदूळ पेणेस पाठवावे. आपण गलबते पाठऊन आणून. येथे तांदूळ अनकूल पडत नाहीं यैसा अर्थ लिहिला. यैसियासी आम्ही कल्याणास साठ पाऊणसे खंडी तांदूळ सिध्ध केले आहेत. उद्या अगर परवा राघो केशव यासमागमे कल्याण भिवंडीची तारवें देऊन रेवसास पाठवितो. रेवसास राजश्री मानाजी आंगरे यास न्यावयास समीप यास्तव रेवसास पाठवितों. पेणेसहि पंचवीस तीस खंडी तांदूळ सिध्ध केले आहेत. ते पेणेस त्याची गलबते गेलियावरी त्याचे पदरीं घालतील. याप्रमाणें तांदुळाची तरतूद केली. केवळ राजश्री मानाजी आंगरे याचे भरवसियावरी जातो तरी कार्यास न येते. त्यास स्वामीचे पत्र पाठविले आणि येथे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तांदळाचे काम चालीस लाविले आणि तांदूळ तयार केले. राजश्री मानाजी आंगरे याचे पत्र स्वामीस आहे ते पाठविले आहे त्यावरून कलो येईल. विदित जाले पाहिजे. बहुत काय लिहिणे ? लोभ करीत गेले (पा) हे विनंती.

¶*The writer (the Konkan Subha) informs the Peshwa that a consignment of hundred khandis of rice is ready for being carried to Bankot. Manaji Angria, who was assigned this task, expressed his inability to fulfil it and the work had to be done by the writer.*

No. 133]

पो छ २ मोहरम.

श्री.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ २६ माहे जिल्हेज जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. बाणकोटचे रवानगीचे तांदूळ मुंबईस पाठऊन तेथून राजश्री कृष्णाजी राम यांचे पत्र आले त्याची नकल पाठविली आहे त्यावरून कलेल. तांदलास फिरंगियानी हासिला करितां खोलंबा केला. त्यास तेथे शामलाची गलबते आली होती त्यास हे वर्तमान कलेल. याकरितां तो जपणीस आहे. परंतु तांदूल मुबईहून गेलियावरी शामलाच्याने वाटेस जावत नाहीं. याकरितां तांदूल रेवसास अगर कुलाबियास पाठवणे म्हणून रा कृष्णाजी राम यास लेहून पाठविले आहे अगर राजश्री मानाजी आंगरे मुबईस इगरेज यास द्यावयास तांदूल पाठवणार आहेत त्याचा मुबदला करावे याचे तजविजेस रावो केशव गेले आहेत. ती तजवीज जाहली तरी करणे म्हणून लिा असे. विदित जाहाले पाहिजे. बहुत काय लिहिणे ? लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi reports to the Peshwa the steps he has taken in order that the consignment of rice shipped to Bankot may not be intercepted by the Sidi.*

No. 134]

श्री.

पुा राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामीनी पत्र पाठविले कीं स्वार चालीस पनास पाहिजेत ते ठेवणे, वरकड पाठऊन देणे. त्यावरून आम्ही सर्वास बोलाऊन सांगितलें त्यावरून सिध्ध जाहाले. दुसरे दिवसी जावे तों सवेच स्वामींचे पत्र आले कीं

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तुम्हास पाहिजेत ते स्वार ठेऊन वरकड राजश्री कृष्णराव यांजकडे देविले आहेत तरी देणे. त्यावरून फिरोन अवघियास बोलाऊन आणून सांगितले. खावंद चाकरीस त्याच्यानें ना म्हणवत नाहीं. परंतु परम विचारात पडोन जावयास सिध्धता केली आहे. काय निमित्य स्वामी म्हणतील तरी या प्रांते या दिवसी ऊष्ण व गरमी बहुत, कितेक घोडिया सबर आहेत व कितेक घोडी गरमीमुळें जाया जाली. रा। चाहुजी बारवकर याचा घोडा तो येक मेला व काकाजी कोकरे याचा येक घोडा जाया जाहाला. कोळवण प्रांते यापेक्षां गरमी फार, याकरितां दिलखुलासियाने जातात यैसे नाहीं. त्या प्रांते उडीद हरभरेहि महाग आहेत. कलले पाहिजे. बहुत काय लिहिणे ? लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*The Peshwa is informed that there is discontent in the Cavalry division (stationed in Konkan) at being transferred to Kolwan which is particularly very hot in that season.*

No. 135]

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी सां नमस्कार विनंती. येथील कुशल अश्विन शुा १३ त्रयोदसी पर्यत यथास्थित जाणोन स्वकीय कुशललेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष स्वामीनी मौजे खोपोली येथील मोकदमास आज्ञापत्र पाठविले कीं नवे धान्य तीन पाइली तांदूळ व साव तीन पाइली पाठवणे. येशास त्या गावी तो नवे धान्य जाले नाहीं. स्वामीनी आणविले आणि इष्टीस जरूर पाहिजेत हे जाणोन तलास करून भात केली ८।। आदमण पाठविले आहे. सावे तो अद्याप जाले नाहींत. मावलांत पोनमावल कर्यात मावल प्रांते मिलतील. भात पाठविले आहे. पावलियाचे उतर पाठविले पाहिजे. बहुत काय लिहिणे? लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi to Chimaji that new rice required for the Ishti ceremony has been sent as ordered. He regrets new sawa is not available.*

No. 136]

श्री.

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ २१ साबान जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ते प्रविष्ट जाहले. मार्गसीर मासपैकी रुा २८०० अठाविससे व पौष मासपैकी रुपये ५००० पांच हजार येकूण सात हजार आठसे रुपये येणे. त्यास घाटमाथा जातांच पाठवितो म्हणून कबूल करून गेलेस. त्यास अद्याप पाठविले नाही म्हणून लिहिलें. येसियासी घाटमाथा आलो तेथे येवज नाहीं. येदा वाणी वणजारा येत नाहीं. मार्गाची आमदानी नाही याकरितां तेथून पाठवावयास अनकूल पडिले नाहीं. याकरितां कसबे खालापूर येथील मुकामीहून पधरासे रुो पाठविले आहेत ते पावलेच असतील. आणि आजीच सकाली ४००० च्यार हजार पाठविले व पेणेहून दोन हजार रवाना करविले आहेत येऊन पावतील. बाकी तीनसे रुो राहिले ते येवज जमा जालियावरी पाठऊन देऊ. साल मजकुरी जकातीची अमदानी कुली नाहीं. मुलुकात थोडीबहुत राहिली आहे त्यास कल्याणची सिबंदी व किले माहुलीची सिबंदी व दरमाहे भरतां मुसकील होईल. कलावे याकरितां लिहिले असे. बहुत काय लिहिणे? लोभ केला पाहिजे हे विज्ञापना.

¶*Vasudeo Joshi remits Rs. 7,500 to Chimaji Appa and complains about the fall in the customs duties.*

No. 137]

पोा छ २३ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे
सेवेसी

विनंती सेवक बापूजी नारायेण सां नमस्कार विज्ञापना यैसिजे. ताा छ १७ जिल्हेज मोा पनवल येथ असो विशेष. वसईचे गोले येणे प्रमाणे रवाना पर्‍वारी[१] याजवाा बैलावर

गोले सुमार	गोले सुमार
३२०	२०६१

येकून गोले २३८१ तेविससे येक्यासी रवाना केले असेत. बाकी राहिले ते येता दिसत नाहीं. मुंबईस माणसे पाठविली आहेत. जर आले तर घेऊन येतो नाही तर उठोन येतो. मुंबईचा जिनस दारूगोला विचारे करून आणावा लागतो. याजनिमित्य सेवेसी विनंती लिा असे. हे गोले मुंबईहोन आणिले.

---

१ महार.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

साडेच्यार हजारपैकी यावे २११९ येकविससे येकुणीस यावे, ते आठा दिवसी आले तर आणितो. आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Canon balls were bought at Bombay and despatched to Bassein.*

No. 138]

छ २३ रमजान

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. बराणपूरचा सुभा खानदेशात थालनेरास आला आहे म्हणऊन लिहिले आहे. बातमीस जासूद पाठविले होते खबर घेऊन आले. बेटावद परगणियात मुकाम केला. रा गोविंद सिधेस्वर सामील होऊन मौजे पास्टे व पढावद राजश्री समसेरियाची ठाणी आहेत त्यास मोर्चे लाऊन भांडतात. पढावदेचे ठाणे छ ११ रमजानी मारिलें. संभर माणूस बरखंदाज व गावचे मिलोन धरिले आहेत. सोडितील की काये करितील हे नकले. पास्टेयासी मोगल भांडतो. ते फते जाहालियावर आमलगाव दाभडियाकडील ठाणे जलोद परगणियाचे आहे तेथे येणार आहे. उंदीरखेड * ही गोविंदपंताच्या चितात आहे की खटखट करावी यैसे आहे. तोफा आणावयास स्वार बराणपुरास पाठविले आहे. तोफ आलियावर खानदेशात जागाजागा ठाणी गनिमाची आहेत त्यासी कजिया करावा. महिना दोन महिने मुलकात राहावे यैसे दिसते. मंडली मिलाली आहे. गोविंद सिधेस्वर यासी बावीस परगणियाची खिजमत आहे. त्यास कोणाचा उतक्रुष कार्यास नये. प्रा बाहाल येथे खेडगाव पोहरे हे गाव मोकासियासी मवासगिरी करितात. श्रीमंत राजश्री आपानी मौजे खेडगाव प्रा मजकूर येथील पाटिलावर गुनेगारी रुपये साडेसासे करार केले. वसूल न देत तेव्हा स्वारी करून सेपनास गुरेढोरे व गाडे वलून आणिले. त्यावरून तेथील मोकदम फिर्याद गोविंद सिधेस्वर याजवल होऊन प्रा मजकुरच्या कमाविसदार कसबे बाहालेस राहात असतात त्या आटकाव करावा. कमाविसदार आम्हासी येऊन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बजीद होतात. आमचा तो परगणे मजकुरी घासदाणियाचा वसूल होणे व प्रतापजी सोमवसी याजकडील कमावीस आहे वसूल परगणियाचा होणे जबरदस्तीने वसूल घेतला पाहिजे. याजकरिता गोविंदपंताचा आमचा सौरश नाहीं· याजमुळे सिवबदीखाले येणे लागले. पारपत्यें करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*This is a complaint against the Subhedar of Burhanpur who in collaboration with Govind Sidheshwar laid waste some villages in Khandesh.*

No. 139]

छ ३ रावल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ स्वामी
वडिलाचे सेवेसी

विनंती. स्वामीचे आज्ञेप्रमाणे जामखेड येथील कागद राजश्री सरलस्कर याचा घेऊन पाठविला असे. साराउष गोष्ट हा मामला स्वामीचे पदरचा पूर्वीपासून आहे. जे रीतीनि आपण म्हणतील त्याप्रमाणे विचारास अंतर होणार नाही. परंतु मामल्यात काही जीव राहिला नाही. येविसीचा तपसिले अर्थ त्याणींहि लिहिला अहे त्यावरून विदित होईल. जे गोस्टीने याचा हा गुंता वारून पुढे मुलकात अमल बसे आणि कर्ज वारून ऊर्जित होये तो अर्थ करावा. या उपरी आम्ही स्वामीकडे यावयाचा विचार करीत होतो परंतु अपले अज्ञापत्र अले तेथे अज्ञा की मनसबियाचा बाहाणा करून येणे. यैसियासी राजश्री प्रतिनिधीकडील तो मनसबियाची गोस्ट राहिली. यास्तव तूर्त येता नये. तीर्थरूप राजश्री तात्याची पाचसात पत्रे आली, तुम्ही अगत्य सातारियासी येणे; परंतु आम्हीहि तितकीहि टालाटाल करून राहिलो होतो. प्रस्तुत अपली अण घालून मागती पत्र तीर्थरूपाचे अले. यास्तव सातारियास जावे लागते. तेथे गेलियावर लौकरीच तीर्थरूप राजश्री अपाच्या दर्शनास पुण्यास जाऊ. वरकड स्वकीये अर्थ स्वामीस लिहिला होता त्याची अज्ञा पूर्वील बोलीप्रमाणे आली. यैसियासी अम्हीं बारगिरी करावयाची उमेद धरितो. सिलेदारी पहिलेपासूनहि कोणी केली नाही व अम्ही करावी हे स्वामीच्या विचारे असिले तरी पुढे सर्व संकट पडणे तेहि अपणासच पडेल. येविसीचा पत्री तपसील ल्याहावा यैसा नाही. पुण्याहून श्रीमंत राजश्री अपाची अज्ञा घेऊन स्वामीच्या दर्शनास येऊ तेव्हा जे विनंती कर्तव्य ते करू. साराउष गोस्ट अमचे स्मरण असो द्यावे. विस्तार काये लिहिणे ? अम्हीं उदईक भाद्रपद सुध द्वितीया गुरुवारी स्वार होऊन

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सातारियास जातो. विदित जाले पाहिजे. पाा जामखेडचे पूर्वील बोलीप्रमाणे अमचे स्मरण असो दीजे. हे विज्ञापना. दुसरे पुरवणीत अगोधर जामखेडचा मजकूर लिहिला होता तो राहिला. मग स्वामीचे अज्ञेप्रमाणेच पत्र पाठविले. राा अनंदराऊ दिवाण याकडे माणसे न पाठवावी हे विज्ञापना.

¶*The writer Purandare informs the Peshwa of the affairs at Jamkhed and says he will pay his respects to the latter after first going to Satara and to Chimaji Appa at Poona.*

No. 140]

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ तथा

राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

अपत्यें मल्हार तुकदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १० रबिलाखरपर्यंत स्वामीच्या आसीर्वादेंकरून येथास्थित असे विशेष. राजश्री मुरार केशव राजुरकर यानी प्रांत वराड व देवगड चांदे वगैरे मामला राजश्री फतेसिंगबावा यांजकडून करून घ्यावा आणि स्वामीचे पदरीं मामला घालावा. पैका पडेल तो स्वामीनी द्यावा. उत्पन्न होईल मामला उगवेल तें सर्व स्वामीनी घ्यावे. आपल्यास जें स्वामी देतील तेंच घेऊं. पदरीं पडिल्यावर सर्व संकट स्वामीसच आहे. चालवणार स्वामी समर्थ यैसा विचार चितांत आणून मामल्याची बोली राजश्री फतेसिंगबावासीं लाऊन नेमस्त विचार मनास आणून माारनिलेने आपले तर्फेने सेवेसी पत्र लेहून राा खंडोपंत व गोपालराव पाठविले आहेत. मामल्याचे बोलीची यादी पाठविली आहे. उभयेता सेवेसी सविस्तर अर्थ निवेदन करितील व मााारनिलेच्याहि पत्रावरून विदित होईल तो सकल अर्थ चितांत आणून कार्येसिधि होये, मााारनिले स्वामीचे पदरीं पडत तो अर्थ करणार स्वामी समर्थ आहेत. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Malhar Tukdeo requests the Peshwa for the grant of the province of Berar and Deogad Chanda to Murar Keshao from Fatesing Bhonsle.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 141]

छ १६ सवाल
अडीच प्रहरास

श्री

तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे
सेवेसी

अपत्ये नानाने कृतानेक सां। नमस्कार विनंती. उपरी. स्वामीच्या आसीर्वादेकरून ता। छ १३ सवालपरियेंत कुषल असो विशेष. स्वामीनी चिमाजी जासुदासमागमे आसीर्वादपत्र पाठविले ते छ १२ रोजी प्रविष्ट जाले. त्यावरून बहुत समाधान जाले. स्वामीनी आज्ञा केली कीं हरभर सवंग आहेत. दाहाबारा खंडी खरिदी करून ठेवणे. त्यास आम्हापासी सिलकेत बारातेरा खंडी हरभरे अवघे आजीतागाईत आहेत. प्रस्तुत पेंड[1] दर रुपयांस पाइली साह पाइली सवा सा पाइली आहेत. स्वामीची आज्ञा होईल त्याप्रमाणे विकत घेऊन. बाजारात हरभरे फार येतात यैसे नाही. जरूर प्रयोजन घ्यावयाचे असिले तर उतर सत्वर पाठविले पाहिजे. विकत घेऊन विदित जाले पाहिजे. राजश्री आवजी निलकंठ याचे घरीचे लग्न आजी छ मा।री जाले. गडावरी लग्न केले ते खालते आलियावर राजश्री स्वामीस उदईक विनंती करून आज्ञा करितील त्याप्रमाणे उतर पाठवून. बंगला तो निर्गल केला आहे. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*Nana Saheb to Chimaji Appa, communicating news from Satara regarding the marriage celebrated by Shahu in the family of Avji Nilkanth Chitnis, father of Mahipatrao, Chitnis of the Peshwas.*

No. 142]

श्री.

पु॥ राजश्री बाजीराव पंडित प्रधान गोसावी यासी विनंती उपरी. रा। रामाजी कडू याजविशाई लि॥ यैसियास आपणाकडे अले नाहीत. राजश्री दमाजी गायेकवाड याजकडे अले अहेत. त्याजकडील बोलीचाली काही नाही. त्यासहि सांगितले, तेहि ठेवणार नाहीत. याजसमागमे अले नाहीत. सोनगडी अहेत. उदईक जाऊन याचे समाधान करून तुम्हाकडे पाठऊन. त्यांस आम्ही ठेवणार नाही. बहुत काये लिहिणे? छ ९ रजब. हे विनंती.

¶*This letter gives the whereabouts of one Ramaji Kadu. The writer declares to the Peshwa that he will never entertain Kadu in his service, nor will he be entertained by Damaji Gaekwar whom he has approached.*

---

[1] बाजारभाव.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 143]

श्रीराम

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री बाजीराव यांप्रति प्रीतिपूर्वक नारो राम कृतानेक विनंती. येथील कुशल कार्तिक बहुल येकादसी जाणून स्वकीये कुशललेखन केले पाहिजे विशेष. सांप्रत पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं. पुण्यांहून स्वार जाहालेस, पुढें मजल दरमजल जात आहा म्हणून वर्तमान परस्पर कलो आलें. अशास, तुम्हांकडील दिनचर्येंचे वर्तमान दिनप्रतिदिनीं अवगत व्हावें. या गोष्टीस चित सापेक्ष आहे. तरी आपणांकडील वर्तमान वरचेवरी मजलीचे मजलीस गेल्याचें लेहून पाठवीत गेलें पाहिजे. च्यार जोडे लागले तरी लागोत परंतु वर्तमान ल्याहावयास अंतर केलें न पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Naro Ram, who is anxious to hear from Bajirao, entreats him to write to him from every stage of his journey.*

No. 144]

छ १४ जिल्हेज

श्रीव्यंकटेश

सकलगुणालंकर्ण अखंडितलक्षुमीआलंकृत
राजमान्य राजश्रीं आपा स्वामी गोसांवियांसी

पोष्य व्यंकटराव नारायेण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. यानंतर राजश्री विभुतराव सतकर स्वामीपांसी गतवर्षीपासून निष्ठा धरून सेवा करितात. त्याचा मूल गमाजी सतकर आपण ठाणे सांष्टीत गतवर्षी ठेविला. त्यास त्याच्या चाकराने जीव दिल्हा हे निमित्य त्यावरी ठेऊन त्यांची घोडी पागेस राा खंडोजी माणकर यांणीं लाविली होंती. त्यास जैमानकतबा[1] होऊन सोडून दिलीं. अशास जमान कतबा राहिला आहे. त्यास हे उभयेता येकनिष्टेने सेवा करितांत. तरी यावरी कृपा करून माणकरास आज्ञा करावी आणि कतबा सोडून देवावा. व पुढेहि सेवा उभयेता करीतच आहेत. यांचे उर्जित करणार स्वामी समर्थ आहेत. तेथें विशेष काय लिहिणें? कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Vyankatrao Narayan intercedes with Chimaji Appa for the Satkars—father and son—for his favour.*

---

१ जामीनकतबा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 145]

छ २९ सावान

श्रीव्यंकटेश

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत
राजमान्य राजश्री आपा स्वामी गोसावियासी

पोष्य व्यंकटराव नारायण सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २१ शावान पावतां जाणून स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. रा. त्र्यंबक अनंत देशमुख ताा सालसी हे दोन तीन वर्षे स्वामीचे सेवेमधें तलकोकणामधे नेमून ठेविलें. स्थलीं राहून सेवा करीत होते. गत वर्षी घरास गेले. तेथे रा संभाजी आंगरे सरखेल याणी माारनिलेनी सेवा आपली करावी स्वामीपासी येऊ नये, ये गोष्टीचा आग्रह करून जामीन आदिकरून घेतले. परंतु मााऱनिले सेवा करून उर्जित करून घ्यावे यास्तव आणखी नवें लोक घेऊन व आपले कुटुंबसहवर्तमान आले. आमचे घरी लग्न चिरंजिवाचे होते यास्तव लोकानसीं ठेऊन घेतले होतें. प्रस्तुत सेवेसी आले आहेत यांचे चालवने. सेवा घेतली पाहिजे. हे आले या मागें यांचे चुलते व कुटुंब आहे. त्यास आंगरे याचे संकटच आहे. परंतु आपले पदरी पडलें आहेत. त्याणी दुसरी भय मानावे यैसा विचार नाहीं. मााऱनिलेचे आगत्य आम्हास, पुरातन स्नेही आमचे, यास्तव लिहिले असे. बहुत काय लिहिणे ? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Vyankatrao Narayan to Chimaji Appa, asking for protection to Trimbak Anant Deshmukh against Sambhaji Angria.*

No. 146]

पाा. छ ४ जिल्हेज

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री अपा स्वामींचे सेवेसी

अपत्ये माहादाजी अंबाजी कृतानेक सास्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ ३० जिल्काद परियेंत येथास्थित असे विशेष. राजश्री हिंदुराऊ घोरपडे याकडील राजश्री केशवराऊ कितेक दक्षण प्रांतीच्या बंदोबस्ताच्या कार्यानिमित्य येथे आले आहेत. येविसीचे तपसीलवार वर्तमान स्वामी येथे असतां मााऱनिलेनीं स्वामीस विदित केलेच आहे. स्वामीनीहि समर्पक उतर प्रत्योतर समाधानपूर्वक केले होते. त्यावरून कितेक पालेगाराकडे मााऱनिलेनी पत्रे पाठऊन स्वामीस पत्रे पालेगाराची आणिली आहेत. राजश्री मुराररराऊ घोरपडे याचीहि पत्रें स्वामीस आली आहेत. ती व आणिक कितेक तिकडील

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ासबियाचे विचार स्वामीस लिंहिले आहेत. तरी आपण पूर्वी बोलिल्याप्रमाणे ाधानपूर्वक प्रत्योतरे पाठवावी. राजश्री स्वामीनीहि कितेक समाधानाचे भाषण ्रून राजश्री केशवराउजीचा बहुमान करून दो महिनियानी फिरोन कुल ्नकारणाचे द्रढीकरण करून सत्वर यावे यैसी आज्ञा करून रवानगी केली. तेक समाधानाच्या गोस्टी व बहुमान वस्त्रे व काही जवाहीर यैसे राजश्री दुराऊ यासीहि दिल्ही. मागे काही दुर्वार्ता आली होती यास्तव समाचारास ्गसे पाठविली होती ती माणसे वर्तमान घेऊन आली की समाधानरूप आहेत. ्र्ता आली होती ती बास्कल. यैसे वर्तमान आलियावर राजश्री बहुत समाधान ्ले. आणि राजश्री हिंदुराऊ यासी वस्त्रे व जवाहीर व राजश्री मुराररराऊ ्ती वस्त्रे यैसी देऊन राजश्री केशवराऊ याची रवानगी केली. माारनिलेच्या ्चारे होते की पुणियासी जाऊन स्वामीची भेट घ्यावी. मनसाबियाचा विचार ्रावा. कितेक स्वामीचे उमदे काम करून दाखवावी आण स्वामीची कृपा दिन-्तीने संपादावी हा हेत पूर्ण आहे. परंतु राजश्री स्वामीनी बहुत त्वरेने जावयाची ्माज्ञा केली यास्तव तिकडे यावयास अनकुल पडिले नाही. यामुले पत्रे तपासि-्ठवार वर्तमान लेहून पाठविली आहेत तरी पत्राची उतरे लौकर पाठवावी म्हणजे माारनिले येथून निघोन जातील. स्वामीच्या उतराचाच गुंता आहे. ्रकड काही गुता नाही. सारउंष गोस्ट स्वामीची महत्कार्ये करून दाखवावीं आण स्वामीची कृपा पूर्ण संपादून घ्यावी हेच मानस राजश्री केशवराऊजीचे आहे. यांच्या मनोदयानरूप स्वामीनीहि कृपा केली पाहिजे. पत्राचे उतर सत्वर पाठवावी. बहुत काय लिंहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Mahadoba Purandare from Satara to Bajirao and Chimaji, informing the latter of the visit of the agent of Hindurao and Murarrao Ghorpade to Satara and of the treatment and instructions given him by Shahu as regards the affairs in the Karnatak.*

No. 147]

श्रीर्जयति

विनंती उपरी. राा येसवंतराऊ व राणोजी सिंदे जमावानसी रवाना केले आहेत. यास रोजमुरा खर्च पाहून लस्कराबाा देऊन याचे बहुता प्रकारे चाल-वीत जाणे, याचेविसीं अतंर न करणे. हे भले लोक कामाचे आहेत. यास पाठीसी जागा देऊन चालवणे येविसी अंतर न करणे. छ २ रावल हे विनंती.

¶*Ramaji Bava, Chitnis to Bajirao (?), recommending Yashvantrao and Ranoji Sindia to the notice of the addressee. This Ranoji Sindia seems to be one of Saswad and not the father of Mahadji.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 148]

पाो छ १४ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामी वडिलांचे सेवेसी विनंती. राजश्री आनंदराव पंडित सुमंत व राजश्री माहादाजीपंत राजश्री देवजी सोमवंसी यांस फौजेसहवर्तमान आणावयाबद्दल पाठविले. ते मजलदरमजल छ ८ साबानी त्यांजवल पावले. त्यांस हिंदुराव बोलिले कीं दाहा पंधरा स्वारानसीं राजर्दशनास येतों, तेथे जसी आज्ञा होईल तसी वर्तणूक करून म्हणून बोलिले. त्यावरून सुमंतानी राजश्री नारबावास पत्र लिहिंले आहे कीं येथील मजकूर असा आहे. प्रस्तुत यांजवल सात आठसें राऊत आहेत. त्यास राजश्री आपाजी सोमवंसी कांहीं फौज घेऊन पोट भरावयास जाणार त्यास अगदी लहान थोर राऊत जमा जाले तर दोन हजार होतील. ते अगदीच आपाजी सोमवंशी देखील घेऊन यावे कीं त्यांस पोट भरायास जाऊं द्यावे ते आज्ञा विचारून लेहून पाठवणे म्हणून लिहिलें होते. त्यास प्रस्तुत स्वामीनी लिहिलें होते कीं आज्ञेप्रमाणे जातो त्या अर्थावरून राजश्री देवजी सोमवंसी यास टाकोटाक पत्र पाठविलें आहे कीं राजश्री चिमाजी आपा घांटमाथां गेले. तुम्ही बहुत जलदीने फौजसुदां येणे, पोट भरावयास येक राऊत न पाटवणे, असीं पत्रे येक दोन गेलीं आहेत. स्वामीस वर्तमान कलवें याकरितां लिहिलें आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Letter to Bajirao giving him news of Shahu's orders in connection with the Somvanshi.*

No. 149]

पाा छ १७ साबान

दोन प्रहर दिवस

श्री

+पुंाा तीर्थरूप राजश्री आपा स्वामी

वडिलांचे सेवेसा

विनंती. आज राजश्री आनंदराऊ सुमंत आले. राजश्री देवजी सोमवंसी हिंदुराव यास घेऊन आले. माारनिलेचा मुकाम निंबेचे वाडीवर मुकाम करून सुमंत आज येथे आले. हिंदुरायाची भेटी उद्या शनवार दुपारानंतर आहे. राजश्री स्वामीनी राजश्री माहादाजीपंतास बोलावयाविसी आज्ञा केली आहे. तरी स्वामीनी माहादाजीपंतास सत्वर रवाना केले पाहिजे.

¶*Nana communicates to Chimaji the arrival of Sumant at Satara.*

+ पत्र नानासाहेबांचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

[No. 150]

श्री

श्रीमंत सहश्राय चिरंजीव राजश्री चिमाजी आपा यांसी

प्रतिपूर्वक सिऊबाई कृतानेक आशिर्वाद. येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष. सिवामाळी करपा आम्हाकडे सरीक होता त्याचे लग्न केले. सिवामाळी, वस्ती आडे, याने आपली लेक त्यास दिल्ही आहे. लग्नास मुदल रुपये ६० साठ दिल्हे त्यास वर्ष च्यार जाली. उगवणी न करितां पळोन गेला. बायको सासऱ्याचे घरी टाकिली आहे. याकरितां सिवामाळी आपणाकडे पाठविला आहे. वर्तमान विदित करील. तरी त्यास ताकीद करऊन व्याजसुधा रुो देविले पाहिजेत. रुो आमचे म्हणून लिहिले असे. तो माळी आपणाकडे चाकरीस राहिला आहे या करितां लिहिले असे. बहुत काय लिहिणे? सिवामाळी करपेकर याचा सासरा व तोहि सरीक होता. तो न पुसतां पळोन गेला. रुो दिल्हे नाहींत. कळले पाहिजे हे आशिर्वाद.

¶*Shiubai Chaskar writes to Chimaji Appa to recover her debt from Shiva Mali who was in the latter's employ.*

No. 151]

श्री

श्रियासह चिरंजीव विजईभव राजमान्य राजश्री पंतप्रधान ताा
राजश्री चिमाजी आपा यांसी

प्रति सिऊबाई कृतानेक आसिर्वाद. येथील कुशल ताा भाद्रपद वद्य त्रितीया रविवासर जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. नारो दादाजी यासी किले गोरखगडकरी यानी धरून नेले आहे. त्यास येकवेळ त्याजकडे माणूस पाठऊन सलुखाने सुटे येसे करणे. नाहीतरी त्याचें पारपत्य करावें म्हणून लिहिलें कललें. येसियासी आपले लिहिल्यापूर्वी आम्हास वर्तमान कलतां आम्ही त्याजकडे पत्र व माणूस पाठविले आहे. काली आपले पत्र आलियावरीहि येक भला माणूस व पत्र पाठविलें आहे. त्यासी ग्रहस्त पत्रे सोडिला तरी उतम जाहालें. नाहीतरी जे तरतूद करणे ते करून. आपणास कलावें याकरितां लिहिलें आहे. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हा आसीर्वाद.

¶*Shiubai writes to the Peshwa that the keeper of Gorakhgad will be strongly dealt with for wrongfully confining Naro Dadaji.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 152]

श्री

श्रीमंत चिरंजीव राजश्री चिमाजी आपा यासी

प्रतिपूर्वक सिऊबाई कृतानेक आसीर्वाद. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन-आज्ञा केली पाहिजे. यानंतर आपण पत्र पाठविले ते पावले. कोकणात महागाई जाली आहे याकरिता देशातील गला कोकणात जातो. यामुले देशातहि महागाई जाली आहे. तरी घाटोघाटी ताकीद करून गला खाली जाऊ न देणे म्हणून लिहिले. येसियासी अगोदर दाणे गेले असतील ते असोत. त्या अलीकडे चिरंजीव राजश्री कृष्णरायानी ताकीद केली की दाणे खाली जाऊ न देणे. त्यावरून आम्ही वाणियासी ताकीद केली व कमाविसदारास आज्ञा केली. हाली आपले पत्र आले. ह्यावरून मागती ताकीद करीतो. दाणे जाऊ देत नाही. कलले पाहिजे. जासुदास च्यार घाटी च्यार रुपये देविलें (देवावे) ह्याप्रा देविलें. बहुत काये लिहिणे. बोरघाट व आणखी घाटी गल्यास हासील नाही. आम्हास काही त्याची प्राप्त नाही याकारितां आपण लिहिले. त्याप्राो ताकीद करवितो. दाणे जाऊ देत नाही. कलले पाहिजे हे आसीर्वाद.

¶*Shiubai (Chasker) to Chimaji Appa, that as per his instructions orders have been issued to stop at once the export of grain to the Konkan.*

No. 153]

श्रीराम

चिरंजीव सौ वज्रचुडेमंडित राजश्री जिऊबांई यासी प्रति सिऊबांई कृतानेक आसीवार्द उपरी. येथील कुशल ताा मार्गेस्वर वद्य २ परियेंत समस्त मंडली सुखरूप आसो. कांहीं चिंता न करणे. विशष. तुम्ही गेलियावर बोलाऊ पाठवितो म्हणाली होतीत. परंतु त्याचे तुम्हास स्मरणहि नसेल. बरे तुम्हास थोर लोकास स्मरण कैचे? तीर्थस्वरूप मातुश्री बया व आजीबाई श्रीद्वारकेस यात्रेस गेली आहे. तुम्ही आम्हासी कबूल केले होते कीं तुम्हास येक पोरगी पाठऊ याचेही स्मरण राहिले नाहीं.

आमाबाई व मैनाबाई खुशाल आहेत. इतकियावर तऱ्ही स्मरण आसो द्यावे. तुमच्या भरवसियावर आहो. बहुत काये लिा हा आसीर्वाद.+

\+ पत्र कोणाचें? जिऊबाई व सिऊबाई कोण?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 154]

श्री

यादी राजपत्र

तुलरे ई हैबतरायाजी आई त्याकडे कृष्णाजी नाईक याचे कर्ज तुम्हाकडे आहे ते देखत पत्र देणे. उजूर[1] न करणे. बोभट येऊ न देणे १

भावसिंग टोके यास पत्र. गणजोसी याचे कर्ज देणे आहे ते देत नाही. तर देखत पत्र देणे. बोभाट येऊ न देणे १

सुलतानजी निंबालकर यास पत्र खंडो मोरेस्वर तुमचे निसबतीने पाथर परगणियात अहे. त्याकडे कृष्णाजी नाईक याचे कर्ज आहे. त्यास तुम्ही ताकीद करून देवणे १

१ खंडो मोरेस्वर यास पत्र. नाईकाचे कर्ज आहे ते देखत पत्र देणे.

२

येकून पत्रें च्यार देणें.

¶*Krishnaji Naik Joshi helped Shahu with money in his early days. Many papers of this type are found which shew how papers used to be submitted and orders obtained in those days.*

No. 155]

२

माराजाजवल देतील ते समई राजश्री स्वामीस सिकारीस जाणें. लस्कर कूच जालें. मग संध्याकाली रात्रीस कसबे मेढ्याचे मुकामी रात्रीस दरबार जाला. राजश्री फत्तेसिंग व येमाजीपंत येसवंतराऊ गोविंदराव वरकड लोक कितेक होते. राजश्री कृस्णाजी नाईक जोसी यास बोलाऊं पाठविलें. तेहि दरबारास आले. मग राजश्री स्वामीनी राजश्री कृस्णाजी नाईक यास पुसिलें कीं दोन लक्ष रुपये बावाचे तुम्हांकडे आहेत तरी तुम्हीं त्याचे त्यास देणें. त्यावर राजश्री कृस्णाजी नाईक यानी विनंती केली कीं आपण दोन लक्ष रुपये मान्य केले नाहींत. आगर आपला कागदपत्र यांजवल नाहीं. राजश्री पंतप्रधान याजकडे राजकारण आणिलें होतें त्यांचें जाणें जालें नाहीं. याकरितां यास राजकारण सांगितलें. तुम्हीं त्या प्रांतास जाल तर तुम्हांस दोन लक्ष रुपये मोंगल देईल. त्यास यांचें जाणें जालें नाहीं. त्याचें पत्र आलें कीं आम्हांस यास प्रयोजन नाहीं यैसे विनंती केली. त्यावर राजश्री स्वामीस ये गोष्टीचा विचार पडिला. मग उभयेतांस पुसिलें कीं बोलीचालीचा तुमचा मध्यस्त कोण? ते समई राजश्री कृस्णाजी नाईक

---

[1] तक्रार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बोलिले कीं मध्यस्त कोण्ही नाहीं. राजश्री बावासहिब व रघोजी भोसले आपण तिघाची बोली. त्यावर राजश्री स्वामी बोलिले कीं क्रिया करावी. हा मजकूर जाला. त्यावर खासा राजश्री फत्तेसिंगबावा दोनच्यार वेळां बोलिले कीं दोन लक्ष रुपये यानी मान्य केले. पैका द्यावा त्यावर राजश्री स्वामी कृस्णाजी नाईक यांसी बोलिले कीं तुम्ही बावासमागमें जाणें. पांच सावकार बसोन तुमचा इनसाफ करितील. त्यावर नाईक बोलिले कीं सातारियास इनसाफ करावयास मातबर कोण्ही नाहीं, राजश्री फतेसिंगबावा आबरूवर येणार याकरितां माहा-राजापासी आलों. माहाराजानी मनसुफी[१] करावी. मनसुफी न करितां माहा-रा(ज)जा म्हणत असतील तर जातों. परंतु फिरोन माहाराजाचे दर्शन होत नाहीं. इतका अर्ज करून गेले. त्यास संध्याकाळीं राजश्री फतेसिंगबावा व रामाजीपंत दिवाण उभयेतां दरबारास गेले होते. तेसमई राजश्री फत्तेसिंगबावानीं वर्तमान कानावरी घातलें. राजश्री स्वामीनी रामाजीपंत यास पुसिलें. यानी उत्तर दिल्हें कीं मजला कांहीं ठावकें नाहीं. तेसमई राजश्री फत्तेसिंगबावास येक प्रकारें वाटले, म्हणून मशारनिलेनी आम्हांजवल सांगितलें. त्यास उभयेता दरबारीहून गेलियावर मागती रामाजीपंतास बोलाविलें. तेसमई आम्ही दरबारी होतो. राजश्री स्वामीनी रामाजीपंतास पुसिलें कीं राजश्री कृस्णाजी नाईक याजकडील मजकूर कसा आहे तो सांगणें. त्यावर रामाजीपंत याणी विनंती केली कीं मजला कांहीं ठावकें नाहीं. माहाराजानी मजला पुसावेसें नाहीं, मज कांहीं सांगतां येत नाहीं. इतकें म्हणून मुजरा करून उठोन गेले. त्यावर राजश्री स्वामीस ये गोष्टीचा विचार पडिला. आपण नाईकास जाणे म्हणऊन आज्ञा केली त्यानी विनंती केली कीं पुन्हां दर्शन होणे नाहीं. त्यावर राजश्री येशवतंराऊ यासी बोलिलें कीं तुम्हांस कांहीं उमज पडिला कीं काये? त्यानी उत्तर दिल्हें कीं पैकि-याचा कारभार, कागदपत्र नाही म्हणतात आणि जबानीं रुपये मान्य केले म्हणताती, ये गोष्टीस काय सांगावे? त्यावर दरबार उटिला. प्राथःकाळीं च्यार घटिका रात्रीस कृस्णाजी नाईक राजश्री स्वामीकडे गेले. याउपरी आज्ञा काय? तेसमई राजश्री स्वामीनी चिता विवेक (?) म्हणून आज्ञा केली कीं तुम्ही आम्हां-समागमें येणें. राजश्री फत्तेसिंगबावास सागोन पाठविलें कीं तुम्ही नाईकाचे कागदपत्र पाठऊन देणें. हुजूरच मनसुफी मनास आणून, इतकें सांगोन पा

---

१ निकाल.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

विलें. राजश्री स्वामी सिकारीस गेले. त्यासमागमें राजश्री कृष्णाजी नाईक सिकारीस गेले. राजश्री फत्तेसिंगबाबा साताऱ्यास गेले. संध्याकाळीं रविवारीं केळघरचे मुकामी जावळीजवळ नाईकाची भेटी जाली. प्रहररात्र भोजनास नायकास जाली. दुसरे दिवशीं प्रतापगडास नाईक गेले. याउपरि पुढें जें वर्तमान होईल तें सेवेसीं लेहून पाठवीन. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Report of a quarrel between Fatesing Bhonsle and Krishnaji Naik Joshi on a point of debt of 2 lacs owed by the former to the latter. Shahu finds himself in a fix.*

No. 156]

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामींचे सेवेसी

सेवक कृष्णाजी नाईक जोसी सा। नमस्कार विनंती उपरी. तुमच कृपेकरून जेस्ट वदी १ पावेतो जे तुम्ही आन देता ते भक्षूण कासीवास करितो. त्याचे स्नये तुम्हास येते. विशेश. छत्रपति शाहू राजे यानी वतन करून दिले परंतु श्रीपतीराऊ यानी चालो दिले नाही. तुम्हाकरिता आम्हासी धेर्स[१] करीत होते की लाख रु। सेरणी द्याल तरी आमल बसऊन देऊ. त्यासी मी काही त्यासी शरण न गेलो. फुकट चाकरी च्यालीस वरसे केली. हाली ते मजला तर सर्व राहिले. सर्व स्वामी करितील तें होईल. यैसे आसता आमचे पुत्राचे स्वामीने उरजित न करावे यैसे नाही. तरी येईल चितास तरी सनदेप्रमाणे आमल बसऊन देणे. नाहीतरी ती पत्रे काहा ठेऊन कार्याची नाहीत. याजकारणे नानास[२] सांगो(न) पत्रे आणून राजश्रियाजवली ठेवणे, आणि नानास निरोप देऊन आम्हाजवली पाठवणे. जें आन देतां तितकचे पुरे. मी दोनी च्यार वरसे राहात नाही. पांच सात महिन्याचा सोबती आहे. मागे बाइकाचे मुलाचे चा(ल)विणार तुम्ही समर्थ आहां, तेथे मज्ञ काही चिता नाही. येतेवेलेस पत्र लिहून घेतलेत, आम्ही तुम्हामागे बाइकास त्या मागे मुलास वरसासन देत जाऊ. ईस्वरे तुमचे बरे करावे. त्यात सर्व वतन व इजती आहे. स्वामींचे

---

१ द्वेष. २ लेखकाचा मुलगा महादाजी कृष्ण असावा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

चितास येईल ते केले पाहिजे. घाट तुमचा पडतो त्याजवि(शी) लिहिले होते. परंतु चितास न ये. पुढे वीस पंचवीस हजार लागले तरी नीट होणार नाही तो थोडकियात होते याजकरिता लिहिले होते. बहुत काये लिहिणे ? कृपा निरंतर आसो देणे हे विनंती.

¶*Krishna Joshi, who has in early days helped Shahu with money and is now in old age, now residing at Benares, writes to the Peshwa complaining that Shahu's grants to him were not being respected by the Pratinidhi.*

No. 157]

श्रीशंकर

राजमान्य राजश्री माहादाजीपंत
स्वामींचे सेवसी.

सेवक कृष्णाजी नाईक जोसी सा। नमस्कार विनंती उपरी. तुमचे कृपेकरून जेस्ट वदी १ पावेतो समस्त श्रीकासीमधे सुखरूप आ(से) विशेश. तेथे होतो तो दोनी च्यार भेटी होत होत्या. आता कागदी येकहि भेटी न होयसे जाहाले हे उचित की काये ? मी तुमचे भरवशाने कासीवास करितो. पोतदारी व मुकीमीचा (?) आमल तुम्ही बसऊन दिला तरी होतो; नाहीतरी बेटी (?) तुमचे चितास नये तरी सनदा राजश्री जवली ठेवणे आणि नानास मझपासी पाठवणे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Krishnaji Naik Joshi to Mahadajipant (Purandare ?) from Benares.*

No. 158]

श्री

पुरवणी. श्रीमंत राजश्री राऊजी स्वामीचे शेवेसी विनंती उपरी विशेष. स्वामींनी आज्ञा केली की सिदोजी सालपेकर व सुलतानजी बाबर यास तलब[१] करून हुजूर पाठविणे म्हणून आज्ञा केली. त्यावरून तिघें माणसे व दाहा रुपये मसाला केला. त्यास माणसास त्याणी मारिले व रोखा बुचाडून घेतला. यैसे लबाड आहेत. तरी दोनसे रुपये मसाला व दाहा जेजालबारदार व हातरोखियांत मजकूर कीं गणेशपंत कमाविसदाराच्या माणसास मारिले, यैसा नादान, यैसे लेहावे म्हणजे प्रगण्यात फिरोन दबाव बसतो. नाहींतर कारभार सिला (?)

---

१ समन्स, बोलावणें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पडिला. दुसरें कसबे मजकुरच्या नाहवियाकडे काही सरकारचें लिगाड होतें, याजकरिता माणूस पाठविले होतें. त्यास सोमवसी बुवाजी सरलस्कराकडील आहे, त्याणे नाहवी हिरोन घेऊन सरकारचें माणूस जाया केलें, येसे चहुकडून आम्हावर गहजब होतो, आमची मदत कोण्हीच करीत नाही. तर ही दोही पारपत्ये स्वामी करितात तरीच आमल चांगला चालेल, नाहीतर कांही चालणार नाही. धकेबुचे व जेरबंदाखालें माणूस सोमवंशी यानें जायां केलें येसे आहे. यांत स्वामी खावंद आहेत. बहुत काये लिहिणे ? कृपा लोभ असों दीजे हे विनंती.

¶*The anonymous writer complains to Bajirao how Sidoji Salpekar and Sultan Nimbalkar were behaving in a rebellious spirit and must be at once checked.*

No. 159]

श्री

सेवसी विज्ञापना. ताा छ २४ सफर पावेतो वर्तमान येथास्थित आसे. साहेबाची आज्ञा घेऊन निघालो तेछमई साहित्यपत्राविसी विनंती केली. साहेबी आज्ञा केली कीं याद व कारकून पाठविणें त्यावरून याद कारकून सेवेसी पाठविलें. परंतु पत्राविसी आज्ञा जाली नाहीं. रवानगीची मनुश्यें तटली आहेत. साहेबी कृपा करून राजेश्री मानसिंग जाधवराऊ विनंती करितील त्याप्रमाणें साहित्य करून देवावयासी आज्ञा करावी. खासगत मजकुराविसी राजेश्री जाधवराऊ यांसी लिाा आहे. विज्ञापना करितील. चितांत आणून सेवकास जे आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तू. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer and the addressee are not mentioned. The writer requests that the addressee should issue letters in the sense indicated by Mansingrao Jadhav.*

No. 160]

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व ताा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आपत्ये मल्हार तुकदेव कृतानेक साां नमस्कार विनंती उपरी. स्वामीच्या आसीर्वादकरून ताा छ १३ सफर परियेंत कुषल आसो विशेष. छ माारी राजश्री आनंदराऊ पंडित सुमंत याणी आम्हास आज्ञा केली की राजश्री पंतप्रधान यास आमचा निरोप लेहून पाठवणे. चिरंजीव राजश्री कृष्णराऊ लस्करांत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहेत त्याचे बहुत प्रकारे समाधान करून सातारियांस पाठऊन देणे. मौजे राजुरी व मौजे खोरे येथील सनदा पाठऊन देणे. त्यावरून स्वामीस विनंती पत्र पाठविले आहे तरी सनदा व राजश्री कृष्णराऊ यास सत्वर पाठविले पाहिजे. स्वामीनी सत्वर आले पाहिजे. हुजुरच्या देणियाची निकड बहुत जाली आहे. तरी येवज सत्वर पाठविला पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना

¶*Malhar Tukdeo to Peshwa Bajirao asking him to send back Krishnarao Sumant to Satara.*

No. 161]

श्री

राजश्री पंतप्रधान गोसांवी यांसी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो। पिलाजी जाधव दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकुशल लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेष किले वज्रगड येथील हावालियाचे मुतालकीस कार्यकर्ते मनुश्य पाहिजे. यास्तव रा. तुकोजी सोळोंखी यासी आपणाकडे पाठविले आहेत. गडवीपणाच्या कारभारास योग्य आहेत. राजश्री बापूजीपंताच्या आढळाचे आहेत. राजश्री पंतसचीव याजपासी कष्ट मेहनत बरी केली आहे. तरी आपण सनद देऊन किले मजकुरास रवाना केले पाहिजेत. यासी जमान रा। बहिरजी जगथाप देशमुख का। सासवड हे घेतले आहेत. जमानकतबा देतील तो हुजुर दफ्तरीं विल्हे लाविला पाहिजे. * हे आमचेंहि आप्तविशयी आहेत. आणि गडवाई केले मनुष्य आहे. तरी यासी गडावरी चढावयाची आज्ञा व सनद देऊन रवानगी करावी. हे गडावरी गेलियावरी दाणादुणा वस्तभाउ गडास जाईल. कबिला आजी वाडीस रवाना केला. हे गडावरी गेलियावरी वस्तभाउ दाणा जाईल. येविसी पूर्वी विनंती केलीच आहे. विदित जाले पाहिजे. हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Pilaji Jadhao recommends Tukoji Solonki for an appointment at Vajragad.*

1646

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 162]

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान गोसांवी यासी सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी-आलंकृत राजमान्य श्नो फतेसिंग भोसले दंडवत विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण स्वार होऊन निघाले ते येक दिवसीच पुणे पासी दाखल जाले. आम्हास सिवापुरास यावयासी तीन मुकामे जाली. निमित्य काय की आपणास घराची वोड होती याजकरितां निकड करून जावे लागले. आम्ही आज छ मजकुरी सिवापुरास मुकाम जाला. याज उपरी आपण निघण्याची सिधता बहुत सत्वर करावी. लोक तो जमा जालेच असतील. होणे असतील ते लवकर जमा करून बहुत बहुत त्वरेने निघण्याचे करावे. राजश्री बाजी पासलकरांकडून पत्र आले. तिकडे भोई व दोन घोडीं रवाना केली तीहि येतील. बहुत काय लिहिणे ? लोभ असो देणे ही विनंति.

¶*Fatesing Bhonsle to Bajirao, asking him to start at once and informing him that he himself was ready to join.*

No. 163]

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री यादवपंत गोसावी यासी

सेवक गदाधर प्रल्हाद नमस्कार उपरी. येथील कुशल जाणऊन कुशल-लेखन करणे विशेष. संताजी मालुसरा हुजुर जासुदामधे चाकरी करीत होता. त्यास भला माणोस, जातिवंत, कामाचा, मर्दाना, जाणऊन यासी पाईच्या दाहा लोकाची नाईकी सांगोन तुम्हाकडे पाठविला आहे. तरी याजपासून दाहा लोकानसी सेवा घेऊन यासी रोजमरा मोईनप्रा पावीत जाणे हे आसीर्वाद.

¶*Santaji Malusera is promoted in service. Is he connected with the hero of Sinhgad?*

No. 164]

श्रीरामोजयति[१]

विनंती उपरी. राजश्री सरलस्कर व राजश्री संभुसिंग जाधवराव व राजश्री दमाजी पिसाळ याजकडील दहकाचा ऐवज काय येणे आहे तो हिशेब लेहून पाठवीजे. दहकाचा ऐवज आणवावा म्हणून राजश्री स्वामीनी आज्ञा केली

---

१ शाहू. द. रु. नं. ४८.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहे. यास्तव हातरोखे घेतले पाहिजेत. तरी दहकाचा ऐवज व सरंजाम तपसीलवार लेहून पाठविला पाहिजे. राजश्री रघोजी भोसले याजकडीलहि दहकाचा ऐवज लेहून पाठवावा. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The writer seems to be the Chitnis. He demands payment of the Dahak dues.*

No. 165]

श्री

जानोजी कंक यास सनद. राजश्री माहादाजी बाजी यांस रा रामाजी राऊ मोरे यांच्या सुभाची सबनिसी होती ते मृत्यु पावले. हाली त्याचे पुत्र मैराल महादेव हुजूर उमेदवार होते. राज्यातील पुरातन यकनिष्ठ सेवक जाणोन स्वामी कृपालु होऊन रामाजी राऊ मोरे याचे निा पथके मावले लोक याची सबनिसी सांगितली आसे. यासी तैनात माजी प्रा

¶*Mairal Mahadaji, grandson of the famous Baji Prabhu, is promoted into service.*

No. 166] [?

छ १ सवान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री रामजी बंडगर बालाघांट प्रांते गेले होते. त्यास कसबे सोलापूर येथें मुकाम करून राहिले. त्यावर सायेंकालीं पांचा स्वारांनसी गावांत येक इष्टमैत्र होता; त्याचे भेटीस गेला. तों कोटांतून किलेदारानें सांगून पाठविलें कीं आपला पुत्र तुमचे भेटीस येत आहे. यानी त्यास सांगून पाठविलें कीं सुखरूप पाठऊन देणें. त्यावरून किलेदाराचा पुत्र पेठेंत आला. त्यांची यांची भेटी जाली. भेटीचे समयीं येका सिपाईयानें मागून येऊन रामजी बंडगराचें पाठीवर वार केला. तितक्यानेंच ठार जाला. रामजी मृत्य पावला म्हणून वर्तमान राजश्री स्वामीपाशीं राजश्री रामाजीपंतानीं सांगितलें. स्वामीस कळावें यास्तव लिहिलें आहे. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होय विज्ञापना.

¶*Purandare communicates to Bajirao the news which had reached Shahu that Ramji Bandgar had been murdered by the son of the Kiledar of Sholapur.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 167]

पा। २० जिल्हेज

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उत्तरेकडील फौजाची व स्वामीकडील फौजाची भेट जाहाली हें वर्तमान येथें आलियानंतर राजश्री फतेसिंग बावानी आम्हांस बोलाऊन सांगितलें कीं पहिले राजश्री राऊ येथें होते तेव्हा कितेक तिकडील मनसबियाचे विचार बोलिलो. तदनंतर प्रस्तुत मनसबाहि दिसतो. तरी तुम्ही पुणियासी लेहून उत्तर आणवणें. त्यावरून स्वामीस लिहिलें असे. तरी ते प्रांतींचा मनसबा स्वामीचे पदरीं पडला हे गोष्टीचे वरकडास तों असाह्य आहे. परंतु राजश्री फतेसिंग बावास समाधान आहे. कांकीं तिकडील विचारास स्वामीनी व बाबासाहेबानी मातबर फौजानसी जाऊन कुल पातशाहीचा व आपल्या राज्यांतील बंदोबस्त करावा येविसीचे कितेक संकेत जातिसमई स्वामीसी बाबासाहेब बोलिले आहेत व आतांहीं स्वदस्तुरें चिटी लिहिली आहे. तरी पत्राचें उत्तर पूर्वील बोलीप्रमाणे पाठविलें पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Fatesing Bhonsle is reported here to be desirous of accompanying Bajirao on an expedition into the north.*

No. 168]

पौ छ २१ मोहरम
छ २२ मो

श्री

श्रियासह चिरंजीव राजश्री नाना यांसी चिमणाजी बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल ता। छ १९ मोहरम जाणून स्वकीये कुशल लिहित जाणे. विशेष. तख्तगोरी[1] हतीण राजश्री स्वामीस द्यावयास पाहिजे. त्याखेरीज दोन दोन हतिणी व येकदता हती तेथे आहे. त्यापैकी येक रा। मुरारजी गाईकवाड यांस देणे म्हणोन पत्र लेहून तुम्हांस दिल्हे आहे. यैशास * * ने विचार आहेत. हतिणी वोझ्यास कामास येतात. हती मातबर कामास मातबरास द्यावयास कार्यास येतो. येसे दोहीचे दोन विचार आहेत. असो, तुम्ही माहतास येकांती बोलाऊन आणून हतिणी व हतीची गोष्ट पुसणे. हतिणी व

---

१ हत्तीचें नांव.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

हतीमध्ये निरस[1] वस्त, आइबदार[2] माहातारी असेल ते रा। मुरारजी गाईकवाड यांस देणे. तख्तगोरी तुम्ही राजश्री स्वामीकडे जाल तेव्हा समागमे नेऊन नजर करणे. फतेलस्कर तो कोणास द्यायाचा नाहीच. हे आसीर्वाद.

¶*Chimaji Appa to Nana, asking him to give away one old elephantess to Murarji Gaikwad (son of Damaji ?).*

No. 169]

× श्रीशंकर

महाराज राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

॥ऽ सेवक आज्ञाधारक सोनजी ना। सावंतराऊ सेनाहतसहस्त्री दडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशललेखन करावयासी लेखकासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. स्वामीचे सेवेसी चिरंजीव आंबराजी व जाऊबा ऐसे पाठविले. त्यासी स्वामीनी रा। आंबाजीपंतासमागमे दिल्हे त्यासी स्वामीच्या आशीर्वादें करून सुखरूप घरासी आले. त्यासी पाईच्या लोकामध्यें कांही न पावे; याकरितां स्वामीसंनिध चाकरी करावे तेथे कांही पावेल आणि योगक्षेम चाल म्हणोन उमेदवारी धरून चरणासंनिध चाकरी करावी त्यासी सर्वजानाचा सांभळ करितां आणि आपण तरी पूर्वापार पदरीचे आहो; आपले चालवावे हे ईश्वरे सामर्थ्य दिल्हे आहे. त्यासी चिरंजीव आंबराजी बाबासी पाठवावे तरी या प्रांती ढमढेरियांची धामधूम बहुत आत्यंत जाहली आहे. आपणावर दोनी तीन स्वारा येऊन फिरोन गेलिया अद्यापि त्याची वासना आहे की आपणावर यावयासी. आपण श्रीचे चरण संनिध करून बैसलों आहो आणि स्वामीचा आशीर्वाद करून कोणे गोष्टीचे भय नाहीं. याउपरी याचे हरएकविसी चालविले पाहिजे. सेवेसी चिरंजीव जाऊबा पाठविल आहेत. तरी जेणेकरून यांची उमेदवारी वाढे हे गोष्टी केली पाहिजे. विशेष आपले आवस्ता तरी दमियाचे वेथेकरितां शक्ती हीन जाहली आहे. कोठे जावयाची शक्ती नाहीं. जे हरघडी स्वामीपासी आपले सुखदुःख निवेदन करावे; हे शक्ती नाही. पूर्वी वतनाचे कजियानिमित्य सातारियासी आलों; यासी पूर्वील सर्व वर्तमान निवेदन केले; परंतु काही सार्थ होऊनी आले नाहीं. या करितां चितास चिंता बहुत लागली आहे. तरी याचा सर्व अभिमान स्वामीस आहे जे. रा। नानानी अभय दिलें आहे. त्या मागें स्वामीनी अभय देऊन

---

१ हलक्या प्रतीची. २ अयब=व्यंग. अयबदार—व्यंग. किंवा खोड असलेली.

× हें पत्र ११० नंतर वाचावें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपले चालविले पाहिजे. आपणांस तो स्वामीवाचून कोणाचा आसिरा नाहीं. तरी आपण तो एकनिष्ठपणें चाकरी करितों. याउपरी स्वामी सर्वजाण आहेत. बहुत काय लिा ? कृपा लोभ असो देणे हे विनंती.

¶*This letter is addressed to Bajirao by Sonji Savant requesting help and promotion in service for his son.*

No. 170]

छ २१ सवाल

श्री

राजश्री राऊ प्रधान

गोसावी यांसी

॥०ॐ श्रीमंत आखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नाो जानोजी निंबाळकर कृतानेक दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणोन गोसावी यांनी निजानंद लिहिती आज्ञा केली पाहिजे. यानंतर खाने आजम महमद वजीर खानगोरी मातबर माणूस पूर्वी खानवालाशान दाऊदखान यांणी यांच्या सरकारांत शे पंनास स्वारानसी त्यांच्या हजुरात होते. बरे मर्द आणि कमसखुनी[१] भलेमाणूस नेकजाद[२] दाऊदखानाचा वाका[३] जालियावरी तंवाईखाली[४] आले. आलाकडे मुबारजखान याची मुलाजमती केली. त्यानी म(न)सफ देऊन सरफराज[५] केले. जागिराहि दिधल्या होत्या. त्याचा मामला विपरीत जालियावरी कांही दिवस आपले घरी होते. आमचे आसनाई[६] पहिलेपासून होती याजकरितां आम्हापासी आले. आम्ही आपणापासीं ठेवीत होतों. परंतु यांची उमेद बहुत जे गोसावियापासी जाऊन सेपंनास राऊताचा सरंजाम करून घेऊन मागती सरदारी अमलांत आणावी. तेथे मातबर डोह आहे. बहुतांचे उर्जित जाले आहे. याजकरितां उमेद धरून गोसावियांपासी आले अहित. तरी आपण मेहरबानी करून यांचे उर्जित करून सरफराज केले पाहिजे. कामाचे माणूस गोसावियापासीं चाकरीस तफावत करणार नाहीत. बहुत काय लिहिणें ? कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Janoji Nimbalkar recommends Mohammad Vazirkhan to Bajirao for service. Vazirkhan was formerly in the employ of Mubarizkhan who fell at Sakharkhedla on 9th September 1724.*

---

१ मितभाषणी ? २ सुशील. ३ मृत्यु. ४ संकट, वाईट दिवस. ५ बढती दिली. ६ स्नेह.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 171]

श्रीनिवास प्रसन्न

श्रीमदुमारमणचरणनलीन
अखंडितयैश्वर्येसंपन राजश्री
चिमाजी अपा स्वामींचे सेवेसी

पोष्ये कृष्णाजी अनंत सा नमस्कार उपरी. येथील क्षेम जाणोन आपले क्षेम लिहिती आज्ञा केली पाहिजे विशेष. बहुत दिवस जाले आपणाकडील पत्र येत नाही. राजेश्री पंडित प्रधान हिंदुस्तानाकडे गेले व आपणास ठेविले म्हणोन परभारे यैकिले. आपले पत्र न आले. याकरितां क्षेमातिशय बंधूचे व आपले न आले. चित व्यग्र आहे. राजश्री तिकड गेलियाचे वर्तमान व आपले राहाणे ते लेहावया आज्ञा केली पाहिजे. बंधू निरंतर आपले व भावाचे स्मरणात असेती. मनास संतोष होये ते केले पाहिजे. यास मनोमन साक्षी असे. बंधू तिकड गेले आहेत तेथे काये प्रसंग घडतो ते घडीघडी विचार असताती. त्यास आम्ही यैकिले ते सांगतो. दया करून विस्तारें संतोष लेहावया आज्ञा करणे याकरितां मुजरद हरकारेची जोडी रवाना केली असे. विशेष काये लिहिणे हे विनती.

¶*Krishnaji Anant (Sumant ?) to Chimaji Appa, requesting information of Bajirao's movements.*

No. 172]

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. राजश्री हावजी वालके गतवर्षी पांच सात हजार फौज जथून मुलुकगिरीस जाऊन फिरून आले. सांप्रत त्याचा हेत आहे कीं पांच सात हजार फौजेसहित स्वामीचे पदरीं पडावें यैसे आहे. तर येविषींचाहि विचार स्वामीनी आपले ध्यानात आणून आज्ञा कर्तव्ये ती रा खंडोपंत व गोपालराव यांजवल करावी. विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Purandare to Bajirao, recommending Hawji Walke for service.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 173]

श्री

राजेश्री चिमाजीपंत आपा साहेबाचे शेवसी.

॥ऽ अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य श्नो जावजी तावरे दंडवत विनंती उपरी. येथील क्षेम जाणून स्वकीय कुशल लिहित जाणे. यानंतर साहेबी मेहेरवानगी करून पत्र पाठविले ते उत्तम समई पावलें. परम संतोश पावलों. आपण तेथून आलो जे साहेबाकडे उमेदवारी धरिली. त्यामधें साहेबी स्मरण करून पत्र पाठविले त्यावरून भेटीस येत होतो. परंतु मुलेंमाणसें खालती आहेत. त्यास आणून थारियास लावतों आणि साहेबाचे भेटीस येतों. भेटीअंती कितेक वर्तमान सेवसी निवेदन होईल. हरवडी आमची खबर घेत जाणे. बहुत काय लिहिणें ? कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Javji Tavre to Chimaji, professing readiness to enter his service.*

No. 174]

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री
राऊ व ता राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामीनी पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले. मौजे रेटरें याचेविसी लिहिले. त्यांस राजश्री स्वामी सातारियास आद्याप आले नाहीत. आलियावर राजश्री नारबावा मंत्री व राजश्री कुसाजी भोसले व येसाजी भोसले यासी बोली करून स्वामीस लेहून पाठऊन. राजश्री बाजीराऊहि आपल्या गावास गेले आहेत ते काये वर्तमान लिहितील तेहि कलल. स्वामीस वरच्यावर लेहून पाठऊ. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Purandare to Bajirao, promising to write about Retre after Shahu's return to the capital.*

No. 175]

श्री

राजश्री राऊ प्रधान
गोसावी यासी

०॥ऽ श्रीमंत अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहाभिलासी धारराऊ निंबालकर कृतानेक दंडवत विनंती उपर, येथील क्षम जाणौन साहेबानी निजानंद

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लिहि ती आज्ञा केली पाहिजे. यानंतर मेहरबानी करून पत्र पाठविले प्रविष्ट होऊन परम समाधान जाले. पत्री आज्ञा जे सिमगियाकारणे येणे. यावयासी उजूर कराल तर मारू म्हणौन लिहिलें. तरी आम्ही नवाब साचे मनसफदार आहोत. कदाचित आम्हास साहेबानी मारिले तरी दोही राज्यास विचार पडोन येखादे बिगाडाखाले मनसुबा येईल. याजकरितां आम्हास साहेब मारणार नाहीत हा भरवसा आहे. राजश्री जानबासाहेबांस सिमगा खेलावयासी बोलाविले यासी उंजूर[१] नाही. साहेब मेहरबानी करिताती हे तमाम पृथिवी जाणते आणि यांची निष्ठा आहे हे साहेबाचे चित साक्ष देत आहे. परंतु पूर्वी आम्ही राजपुरीस आलो होतो त्याची बदनामी आली त्याचे परिमार्जन होत नाही. या दिवसांत नवाबाची मर्जी येक प्रकार जाली आहे. रा बाजीसाहेबास देऊन घाटीहून कडवियाचा बोभाट गेला म्हणौन बोलविले. तेहि हजूर जाताती, या संधीमधें मधे हरकोणी विपरीत भाव दाखविला म्हणजे यांचे संकट साहेबासच पडेल. याजकरितां सेवसी पत्रें लिहिली आहेत. बहुत काये लिहिणे? कृपा आसो दीजे हे विनंती.

¶Dharrao Nimbalkar to the Peshwa—This Nimbalkar was a servant of the Nizam and yet kept on good terms with the Peshwa. He replies to the Peshwa in a humorous style.

No. 176]

श्री

राजश्री चिमणाजीपंत आपा गोसांवी
यास

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्वो धिराजी पंवार विश्वासराऊ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. बहुत दिनावधि क्रमली. पत्रद्वारे परामर्श न केला हे आपणा योग्य नाही. याउपरी निरंतर पत्र पाठऊन सांभाल करीत असिले पाहिजे. यानंतर आपलें वर्तमान तर गोसांवियाचे कृपेकरून येथास्थित असें. ज्याचे पदरीं आहों त्यानीं थोडी बहुत जागीर दिल्ही आहे व आणखीहि तजवीज आहे. तेहिं ईश्वरीछीने त्वरेनेंच होऊन येईल. कोठेहि असल्याने वडिलांचे पुण्योदये ईश्वर निर्वाह करीत आहे. यानंतर मौजे न्हावीचें सितोलियानीं आम्हास जामीन देऊन बाकी ठेविली. त्याबदल आम्हास घोडी तटे व मोत्याच्या

---

१ आक्षेप.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जोड्या देऊन लिगाड वारणें लागले. आण ते ग्रहस्त * * * चा समये विस (रू) न गेले. आम्हांस जामीन व्हावयाचे आगत्य काये? परंतु बहुत बेजीद[१] होऊन दरम्यानें दिले. हाली यैवज पावीत नाहीत. त्यास आपण च्यार गोष्टी बुधिवादाच्या सांगोन निकाल करून देत तो अर्थ केला पाहिजे. कृपा निरंतर असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Dhiraji bin Keroji Pawar Nagardevlekar to Chimaji Appa, asking him to adjust his dispute about debts with the Sitoles of Nhavi.*

No. 177]

श्रीशंकर

राजश्री आपा गोसावी यांसी

श्रीमंत् सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नेहांकित धिराजी पवार विस्वासराऊ दंडवत विनंती उपरी. अत्रैव कुशल परिसोन स्वकीये स्वानंदावाति लेखनाज्ञा करीत असिले पाहिजे. बहुत दिनावधि क्रमोन गेली, पत्रद्वारे परामर्ष न केला. येसे न पाहिजे. सदैव कुशलवृत लेखन करून संतोषविलें पाहिजें. लोभ असों दीजे हे विनंती. आपण खानदेश प्रांतीं आहों विदित होये. यानंतर प्रां। कुंभारीत आपली जागीर आहे. त्यांस चौथाईवालें ज्याजती वसूल घेऊन रयेत (त)फर्का[२] करिता म्हणून गोसावी यांसी पूर्वी लिहिले होतें त्यावरून रा। पंताची ताकीदपत्रें मोकासदारांस आहेंत कीं आपण जमाहि करून त्याप्रा। चौथाई घ्यावी. यैसियास प्रजिन्न कुंभारी प्रगण्यात कांहीं जाला. गोसावियांचे कौलावरून रबी पेरविली. त्यास रयेतीस नापेर जालें. आपले दृष्टीनें पाहून बटाईचा[३] तह केला. त्यांस चौथाईचे कमाविसदार व सरदेसमुखीचें कमाविसदार रजावंद[४] नाही. याजकरिता तुकोजी गायेकवाड आपणासमीप पाठविले आहेंत. रा। नारोजी देशमुख व हे स्वमुखें

---

१ काकुळतीस येऊन. २ हैराण. (3) Tax paid in kind. ४ खुषी.

1655

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

साध्यंत वर्तमान निवेदन करितील तो अर्थ श्रवण करून उतर पाठविलें पाहिजें. आपण तुमचे वितरिक्त नाहीं. वाजवी पैसा होतो तो ज्याचा त्यास देवितो. विशेष लिहिणे तर गोसावी सूज्ञ आहेत. हे विनंती.

¶*Dhiraji Powar reports to Chimaji that the collectors of Sardeshmukhi and Chauth are dissatisfied with the low assessment he levied on the ryots of Kumbhari as it suffered from a partial famine. He is sending Tukoji Gaekwad to explain his case and says he will abide by the Peshwa's decision.*

No. 178]

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
सदाशिव नाईक स्वामी गोसावी यांसी

पोष्य सखो माहादेव[१] सां नमस्कार विनंती. यथील कुशल जाणोन स्वकीये कुशललेखन केलें पाहिजे. यानंतर स्वामी औरंगाबादेहून सातान्यास जावया सुण्यास आले म्हणून आम्हीं जेजुरीस वर्तमान येकिलें, तेच क्षणीं वार्तिक स्वामीकडे रवाना केला जे भेटीस येतों. च्यार घटिका स्थिरता करावी. मागून आम्हींहि आलों. तों स्वामी स्वार होऊन गेले, यामुळें भेटीचा प्रसंग घडोन आला नाहीं. तेथें यावें तर नवरात्राकरितां खोळंबा पडला. स्वामी तेथें प्रसंगास गेले, राजश्री पंतप्रधान स्वामींची भेटी होईल. येशियास सरदेसमुखीचा यैवज सततीससें साडेपंचेतालीस रु॥ स्वामीकडे पावला, तेणप्रमाणें हिसेबीं लेहून राजश्री पंतस्वामीस समजाविला. स्वामीजवळीहि त्या हिसेबाची यादि असेल. पूर्वी राजश्री पंतस्वामीस स्वामीनी लिहिले होते कीं सरदेसमुखीपैकीं यैवज आम्हां-कडे आला नांहीं, याकारणें लिहिणें लागलें. आम्ही हिसेबीं लिहिलेप्रमाणें यैवज राजश्री पंतस्वामीस विदित करावा. राजश्री पिलाजी जाधव सुबेदार याणी स्वामीस खत दिल्हे आहे त्यामध्ये देणे राहिले, त्या देणेयांत वजावाटऊ करावयाचा अर्थ चितांत आणिला असेली तर न आणावा. खतापैकीं जे बाकी राहिली असेल ते निर्वाह करून देतील. कोणे गोष्टीचा अनमान नाहीं. आम्ही राजश्री सुबेदारांस वृंत सांगितलें. यांणीं जो पैका राहिला असेल तो वारून देतों म्हणून मान्य केलें आहे. तेहि+ कांहीं अमान्य नाहींत. अथवा

---

१ फणसळकर, पुरंदऱ्यांचा कारभारी. + येथून अक्षर निराळें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आम्हीहि आपले आङ्गेखरीज नाही. तुमचा जो पैका देणें असेल तो देऊन. परंतु राजश्री पंतापासीं लटिकवाद येतो. यास्तव सरदेसमुखीचा येवज पावला तो तिकडील तिकडे लेखणे. कर्जाचा येवज असेल तो दसरा जालियावरी राजश्री सुबेदाराची तुमची भेट होतांच तोही हिसेब वारून देतील. आम्हीहि दसरा जालियावरी स्वामीचे दीस येतो. कळलें पाहिजे. विशेष लिहिणें तर स्वामी वडील आहेत. कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Sakho Mahadev, clerk of the Purandares, writes to Sadashiv Naik Joshi, father of Babuji Naik, on the subject of a certain monetary transaction. He offers to visit the addressee at Satara after the Dussera to adjust matters personally.*

No. 179]

पा। छ २९ जमादिल ?

श्री

पुा राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. किले माहुलीस जागीर येक औंध परगणा. तोहि दुतर्फा निमे राजश्री मानाजी आंगरे व इकडील अमल. त्यास किले मजकूरची जाबत फर्मास चालावयास किलियाचे पायनाम (?) येक महाल तेथे दुतर्फा सता असलियास विचार कलत आहे. त्यास आमचे विचारे आधी तो माहाल येकतर्फाच करावा. त्यास कदाचित नव्हे तरी ता। मजकूरचा सालगुदस्ता इस्तावियाची बोली जाहाली होती त्यास सालमजकुरी पाहाणी होणार आहे. त्यास सालमजकुरी पाहाणी जाहलियावरी ता। मजकूरची इस्तावियाची बोली करून इस्तावियाप्रमाणे त्याजकडील जो आकार होईल तो येवज आपला येवज त्याजकडे येणे त्यात त्याला मजुरा देऊन त्याची सता ता। मजकुरी येकंदर नाही येसे करावे. इस्तावेयाचे बोलीप्रमाणे जे रुपये होतील ते नकदच त्यास द्यावे. खरिदी अगर दुसरे कांही नाही याप्रमाणे बोली करून ता। मजकूरची दुई तोडावी. सालमजकुरी पाहाणी जाली नाही. तरी सालगुदस्तां इस्तावियाची बोली जाहाली आहे

---

१ मुख्त्यारीचा हुकूम.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

त्याप्रमाणेच त्याला नकदच रुपये द्यावेसी बोली करावी. कलावें याकरितां लिहिले असे. त्यास आमचे विचारे राजश्री त्रिसो हरी व साबाजी तुकाजी यांस तेथें बोलाऊन आणावें; इतकियामधें आम्हीहि col. येऊन मुलुकातीलहि जकाती निमेनिम जाहाल्या आहेत त्याचे कानुजाबिते ssव्रे लागतात. त्यास आम्हाकडील कानुजाबिते आहेत ते आम्ही आणूं व fa नकडीलहि आणवावे आणि निमेनिम प्रमाणे करावे. त्याप्रमाणे कमाविसदार ill मल करितील. येसे आहे यांत स्वामीचे विचारास येईल ते करावे. बहुत क. लिहिणे ? लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*The paper refers to a dispute between the offic he Peshwa and those of the Angria arising out of the joint adminisı. n of Pargana Aundh attached to fort Mahuli.*

1658

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh